जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार १५ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०



भारतानं नवव्यांदा पटकावला अंडर-१९ आशिया चषक

पाकिस्तानी खेळाडूशी चकमक

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- भारताने पाकिस्तानचा पराभव करून आशिया चषकाचे विजेतेपद पटकावले. यानंतर भारतीय खेळाडूंनी मादानावर जोरदार जल्लोष केला. दरम्यान, मैदानावरील वातावरण चांगलेच तापलेले दिसून आले. अंतिम सामन्यात दोन्ही संघांच्या खेळाडूंनी जबरदस्त प्रदर्शन केले. मात्र, सामना संपल्यानंतर भारतीय युवा खेळाडूंचा पारा चढला आणि त्यांनी विजयाचा जल्लोष करत पाकिस्तानच्या खेळाडूंना चोख ➪(पान २ वर)

जळगाव, बुलडाणा जिल्ह्यात भूकंपाचे धक्के

■ रिश्टर स्केलवर ४.५ तीव्रतेची नोंद ■

जळगाव/बुलडाणा/प्रतिनिधी : जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर आणि रावेरपाठोपाठ बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातही आज सकाळी भूकंपाचा सौम्य धक्का जाणवला. सकाळी ९ वाजून १५ मिनिटांच्या सुमारास हा धक्का बसला असून, अनेक नागरिकांच्या घरातील साहित्य हलल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या भूकंपाचा केंद्रबिंदू मध्यप्रदेशातील खरगोन जिल्ह्यात असून, तेथे ४.५ रिश्टर स्केल तीव्रतेची नोंद झाली आहे.

हतनूर धरण परिसातील चौकीही हादरली- हतनूर धरण येथेही भूकंपाचे हादरे जाणवल्याची माहिती समोर आली आहे. सकाळी ९ वाजता १५ मिनिटे जमीन दोन ते तीन सेकंद हादरल्याची माहिती मिळत आहे. धरण परिसरातील चौकी हादरल्याचे कर्मचा-यांनी सांगितले. या धरण परिसरातील भूकंप निरीक्षण यंत्रणा बंद असल्याने भूकंपाची नेमकी तीव्रता किती होती हे समोर आले नाही.

गेल्या महिन्यात पालघरमध्ये धक्का- पालघर जिल्ह्यातील डहाणू आणि तलासरी तालुक्याला सातत्याने भूकंपाचे सौम्य धक्के जाणवत आहेत. तलासरी, धुंदलवाडी, मोडगाव आणि कासा परिसरात ३.७ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंपाचा धक्का बसला होता.कधी रात्री तर कधी दिवसा भूकंपाचे सौम्य धक्का जाणवले होते.

हिंगोलीसह नांदेडलाही यापूर्वी हादरे- हिंगोली आणि नांदेडच्या सीमावर्ती भागांत गेल्या काही दिवसांत रिश्टर स्केलवर ३ ते ४ तीव्रतेचे अनेक भूकंपाचे धक्के नोंदवले गेले आहेत. जुलै महिन्यात हे धक्के जाणवले. केंद्राच्या भूगर्भीय संशोधन संस्थांकडून यावर लक्ष ठेवण्यात येत असले, तरी वारंवार भूमी का कंप पावते याचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. विशेषत: डेक्कन ट्रॅपमधील फॉल्ट लाईन्स आणि भूगर्भातील पाण्याचा वाढता उपसा किंवा हालचाली यामागे कारणीभूत असू शकतात, असा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.



मध्य प्रदेशात भूकंपाचे जोरदार धक्के; खरगोन जिल्ह्यात खळबळ

भोपाळ : मध्य प्रदेशातील खरगोन जिल्ह्यात शनिवारी सकाळी अचानक झालेल्या भूकंपाच्या तीव्र धक्क्यांमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली. गेल्या २५ दिवसांत जिल्ह्यात दुसऱ्यांदा भूकंपाचे धक्के जाणवल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारी सकाळी ठीक ९.१५ वाजता आलेल्या या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.५ इतकी मोजण्यात आली. अवघ्या ३ ते ४ सेकंद जमिनीला तीव्र हादरे बसल्याने घरातील सामान हलले आणि नागरिक जीव मुठीत धरून पळत घराबाहेर आले.

हवामान व भूकंपशास्त्र विभागाच्या माहितीनुसार, या भूकंपाचे केंद्र मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेलगत असलेल्या सातपुडा भागात होते. हे केंद्र खरगोन जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ३५ किलोमीटर अंतरावर आणि जमिनीखाली तब्बल १० किलोमीटर खोलीवर असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या भूकंपाचे धक्के केवळ खरगोनमध्येच नव्हे तर सेंधवा, खंडवा, बुरहानपूर आणि भीकनगाव या सीमावर्ती भागांतही तीव्रतेने जाणवले.

विशेष म्हणजे, यापूर्वी १८ ऑक्टोबर रोजी दुपारी १२.१४ वाजताही खरगोन जिल्ह्यात ४.१ तीव्रतेचा भूकंप झाला होता. अवघ्या महिनाभरात पुन्हा एकदा भूकंपाचे धक्के बसल्यामुळे नागरिकांची चिंता वाढली आहे. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, खरगोनमधील या भूकंपानंतर शनिवारी सकाळी १०.२९ वाजता लेह-लडाख भागातही ३.९ तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली.

पाळण्यातली मुलेही सुरक्षित नाहीत



लहान बालकांच्या बळीनंतर नागरिकांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

वनमंत्री गणेश नाईक कुठे? वडेट्टीवारांचा संतप्त सवाल



नागपूर/प्रतिनिधी- शेतात काम करणारा शेतकरी असो, मजुरीसाठी जंगलालगत जाणारा मजूर असो किंवा घरात पाळण्यात झोपलेले लहान मूल, आता कुणाचाच जीव सुरक्षित राहिलेला नाही. वाघ आणि बिबट्यांचे हल्ले थेट मानवी वस्त्यांपर्यंत पोहोचले असून, निष्पाप नागरिकांचे बळी जात आहेत. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत शेतकरी व शेतमजुरांच्या मृत्यूंचे सत्र सुरू असतानाच भंडारा जिल्ह्यात अवघ्या काही दिवसांत दोन चिमुकल्यांचा वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांत मृत्यू झाला. एवढी गंभीर परिस्थिती असतानाही वनमंत्री गणेश नाईक कुठे आहेत? त्यांना या घटनांची साधी दखलही घ्यावीशी वाटत नाही का, असा संतप्त सवाल काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

लहान बालकांच्या बळीनंतर नागरिकांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत मानव-वन्यजीव संघर्षाने गंभीर रूप धारण केले आहे. शेतात काम करणारे शेतकरी, शेतमजूर, जंगलात रोजगारासाठी जाणारे नागरिक वाघांच्या हल्ल्यांचे बळी ठरत आहेत. विशेष म्हणजे, आता वाघांचा वावर थेट गावांमध्ये आणि मानवी वस्त्यांच्या परिसरात वाढत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भंडारा जिल्ह्यातील अलीकडच्या घटनांनी या संकटाची भीषणता अधोरेखित केली आहे. ५ नोव्हेंबरला लाखांदूर तालुक्यातील दोनाड येथे पाच वर्षांय बालकाचा वन्यप्राण्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला. त्यानंतर १३ नोव्हेंबरला पवनी तालुक्यातील तिर्री येथे घरात पाळण्यात झोपलेल्या आठ महिन्यांच्या बालकाला बिबट्याने उचलून नेले. या हल्ल्यात बालकाचा मृत्यू झाला. घराच्या चार भिंतींतही बालक सुरक्षित नसल्याची परिस्थिती या घटनेने समोर आणली आहे.



वडेट्टीवारांनी केले वनमंत्री गणेश नाईक लक्ष्य- या घटनांवरून वडेट्टीवार यांनी वनमंत्री गणेश नाईक यांना लक्ष्य केले. राज्यात वाघांच्या हल्ल्यांत सामान्य नागरिकांचे जीव जात आहेत. शेतकरी आणि मजुरांना शेतात जाणेही कठीण झाले आहे. वाघ थेट मानवी वस्त्यांमध्ये घुसून हल्ले करीत असताना सरकारकडून ठोस उपाययोजना का होत नाहीत? वनमंत्री नेमके कुठे आहेत आणि काय करीत आहेत? नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारची नाही का, असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. जंगलाचे रक्षण करणाऱ्या स्थानिक नागरिकांचाच जीव आज धोक्यात आला आहे. यात त्यांचा काय दोष? एखाद्या जंगली डुकराची शिकार झाली तर वनविभाग तातडीने दहा-दहा जणांवर कारवाई करतो. मग वाघांच्या हल्ल्यांत निष्पाप माणसांचे बळी जात असताना वन विभाग आणि सरकारची जबाबदारी कोण घेणार? लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याऐवजी सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोपही वडेट्टीवार यांनी केला. मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी केवळ नुकसानभरपाई देऊन किंवा घटना घडल्यानंतर वन विभागाचे पथक पाठवून प्रश्न सुटणार नाही. वारंवार हल्ले होणाऱ्या गावांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना, वन्यप्राण्यांच्या हालचालींवर प्रभावी नियंत्रण आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी व्यवस्था उभारण्याची गरज आहे. मात्र, सरकारकडून त्यासाठी ठोस पावले उचलली जात नसल्याचा वडेट्टीवार यांचा आरोप आहे.

अदानींच्या फायद्यासाठी सरकारी तिजोरीची लूट

नागपूर /प्रतिनिधी- अदानींच्या कराडी एनर्जी प्रकल्पाला परवानगी देताना पर्यावरणीय मंजुरीसाठी सुरुवातीला कमी क्षेत्र दाखवण्यात आले. १५०० मेगावॅट क्षमतेच्या या प्रकल्पाचे मूल्य ५७७५ कोटी रुपये असताना ते केवळ ५६ कोटी रुपये दाखवण्यात आले. त्यामुळे सरकारच्या तिजोरीत जमा होणा-या महसुलाचे मोठे नुकसान झाल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली. नियमानुसार चार टक्के भरणा अपेक्षित असताना केवळ २ कोटी २७ लाख रुपये जमा करण्यात आल्याचे समोर येत आहे. मग उर्वरित रकमेचे काय झाले? सरकारच्या महसुलाचे नुकसान कोणाच्या फायद्यासाठी केले जात आहे? मंत्रालयातील कोणाच्या आशीर्वादाने हा प्रकार सुरू आहे? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

ग्रीन एनर्जीच्या नावाखाली जंगल आणि गाव उद्ध्वस्त करण्याचे काम सुरू आहे. सुरुवातीला कमी जागा दाखवायची आणि अंतिम मंजुरी देताना जागा वाढवून द्यायची, हा प्रकार म्हणजे अदानींना रेड कार्पेट घालण्याचाच प्रकार आहे.

अखेरच्या चेंडूवर पाकिस्तानचा धुव्वा!

PM मोदींनी खास पोस्ट करत केलं कौतुक

नवी दिल्ली/वृत्तसंस्था भारतीय क्रिकेट संघाने शनिवारी ओमानमधील अल अमेरात क्रिकेट ग्राउंडवर खेळल्या गेलेल्या रोमांचक अंतिम सामन्यात गतविजेत्या पाकिस्तानचा १ गडी राखून पराभव करत अंडर-१९ आशिया चषक २०२६ पटकावला आहे. अखेरच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या या थरारक सामन्यात भारताने नवव्यांदा आशिया चषकावर आपले नाव कोरले. या ऐतिहासिक विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स' वर पोस्ट करत भारतीय युवा संघाचे अभिनंदन केले आहे. 'भारतीय क्रिकेटसाठी हा एक मोठा दिवस आहे. आजच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल आणि पुरुष U-१९ आशिया चषक २०२६ जिंकल्याबद्दल, आपल्या युवा क्रिकेटपटूंचा खूप अभिमान आहे. त्यांचे हे यश अनेक तरुणांना प्रेरित करेल,' असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने निर्धारित ५० षटकांत ९ बाद ३३७ धावांचा डोंगर उभारला. सलामीवीर उस्मान खान आणि हयाम खान (२१ धावा) यांनी ८.१ षटकांत ६२ धावांची वेगवान सलामी दिली.





नागपूर - केंद्रीय मंत्री तथा भाजप नेते नितीन गडकरी यांना 'दैनिक जनमाध्यम दिवाळी अंक २०२६' सप्रेम भेट देण्यात आला. यावेळी त्यांनी अंकातील विविध दर्जेदार लेखांचे व माहितीचे अवलोकन करून विशेष कौतुक केले. दैनिक जनमाध्यमचे वृत्तसंपादक अभिराम देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सदिच्छा भेट संपन्न झाली. या भेटीदरम्यान अमरावतीच्या विविध विकासकामांवर आणि इतर महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा झाली. गडकरी यांनी पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देखील दिल्या.

पुणे-नागपूर ट्रॅव्हल्सचा भीषण अपघात

पुलाच्या कठड्याला धडकून बस नाल्यात प्रवाशांना काचा फोडून बाहेर काढलं, एकाचा मृत्यू



छत्रपती संभाजीनगर : पुण्याहून नागपूरकडे जाणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स बसचा शनिवारी (दि. १४) पहाटे भीषण अपघात झाला. छत्रपती संभाजीनगर-जालना महामार्गावर धावणाऱ्या या बसने पुलाच्या कठड्याला धडक दिली आणि थेट २० फूट खोल नाल्यात कोसळली. या अपघातात २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला असून, अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. त्यापैकी एका प्रवाशाची प्रकृती गंभीर असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघाताची माहिती मिळताच चिकलठाणा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. बसच्या काचा फोडून आत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं.

पुलाच्या कठड्याला धडक अन् बस नाल्यात कोसळली

समोर आलेल्या माहितीनुसार, पुण्याहून नागपूरच्या दिशेने जाणारी खासगी स्लीपर ट्रॅव्हल्स शनिवारी पहाटे छत्रपती संभाजीनगर-जालना महामार्गावरून जात होती. यावेळी बसने पुलाच्या ➪(पान २ वर)

एमडी तस्कर, हुक्का बाजांचा सुळसुळाट

नागपूर : कोतवाली पोलिस ठाण्यार्तगत येणाऱ्या किल्ला महाल परिसरात अमली पदार्थविरोधी पथकाने मोठी कारवाई करत १३० ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) जप्त केले, तर दुसरीकडे गुन्हे शाखेच्या पथकाने रामनगरमधील एका कॅफेवर छापा टाकून हुक्का पार्लरचा अड्डा उधळला.गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने शनिवारी पहाटे तीन ते साडेतीनच्या सुमारास महाल परिसरात मोठी कारवाई केली. कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील किल्ला महाल परिसरात पोलिसांनी १३० ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) पावडर जप्त केली. या कारवाईत दोन तरुणांना अटक करण्यात आली

मराठवाड्याची चिंता वाढली!

जायकवाडीतील पाणी ६९ टक्क्यांवर

छ. संभाजीनगर /प्रतिनिधी- आधीच दुष्काळाच्या झळा सोसत असलेल्या मराठवाड्याची चिंता आता आणखी वाढली आहे. मराठवाड्याची तहान भागवणा-या जायकवाडी धरणातील पाणीसाठा अत्यंत झपाट्याने कमी होत असून, अवघ्या अडीच महिन्यांत हा साठा ९५ टक्क्यांवरून थेट ६९ टक्क्यांवर आला आहे. धरण क्षेत्रातील जवळपास २५ टक्के पाणी कमी झाल्याने आगामी काळात पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.एल-निनोच्या प्रभावामुळे यंदा मराठवाड्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. विभागातील इतर लहान, मध्यम आणि मोठ्या प्रकल्पांमध्ये समाधानकारक पाणीसाठा जमा झालेला नाही. अनेक गावांत पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असून, शेकडो गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. अशा परिस्थितीत छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि परभणी या चार जिल्ह्यांची संपूर्ण मदार जायकवाडी धरणावर आहे. याशिवाय छत्रपती संभाजीनगर आणि जालना शहरांसह दोन्ही जिल्ह्यांतील औद्योगिक वसाहतींनाही याच धरणातून पाणीपुरवठा केला जातो. ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात जायकवाडी धरणातील जलसाठा ९५ टक्क्यांवर पोहोचला होता आणि सप्टेंबरअखेरपर्यंत धरण ९५ टक्के भरलेले होते. मात्र, सध्या धरणाच्या डाव्या आणि उजव्या कालव्यांतून रबी हंगामासाठी पहिले आवर्तन सोडण्यात आले आहे. सोबतच, वाढत्या उन्हामुळे बाष्पीभवनाचा वेगही वाढला आहे. या दोन्ही कारणांमुळे धरणातील पाणीपातळी झपाट्याने खालावत आहे. पुढील पावसाळ्याला अजून आठ ते नऊ महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे. प्रशासनाने यंदा रबी हंगामासाठी तीन आणि उन्हाळी हंगामासाठी एक आवर्तन देण्याचा निर्णय घेतला आहे.

सुनेत्रा पवारांसोबत बैठक, NCP विलीनीकरण अन् सुप्रिया सुळेंबाबत CM फडणवीसांचा मोठा खुलासा

नागपूर/प्रतिनिधी- राज्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची चर्चा सुरू आहे. त्यातच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या दोन्ही नेत्यांमध्ये पावणे दोन तास चर्चा झाली. सकाळी ११ वाजता सुनेत्रा पवार वर्षा निवासस्थानी पोहचल्या होत्या. त्यामुळे सुनेत्रा पवार आणि मुख्यमंत्र्यांमध्ये विलीनीकरणावर काही चर्चा झाली का असा प्रश्न अनेकांना पडला. त्यावरून पत्रकारांसमोर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खुलासा केला आहे. नागपूरात पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सुनेत्राताई या शासकीय कामकाजासाठी माझ्याकडे आल्या होत्या. आमच्या चर्चेत कुठेही विलीनीकरणाबाबत चर्चा नव्हती. विलीनीकरणाबाबत जर काही चर्चा सुरू असती तर निश्चित त्यांनी आमच्याशी चर्चा केली असती. कारण आम्ही सत्तेत सोबत आहोत. त्यामुळे अद्याप तरी आमच्याशी कुणीही विलीनीकरणाची चर्चा केली नाही असं त्यांनी सांगितले. तसेच राष्ट्रवादी विलीनीकरणाच्या चर्चा फक्त माध्यमांमध्ये ऐकायला मिळत आहेत. प्रत्यक्षात अशाप्रकारे कुणीही आम्हाला विलीनीकरणाबाबत सांगितले नाही. त्यामुळे त्यावर बोलणे योग्य होणार नाही. आजच्या चर्चेत विलीनीकरणाचा कुठलाही मुद्दा नव्हता. जर त्यांनी चर्चा सुरू केली असती तरी त्यांनी आम्हाला तसं सांगितले असते असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. दरम्यान, जर सुप्रिया सुळे यांची आजची पत्रकार परिषद नीट पाहिली तर सीमांकन विधेयकाला त्यांचा पाठिंबा आहे हे दिसते. सरसकट ५० टक्के जागा वाढवून सीमांकन विधेयक आले तर त्याला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष पूर्ण समर्थन देईल हे सुप्रिया सुळेंनी सांगितले आहे. त्यामुळे ज्या वेगवेगळ्या चर्चा आणि पतंगबाजी सुरू आहे





जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

बँकेने पोलिसांना सोपविला ऑडिट रिपोर्ट

-मुथूट फिनकॉर्प घोटाळा

अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील विमको टॉवर येथील मुथूट फिनकॉर्पच्या शाखेत समोर आलेल्या सोने आणि रोख रक्कम हेराफेरीच्या बहुचर्चित प्रकरणात पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केल्यानंतर नवीन घडामोड समोर आली आहे.त्यानुसार मुथूट फिनकॉर्पने आपला अंतर्गत ऑडिट रिपोर्ट पोलिसांना सोपवला आहे. आता पोलिसांना लेखापाल अर्थात चार्टर्ड अकाउंटंटची मदत घ्यावी लागणार आहे.

ज्यामुळे गायब सोने आणि रोख रकमेचा आकडा उघड होईल.मुथूट फिनकॉर्प मध्ये झालेल्या घोटाळ्यामुळे ग्राहकांचे एकूण किती सोने गायब झाले,



किती रोख रकमेची हेराफेरी झाली आणि कंपनीचे एकूण किती कोटी रुपयांचे नुकसान झाले, याचा प्रमाणित आकडा अजूनही पोलिसांकडे नाही. याचे प्रमुख कारण कंपनीचा अंतिम ऑडिट रिपोर्ट आतापर्यंत तपास यंत्रणेला उपलब्ध नसणे, असे सांगितले जात होते. आता बँकेकडून अहवाल पोलिसांना सोपवल्याने एक मोठा टप्पा पार झाला आहे. विमको टॉवर येथील मुथूट फिनकॉर्प शाखेत ग्राहकांच्या सोने आणि रोख रकमेच्या कथित हेराफेरीचे प्रकरण एका महिला ग्राहकाच्या तक्रारी नंतर उघड झाले होते.

सुरुवातीला काही ग्राहकांनी आपले गहाण ठेवलेले सोने आणि जमा रकमेबाबत अनियमिततेची तक्रार केली. त्यानंतर हळूहळू इतर ग्राहकही समोर येऊ लागले आणि पोलिसांकडे तक्रारींची मालिका सुरू झाली. पोलिसांनी प्राप्त तक्रारींच्या आधारे वेगवेगळे गुन्हे दाखल केले. म्हणजेच जितक्या ग्राहकांच्या तक्रारी पोलिसांपर्यंत पोहोचल्या, त्यांच्या आधारावर तेवढे गुन्हे दाखल करण्यात आले. अशा प्रकारे प्रकरणाचा आवाका सुरुवातीच्या तक्रारीपेक्षा पुढे वाढत गेला.या प्रकरणामुळे सोने तारण कर्ज घेणाऱ्या ग्राहकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. आपले सोने सुरक्षित आहे का? आपली रक्कम परत मिळेल का? असे प्रश्न अनेक ग्राहक विचारत आहेत. पोलिसांनी ग्राहकांना आवाहन केले आहे की, ज्यांची फसवणूक झाली आहे असे वाटते, त्यांनी त्वरित पोलिसांशी संपर्क साधून आपली तक्रार नोंदवावी.

आरोपींच्या नावे खरेदी केल्या मालमत्ता-

तपासादरम्यान आरोपी आणि त्यांच्या नातेवाईकांच्या नावे खरेदी केलेल्या काही मालमत्तांची माहितीही समोर आली होती. पोलिसांनी संबंधित मालमत्तांचे कागदपत्रे जप्त करण्यासोबतच काही मालमत्ता सील करण्याची कारवाई केली होती.आता या मालमत्तांच्या खरेदीसाठी वापरलेल्या रकमेचा स्रोत आणि कथित घोटाळ्याशी त्याचा संबंध तपासणे हा महत्त्वाचा पैलू आहे. मालमत्ता कथित हेराफेरीच्या रकमेतून खरेदी केल्या होत्या की त्यामागे इतर कोणताही आर्थिक स्रोत होता, याचा निष्कर्ष तपास पूर्ण झाल्या नंतरच समोर येऊ शकेल. या दृष्टीने जप्त मालमत्तांचे प्रकरणही घोटाळ्याच्या आर्थिक दुव्यांना जोडण्यात महत्त्वाचे ठरू शकते.

नगरसेविकेच्या पतीची धुलाई

-मेसेज प्रकरणामुळे प्रभागात खळबळ

अमरावती/प्रतिनिधीः- दिवाळी निमित्त अजूनही अनेक भागात फटाके फोडले जात आहेत. पण शहरातील एका प्रभागात वेगळ्याच कारणामुळे फटाक्यांचा आवाज चर्चेत आहे. एका नगरसेविकेच्या पतीला दुसऱ्याच्या घरी बोलावून चांगलेच चोपून काढल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. या कथित मारहाणीमागे एका महिला पदाधिकाऱ्याला पाठवलेला मेसेज असल्याचीही चर्चा आहे. माहितीनुसार शहरातील एका प्रभागातील नगरसेविकेचे पती प्रभागाचा कारभार सांभाळतात. त्यांची राष्ट्रीय स्तरावर प्रभाव असलेल्या पक्षाच्या महिला पदाधिकाऱ्याशी जवळीक वाढल्याची चर्चा ऐकायला मिळाली. ही देखील चर्चा आहे की, सुरुवातीला सर्व काही ठीकठाक होते. पण दिवाळीच्या आदल्या दिवशी नगरसेविकेच्या पती महोदयांनी महिला पदाधिकाऱ्याला काही मेसेज पाठवले. या मेसेजमुळे घरात वातावरण तापले.एकीकडे दिवाळीची तयारी, दुसरीकडे मेसेजमुळे घरात वातावरण गरम झाले. मेसेज पाहून संतापलेल्या महिला पदाधिकाऱ्याच्या पतीने एक क्षण ही न घालवता संबंधित नगरसेविकेच्या पतीला घरी बोलावले. त्यानंतर दोघांमध्ये जोरदार वाद झाला. रागाच्या भरात पती महोदयांनी नगरसेविकेच्या पतीला चांगलेच चोपून काढल्याची जोरदार चर्चा ऐकायला मिळाली आहे. चर्चेत असेही सांगितले जात आहे की, संबंधित व्यक्तीला पुन्हा असे अजिबात होऊ देऊ नये, अशी कडक ताकीद देण्यात आली. चर्चा तर अशीही आहे की, पती महोदयांनी महिला पदाधिकाऱ्यालाही धडा शिकवला. यापुढे असे होऊ नये... अशी चेतावणी दिली. या प्रकरणाची चर्चा आगीसारखी संपूर्ण प्रभागात पसरल्याची माहिती आहे. दिवाळीच्या फटाक्यांपेक्षा या घटनेच्याच चर्चा जास्त आहेत.

राजकीय वर्तुळात या घटनेमुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या संपूर्ण प्रकरणात अद्याप कोणत्याही पक्षाकडून पोलिसांत अधिकृत तक्रार दाखल झाल्याची माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे ही केवळ चर्चा आहे की प्रत्यक्षात घडलेली घटना आहे, याबाबत संभ्रम कायम आहे.मात्र, राजकीय वर्तुळात ही चर्चा थांबायचे नाव घेत नाही आहे. अनेकजण दबक्या आवाजात याबाबत बोलत आहेत.

डॉ. भोजणे दांपत्याने दिली ३ ते ४ अर्भकांच्या विक्रीची कबुली?

-पोलीसांकडून कसून चौकशी सुरू, -वारंवार बदल आहेत जबाब

अमरावती/प्रतिनिधीः- नवजात अर्भकाच्या विक्रीच्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या डॉ. वैशाली भोजने आणि त्यांचे पती प्रफुल्ल भोजने यांची पोलीसांकडून कसून चौकशी सुरू आहे. माहिती नुसार,आरोपींनी ३-४ अर्भकांच्या विक्रीची बाब स्वीकारली आहे. ज्यामुळे हे प्रकरण अत्यंत गंभीर झाले आहे. याचबरोबर असेही सांगितले जात आहे की, आरोपी वारंवार जबाब बदलत आहेत. ज्यामुळे संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. उल्लेखनीय आहे की, शहरात ऑक्टोबर महिन्यात दसऱ्याच्या एक दिवस आधी भयंकर प्रकार शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी उघड केला होता. बूटी प्लॉट येथील भोजने मॅटर्निटी हॉस्पिटल





मधून नवजात अर्भक विकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आणि तक्रार शिवसेना नेत्यांनी केली होती. त्यामुळे संपूर्ण शहर आणि जिल्ह्यात खळबळ उडाली होती.

दोन दिवसांपूर्वी आरोपींना साईनगर भागातून पकडण्यात आले. तेव्हापासून न्यायालयाच्या आदेशाने कोठडी रिमांड घेऊन या प्रकरणाचा सखोल तपास करण्याचा पोलिसांचा प्रयत्न आहे.सूत्रांच्या मते आरोपी डॉक्टर आणि त्यांचे पती वारंवार जबाब बदलत आहेत. कधी काही सांगतात, कधी काही. ३-४ अर्भकांच्या विक्रीची बाब एकदा कबूल करतात, दुसऱ्या वेळी नकार देतात.त्यामुळे आरोपी एका जबाबावर ठाम राहत नाहीत, असे तपास अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. संभ्रम निर्माण केला जात आहे.अशा परिस्थितीत पोलिसांना संपूर्ण प्रकरण समोर आणण्याचे एक प्रकारचे आव्हान आहे.

अजून दोन दिवस पोलीस कोठडीत- आरोपी अजून दोन दिवस पोलीस कोठडीत आहेत. ज्यामुळे चौकशी पथकही सर्व प्रकारची सावधगिरी बाळगत आहे. या दोन दिवसात त्यांच्याकडून आणखीन काही माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणामुळे शहरात खळबळ उडाली आहे.

१३ वर्षांचा रेकॉर्ड तपासणे सुरू- पोलिसांनी शुक्रवारी आरोपीच्या हॉस्पिटलवर लावलेले सील उघडून तेथे रजिस्टर जप्त करून रेकॉर्ड खंगाळला, तेव्हा त्यांनाही आश्चर्याचा धक्का बसला. कथितपणे १३ वर्षांपासून हे प्रकरण चालत असल्याची माहिती उघडकीस येण्याची चर्चा आहे. शेवटी १३ वर्षांचा रेकॉर्ड पोलीस खंगाळत आहेत.भोजने हॉस्पिटलमध्ये झालेल्या प्रत्येक डिलिव्हरीचा विषय पोलीस तपासत आहेत. या प्रकरणामुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. विशेषतः ज्या कुटुंबांमध्ये बाळंतपण झाले, त्या कुटुंबांमध्ये चिंता आणि भीतीचे वातावरण आहे. आपले बाळ सुरक्षित आहे का? हॉस्पिटलमध्ये काही चुकीचे झाले तर नाही ना? असे प्रश्न अनेक पालकांच्या मनात येत आहेत.

१ व १० वरिल उर्वरित

पुणे-नागपूर ट्रॅव्हल्सचा भीषण

कठड्याला धडक दिली. या धडकेनंतर बस थेट सुमारे २० फूट खोल नाल्यात कोसळली. बस नाल्यात कोसळल्याने अनेक प्रवासी आत अडकले होते. अपघाताची माहिती मिळताच चिकलठाणा पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी बसच्या काचा फोडून अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढलं. त्यानंतर जखमींना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आलं. या बसमध्ये २६ प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघातात एका २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला असून, उर्वरित प्रवाशांपैकी अनेक जण जखमी झाले आहेत. एका प्रवाशाची प्रकृती गंभीर असल्याचं सांगण्यात येत आहे.मृत तरुणाची ओळख अद्याप पूर्णपणे पटलेली नाही. प्राथमिक माहितीनुसार, त्याचं नाव साई असून, तो कामगार होता. त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.चिकलठाणा पोलीस ठाण्यातील सतीश देवकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांनी मृत तरुणाच्या सहकाऱ्यांशी संपर्क साधला आहे. त्यांच्या माध्यमातून कुटुंबीयांना अपघाताची माहिती देण्यात आली असून, नातेवाईक आल्यानंतर मृताची संपूर्ण ओळख स्पष्ट होणार आहे.नाल्यात कोसळलेली अपघातग्रस्त बस बाहेर काढण्यासाठी दोन क्रेन मागवण्यात आल्या. त्यांच्या मदतीने बस नाल्यातून बाहेर काढण्यात आली. अपघातामुळे पुलाच्या कठड्याचे तुकडे आणि इतर साहित्य रस्त्यावर विखुरलं होतं. पोलीस कर्मचाऱ्यांनी स्वतः रस्त्यावर उतरून हा मलबा बाजूला केला. त्यानंतर महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली.

पाकिस्तानी खेळाडूशी चकमक

प्रत्युत्तर दिले. याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. अंतिम सामना जिंकल्यानंतर भारतीय संघाने संपूर्ण मैदानाला फेरी मारत विजयाचे सेलिब्रेशन केले. सामना संपल्यानंतर, सर्व भारतीय खेळाडू मैदानावर धावले. तेथे पाकिस्तानी खेळाडू आधीपासूनच होते. यावेळच्या एका व्हायरल व्हिडिओमध्ये एक भारतीय खेळाडू थेट पाकिस्तानी विकेटकीपरच्या समोर जाऊन आपला दबदबा आणि रुबाब दाखवताना दिसत आहे. दरम्यान, दोन्ही खेळाडूंमध्ये जोरदार शाब्दिक चकमक झाल्याचे दिसून येते. संपूर्ण सामन्यादरम्यान दोन्ही बाजूंच्या खेळाडूंचे अनेक वेळा खटके उडाल्याचे दिसून आले. मात्र विजेतेपद पटकावल्यानंतर भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंच्या प्रत्येक कृत्याचा हिशेब चुकता केला.**स्पोर्ट स्टाफची मध्यस्थी -** या खेळादरम्यान दोन्ही संघांच्या खेळाडूंमधील वाढलेला तणाव स्पष्ट जाणवत होता. भारतीय खेळाडूंना पाकिस्तानी खेळाडूंच्या अतिशय जवळ जाण्यापासून रोखण्यासाठी भारतीय स्पोर्ट स्टाफमधील सदस्यांना मध्यस्थी करावी लागली आणि त्यांना मागे सारले. या हाय-व्होल्टेज सामन्यानंतरचा विजयाचा हा आक्रमक जल्लोष सध्या सोशल मीडियावर जबरदस्त व्हायरल होत असून प्रचंड चर्चेचा विषय ठरला आहे.

मोर्शी नगरपरिषदेच्या टेरेसवर

याबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

प्राप्त झालेल्या माहितीनुसार शुक्रवारी रात्री नगरपरिषदेच्या टेरेसवर जेवणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या भोजन कार्यक्रमात शाकाहारी तसेच मांसाहारी अशा दोन्ही प्रकारच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती.मात्र हा कार्यक्रम नेमका कोणाच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता, त्याला कोणाची परवानगी होती आणि या कार्यक्रमाला कोणकोण उपस्थित होते,याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.दरम्यान नगरपरिषदेच्या टेरेसवर ओली पार्टी सुरू असल्याची माहिती एका सामाजिक कार्यकर्त्याला मिळाली.त्यानंतर संबंधित कार्यकर्त्याने घटनास्थळी जाऊन सुरू असलेल्या भोजन कार्यक्रमाचे मोबाईलमध्ये चित्रीकरण केले.हे चित्रीकरण सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या घटनेची चर्चा शहरातील चौकाचौकात सुरू झाली. व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या कार्यक्रमाबाबत नागरिकांकडून वेगवेगळे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

नगरपरिषदेचे टेरेस नेमके कोणाच्या वापरासाठी?

नगरपरिषद ही शासकीय व सार्वजनिक संस्था असून तिच्या इमारतीचा वापर कोणत्या कारणासाठी आणि कोणाच्या परवानगीने केला जातो हा महत्त्वाचा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केल्या जात आहे. शासकीय अथवा सार्वजनिक इमारतींच्या परिसरात खासगी स्वरूपाचे कार्यक्रम आयोजित करण्यासंदर्भात काही नियम व परवानगीची प्रक्रिया असल्यास त्याचे पालन झाले होते का याची माहिती नागरिकांना मिळणे आवश्यक आहे. नगरपरिषदेच्या प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणाबाबत वस्तुस्थिती स्पष्ट करावी अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.सदर कार्यक्रम कोणी आयोजित केला, कोणाच्या परवानगीने झाला,कार्यक्रमासाठी नगरपरिषदेच्या जागेचा वापर करता येतो का, या प्रश्नांची उत्तरे मिळणे गरजेचे आहे. एकीकडे शहरातील विविध नागरी समस्या आणि विकासकामांचे प्रश्न प्रलंबित असतांना नगरपरिषदेच्या टेरेसवर ओल्या पार्टीचा व्हिडिओ सध्या चर्चेचा विषय ठरला आहे.आता या व्हायरल व्हिडिओची नगरपरिषद प्रशासन दखल घेणार का?संबंधित कार्यक्रमाबाबत अधिकृत खुलासा होणार का? तसेच या प्रकरणात पुढे काय घडणार,याकडे मोर्शीकरांचे लक्ष लागले आहे. टेरेसवरील पार्टीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आता प्रशासनाच्या खुलाशाच्या प्रतीक्षेकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

कर्जाच्या जाचाला कंटाळून

गावकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शासनाच्या कर्जमाफी योजनेत मधुकरराव काळे यांचे नाव असल्याचे सांगितले जाते. मात्र काही तांत्रिक कारणांमुळे अद्याप त्यांचे कर्ज माफ झाले नव्हते. त्यामुळे त्यांना नवीन कर्ज मिळण्यात अडचणी येत होत्या. याशिवाय काही कर्ज खासगी फायनान्स कंपनीचे असल्याचीही माहिती गावकऱ्यांनी दिली आहे.

कापूसतळणीच्या स्मशानभूमीची

दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.गेल्या ६ ते ७ वर्षांपासून स्मशानभूमीच्या शेडवरील टिनपत्रे बदलण्यात आलेली नाहीत.जनसुविधा निधीअंतर्गत स्मशानभूमीची दुरुस्ती आणि सौंदर्यीकरण होणे अपेक्षित असताना,अद्याप कोणतीही ठोस कामे करण्यात आली नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.शेडवरील जुनी टिनपत्रे खराब होऊन खाली लोंबकळत असल्याने ती काढून टाकण्यात आली.त्यामुळे पावसाळ्यात तसेच उन्हाळ्यात अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.विशेष म्हणजे,यापूर्वी लोकसहभागातून काही खराब टिनपत्रे काढून त्या ठिकाणी नवीन पत्रे बसविण्यात आली होती.मात्र,कालांतराने ती पत्रेही खराब झाली. त्यामुळे स्मशानभूमीच्या शेडची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्याची गरज निर्माण झाली आहे.सध्या ग्रामपंचायतीवर प्रशासक असल्याने निदान आता तरी या मूलभूत सुविधेकडे लक्ष देऊन शेडवर नविन टिनपत्रे बसवावीत,तसेच शवगृहाची दुरुस्ती व स्मशानभूमीचे सौंदर्यीकरण करावे,अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.यासंदर्भात पशुपक्षी मित्र तथा सामाजिक कार्यकर्ते अरुण शेवाने यांनी प्रशासक ग्रामसेवक यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे सांगितले.आता केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी,अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

सर्पदंशाने महिलेचा मृत्यू

दिपालीचा मृत्यू झाला. या घटनेमुळे आवरकर कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. येवदा परिसरात शोककळा पसरली आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

खड्ड्यांत हरवला आष्टी-टाकरखेडा

या रस्त्यावरून ये-जा सुरू असते. मात्र, ठिकठिकाणी पडलेले खड्डे आणि उखडलेले डांबर यामुळे वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात वाहनांचा ताबा सुटण्याची शक्यता असून, दुचाकीस्वारांसाठी हा प्रवास अधिक धोकादायक ठरत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाढलेल्या झाडांच्या फांद्या रस्त्यावर झुकल्याने वाहतुकीची कोंडी आणि अपघाताचा धोका निर्माण होत आहे. समोरून मोठे वाहन आल्यास दुचाकीस्वारांना बाजू देताना अडचणींचा सामना करावा लागतो. रात्रीच्या वेळी झाडांच्या फांद्या आणि रस्त्यावरील खड्डे लक्षात येत नसल्याने धोका आणखी वाढतो. या मार्गाच्या दुरुस्तीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. केवळ तात्पुरती डागडुजी करण्याऐवजी रस्त्याचे दर्जेदार नूतनीकरण करावे, अशी नागरिकांची मागणी आहे. तसेच रस्त्यावर आलेल्या झाडांच्या फांद्यांची तातडीने छाटणी करून वाहतुकीस मोकळीक द्यावी. अशी अपेक्षा वाहनचालक आणि परिसरातील नागरिक व्यक्त करीत आहेत.

नऊ वर्षांपासून फरार आरोपी अखेर

गुन्ह्यातील आरोपी मोहम्मद साबीर ऊर्फ मोहम्मद शानू वल्द मोहम्मद शफी (वय ४५, रा. घाटलाडकी, ता. चांदूर बाजार) हा गावात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने त्याचा शोध घेतला. त्याला घाटलाडकी येथून ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरुद्ध भादंवि कलम ४५७ आणि ३८० नुसार गुन्हा दाखल होता. तेव्हापासून तो पोलिसांना हवा होता. दुसऱ्या कारवाईत वरूड पोलिसांनी प्रवीण प्रकाश गजभिये (वय ३३, रा. राजुरा, ह.मु. घुग्गुसकर) याचा माग काढला. वरूड पोलीस ठाण्यातील घरफोडीच्या गुन्ह्यात पाहिजे असलेला प्रवीण मध्य प्रदेशातील पांढुर्णा येथे असल्याची माहिती मिळताच पोलिसांचे पथक तेथे रवाना झाले. त्याला तेथून अटक करण्यात आली. विशेष म्हणजे, प्रवीणविरुद्ध अमरावती ग्रामीण जिल्ह्यातील सहा पोलीस ठाण्यांमध्ये एकूण १७ गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने आणि अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक अशोक लांडे व वरूडचे ठाणेदार दिनेश चव्हाण यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली

समृद्धी महामार्गावर ट्रक सोडून

गेला. बराच वेळ ट्रक एकाच ठिकाणी उभा असल्याने पेट्रोल पंपाकडून याबाबत ट्रक मालकाला फोनद्वारे माहिती देण्यात आली. माहिती मिळताच मालक मोहम्मद इमरान यांनी घटनास्थळी धाव घेतली. ट्रकची तपासणी केली असता मालाच्या मोजणीत तफावत आढळली. छत्तीसगड येथून ३६१ लोखंडी पाइप भरले असताना प्रत्यक्षात ट्रकमध्ये ३४० पाइपच शिल्लक होते. उर्वरित २१ पाइप गायब असल्याचे स्पष्ट झाले. चालकाने ट्रक सोडून पलायन केल्याने आणि मालही गायब असल्याने मालकाने पोलिसांत धाव घेतली. त्यानुसार नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी १३ नोव्हेंबर रोजी रितेश साहू याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. गायब पाइपांचा शोध घेण्यासोबतच फरार चालकाचा ठावठिकाणा शोधण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

न्यायालयाच्या दारातच आरोपींना

अमलदार रणजीत कडू यांच्यासह पोलीस पथक आरोपींना घेऊन न्यायालयाच्या दिशेने जात होते. त्याचवेळी तेथे काही जणांचा जमाव जमा झाला. भारत ऊर्फ मक्खी अर्जुन घुगे (वय २७), वीरेंद्र विजय मोहोड (वय ४५), लखन शाम काळे (वय ३९), रविंद्र शालिकराम वानखडे (वय ४२) आणि तुषार सुभाषराव सरदार (वय २७) यांच्यासह अन्य अकरा जणांनी आरोपींना उद्देशून आरडाओरड सुरू केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

यानंतर जमावाने आरोपींना अश्लील भाषेत शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे न्यायालयाच्या प्रवेशद्वार परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला. पोलीस अमलदार रणजीत कडू यांनी यासंदर्भात गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

विदर्भ राज्य आंदोलनची

साहेबराव इंगळे, सतीश प्रेमलवार, शरद पुसदकर, दिवाकर राऊत, संजय हाडोळे, गजानन दुधाट, विष्णूजी काळमेघ, अशोक राणे, गणेश कुसराम, बाबाराव जाधव, पचगडे, अनिल वानखडे ,डॉ. विजय कुबडे ,बाळकृष्ण राऊत ,विलास धांडे ,विनायक इंगोले, दिगंबर चुनडे ,गजानन इंगोले ,सुनील देशमुख यांनी केले.

ई-पिक पाहणी : लोकेशनच्या तांत्रिक

ॲपमध्ये त्या गटाचे अंतर अधिक दाखविणे, दोन वेगवेगळ्या गावांचे नकाशे परस्पर बदलून दिसणे, काही गावांचे नकाशे ॲपमध्ये उपलब्ध नसणे तसेच विशिष्ट गट क्रमांक व शेतकऱ्यांची नावे पीक नोंदणीसाठी उपलब्ध न होणे अशा समस्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. या अडचणींमुळे शेतकऱ्यांची पीक नोंदणी प्रलंबित राहू नये, यासाठी शासनाने ई-फेरफारचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे.

दररोज १०० शेतकऱ्यांचे टार्गेट-

अंजनगाव बारी परिसरात कृषीमित्रांना दररोज सुमारे १०० शेतकऱ्यांच्या ई-पिक पेरा पाहणीचे उद्दिष्ट दिले जाते. मात्र प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी करताना लोकेशन चुकीच्या ठिकाणी दाखविले जात असल्याने एकाच नोंदीसाठी वारंवार प्रयत्न करावे लागत आहेत. परिणामी वेळेचा अपव्यय होत असून निर्धारित उद्दिष्ट पूर्ण करताना अडचणी येत आहेत. वेळेत पीक नोंदणी न झाल्यास शेतकऱ्यांच्या शासकीय योजनांशी संबंधित लाभांवर परिणाम होण्याची भीतीही व्यक्त होत आहे.

ई-फेरफारचा पर्याय प्रभावीपणे राबविण्याची गरज!

शासनाने पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून दिल्याने अंजनगाव बारीतील शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी स्थानिक पातळीवर प्रभावीपणे होणे आवश्यक आहे. ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी तांत्रिक अडचणींमुळे ऑनलाइन नोंदणी होऊ न शकलेल्या शेतकऱ्यांच्या प्रकरणांची दखल घेऊन ई-फेरफार प्रणालीद्वारे पीक नोंदणीची प्रक्रिया सुलभ करावी, अशी अपेक्षा आहे.

समाजाच्या प्रश्नांचे वास्तव समजून

अमरावती आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त वतीने या दोन दिवसीय साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव हे या संमेलनाचे अध्यक्षपद भूषवित आहेत.आज सकाळी झालेल्या या संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्याला यशवंतराव चव्हाण अमरावती सेंटरचे कार्याध्यक्ष डॉ.रमेश अंधारे, कोषाध्यक्ष प्रदीप देशमुख, प्राचार्य डॉ.स्मिता देशमुख, साहित्यिक प्रतिभा सराफ, रामदास गायधने, पुष्पराज गावंडे, स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. महेंद्र मेटे, संमेलन कार्याध्यक्ष डॉ. राजेश मिरगे प्रामुख्याने उपस्थित होते.

समाजातील साहित्याचे महत्त्व व कार्य याचा गौरव करत दिलीपबाबू इंगोले म्हणाले की, साहित्य हे समाजाच्या वेदनांना वाचा फोडते, समाजाला विचार करण्याची दृष्टी देते, परिवर्तनाची शक्यता साहित्यातून व्यक्त होत असते.परंतु आज साहित्य हे वास्तवापासून दूर चालले असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.रमेश अंधारे, पुष्पराज गावंडे, प्रतिभा सराफ, यांनीही या वेळी आपले मनोगत व्यक्त केले.

शब्दवेल साहित्य संघाचे अध्यक्ष प्रवीण बोपुलकर यांनी प्रास्ताविक केले तर स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ.महेंद्र मेटे यांनी स्वागतपर भाषण केले. शाहीर धम्मा इंगळे यांनी संमेलनाध्यक्ष इंद्रजीत भालेराव यांची कविता शाहिरी ढंगाने सादर केली.या सोहळ्यात शब्दवेल दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले. शब्दवेल तर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे देखील यावेळी वितरण करण्यात आले.

डॉ.महेंद्र मेटे, अविनाश चरडे, रामदास गायधने, यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. शीतल राऊत व अश्विनी अतकरे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तर अविनाश चरडे यांनी उद्घाटन सोहळ्याचे आभार प्रदर्शन केले. द्विशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त सत्यशोधक महात्मा ज्योतिबा फुले यांना समर्पित या दोन दिवसीय साहित्य संमेलनाची सुरुवात ग्रंथदिंडीने झाली. शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतीस्थळ येथे भाऊसाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करून ह.भ.प. डॉ. ज्ञानेश्वर मिरगे, ज्येष्ठ पत्रकार डॉ. कुमार बोबडे, डॉ. वर्षा चिखले, स्वागताध्यक्ष डॉ. महेंद्र मेटे, संमेलन कार्याध्यक्ष डॉ. राजेश मिरगे, शब्दवेलचे अध्यक्ष प्रवीण बोपुलकर, विदर्भ साहित्य संघ अमरावती शाखेचे सचिव आबासाहेब कडू यांनी ग्रंथदिंडीचे पूजन केले.भजनी मंडळाने केलेल्या भक्तिगीतांच्या गजरात ही दिंडी संमेलनस्थळी ज्ञानमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख नगरीत दाखल झाली.तेथे उपस्थित साहित्यिकांनी ग्रंथदिंडीचे स्वागत केले. संमेलनाचा आजचा पहिला दिवस इटूकले पीटुकले हा बाल कलाकारांचा कार्यक्रम, कवी संमेलन, कथाकथन, महिला कवी संमेलन, दीपाली बाभूळकर यांच्या बोलक्या बाहुल्या, डॉ.रमेश थोरात यांची एकपात्री आणि निमंत्रितांच्या कवी संमेलनाने गाजला. संमेलनाच्या आयोजनासाठी स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ.महेंद्र मेटे, संमेलन कार्याध्यक्ष डॉ.राजेश मिरगे, शब्दवेलचे अध्यक्ष प्रवीण बोपुलकर व त्यांचे सहकारी परिश्रम घेत आहेत.

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ रविवार, १५ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

वाशीम-किन्हीराजा मार्गाचे काम निकृष्टदर्जाचे ; पुलांच्या बांधकामावर पाण्याचा ठणठणाट!

संबंधित विभागाचे दुर्लक्ष की ठेकेदाराला अभय ? निकृष्टकामामुळे पुलांच्या मजबुतीवर प्रश्नचिन्ह

ओलावा टिकविण्यासाठी टाकलेली पोती पाच दिवसांपासून कोरडी

■ प्रतिनिधी | किन्हीराजा ■

वाशीम-किन्हीराजा जिल्हा मार्गाच्या बांधकामाचा दर्जा दिवसेंदिवस संशयाच्या भोवऱ्यात सापडत असून, या मार्गावरील पुलांच्या बांधकामात गंभीर अनियमितता होत असल्याचे चित्र समोर येत आहे. विशेष म्हणजे, नव्याने बांधण्यात आलेल्या पुलांच्या बांधकामावर आवश्यक पाण्याची फवारणी केली जात नसल्याने बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुलावर ओलावा टिकवून ठेवण्यासाठी टाकण्यात आलेली पोत्यांची आच्छादने पाच-पाच दिवसांपासून कोरडीच असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदाराच्या कामकाजावर तसेच बांधकाम विभागाच्या देखरेखीवर संताप व्यक्त होत आहे. वाशीम ते किन्हीराजा या जिल्हा मार्गाच्या कामाला सुरुवात झाल्यापासूनच अनेक तक्रारी समोर येत आहेत. या मार्गावरील बहुतांश काम रात्रीच्या वेळी उरकले जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. किन्हीराजा, मैराळडोह, एरंडा, बोराळा, कार्ली आणि गुंज परिसरात करण्यात आलेल्या पुलांच्या बांधकामाच्या दर्जाबाबतही नागरिकांनी आक्षेप घेतले आहेत. काही ठिकाणी साहित्याच्या दर्जाबाबत आणि कामाच्या पद्धतीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

नवीन बांधकामाची गुणवत्ता टिकविण्यासाठी आवश्यक असलेले पाण्याचे क्युरिंग केले जाणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात मात्र पुलांवर पाच ते सहा दिवस पाणी टाकले जात नसल्याचे चित्र आहे. ओलावा टिकविण्यासाठी टाकलेली पोतीही पूर्णपणे कोरडी पडली आहेत. परिणामी, बांधकामाच्या मजबुतीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. भविष्यात या पुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्यास



त्याची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

विशेष म्हणजे, किन्हीराजा, एरंडा आणि गुंज परिसरासह जिल्ह्यात अनेक भागांत पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. शेतकऱ्यांना पाणी वापराबाबत निर्बंध असताना शासकीय बांधकामांमध्ये मात्र पाण्याच्या योग्य वापरासह आवश्यक देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. एकीकडे कोट्यवधींच्या सार्वजनिक निधीतून रस्ते आणि पूल उभारले जात असताना दुसरीकडे त्यांच्या गुणवत्तेची हमी कोण देणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शेतकऱ्यांचे नुकसान; भरपाईबाबतही नाराजी

या रस्त्याच्या कामामुळे यापूर्वीही अनेक शेतकऱ्यांना नुकसानीचा सामना करावा लागल्याचा आरोप आहे. किन्हीराजा येथील नथ्थू गोदमले यांच्या शेतात रस्त्याचे पाणी शिरल्याने पिके गाळासह वाहून गेली होती. शेतात मोठे भगदाड पडल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले.

त्यावेळी केवळ तात्पुरती गाळ भरणी करून शेतकऱ्याचे समाधान करण्यात आले; मात्र संपूर्ण नुकसानभरपाई देण्यात आली नसल्याची तक्रार आहे. याशिवाय रस्त्याच्या कामातून उडणाऱ्या धुळीमुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्याचेही सांगण्यात येत आहे.

संबंधित ठेकेदाराला राजकीय वरदहस्त असल्याची चर्चा परिसरात सुरू असून, त्यामुळेच कामाच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळपाहणी करून कामाचा दर्जा तपासण्याची आवश्यकता असताना, त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने ठेकेदाराचे मनोबल वाढत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

अधिकाऱ्यांनी झोपेतून जागे व्हावे; अन्यथा आंदोलनाचा इशारा

वाशीम-किन्हीराजा मार्गावरील सर्व पुलांच्या बांधकामाची तातडीने तांत्रिक तपासणी करावी, वापरण्यात आलेल्या साहित्याची गुणवत्ता तपासावी, आवश्यक क्युरिंग व बांधकाम नियमांचे पालन झाले आहे की नाही, याची चौकशी करावी.

तसेच शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून योग्य नुकसानभरपाई द्यावी आणि दोषी आढळणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांकडून होत आहे. वेळीच या कामांची दखल घेतली नाही, तर भविष्यात गंभीर परिणामांना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन वस्तुस्थितीची पाहणी करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

दुष्काळात कर्जवसुली करताना संवेदनशीलता जपा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हाधिकारी यांचे मायक्रोफायनान्स कंपन्यांना निर्देश

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि ग्रामीण भागातील आर्थिक अडचणीत असलेल्या कुटुंबांकडून कर्जवसुली करताना मायक्रोफायनान्स कंपन्यांनी संवेदनशीलता व सहानुभूतीची भूमिका घ्यावी. कर्जदारांवर कर्जफेडीसाठी कोणताही अनावश्यक दबाव आणू नये, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील काटेपूर्णा दालनात १२ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. मायक्रोफायनान्स इंडस्ट्री नेटवर्कचे उपाध्यक्ष (राज्यस्तरीय उपक्रम) देवेंद्र शहापूरकर, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा उपनिबंधक माणिक लटपटे आणि जिल्हा अग्रणी व्यवस्थापक राहुलकुमार गजभिये व

भारतीय रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेल्या स्व-नियामक संस्था असलेल्या या नेटवर्कशी संलग्न सुमारे २५ मायक्रोफायनान्स कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या कार्यपद्धतीची माहिती देताना देवेंद्र शहापूरकर यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना आर्थिक गरजेनुसार विनातारण छोटी कर्जे उपलब्ध करून दिली जातात. वाशिम जिल्ह्यात सध्या सुमारे ४०० कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले असून, त्यापैकी जवळपास ९९ टक्के कर्जे महिला व महिला बचत गटांना देण्यात आली आहेत. कर्जवसुलीची प्रक्रिया भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियम व मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येते. मायक्रोफायनान्स कंपनी किंवा तिच्या कर्मचाऱ्यांविरोधात तक्रार असल्यास १८०० १०२ १०८० या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदविता येते. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे कर्जवसुली करताना परिस्थितीचे भान ठेवून कर्जदारांशी सहानुभूतीपूर्ण व्यवहार करणे आवश्यक आहे. आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकरी व ग्रामीण कुटुंबांवर कर्जफेडीसाठी दबाव आणू नये, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या प्रतिनिधींनी कर्जवसुलीबाबत सहकार्याची भूमिका घेण्याचे आश्वासन दिले. ज्या कर्जदारांना हप्ते भरणे शक्य आहे, त्यांच्याकडून नियमित हप्ते स्वीकारण्यात येतील, तर आर्थिक अडचणींमुळे परतफेड करणे शक्य नसलेल्या कर्जदारांना नियमानुसार योग्य मार्गदर्शन व सहकार्य करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कर्जाचे हप्ते वेळेवर न भरल्यास संबंधित कर्जखाते थकीत होऊन कर्जदाराच्या क्रेडिट स्कोअरवर परिणाम होऊ शकतो. परिणामी, भविष्यात संस्थात्मक कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याचे प्रतिनिधींनी निदर्शनास आणून दिले. कर्जाचे हप्ते अल्प रकमेचे असल्याने आणि कर्जदारांना जिल्ह्याच्या ठिकाणी येणे खर्चिक ठरत असल्याने कंपनीचे कर्मचारी गावोगावी जाऊन हप्ते स्वीकारतात. या कंपन्यांमध्ये स्थानिक व परिसरातील सुशिक्षित तरुण कर्मचारी म्हणून कार्यरत असून, त्यांना कर्जवसुलीसाठी कोणतेही कमिशन दिले जात नसल्याची माहितीही दिली. दरम्यान, मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या नियमांनुसार चालणाऱ्या कर्जवसुली प्रक्रियेत नियमबाह्य अडथळे निर्माण होऊ नयेत. मात्र, खासगी वित्तीय कंपन्या, काही पतसंस्था तसेच अवैध सावकारांकडून धमकी देऊन किंवा मानसिक दबाव आणून नियमबाह्य पद्धतीने कर्जवसुली केल्यास ती अजिबात खपवून घेतली जाणार नाही. अशा प्रकारे शेतकरी व कर्जदारांना त्रास देणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला.

कर्जवसुलीच्या नावाखाली कोणत्याही व्यक्तीला धमकावले जात असेल किंवा नियमबाह्य पद्धतीने त्रास दिला जात असेल, तर नागरिकांनी जिल्हा उपनिबंधक अथवा सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्यामार्फत जिल्हा प्रशासनाला तातडीने माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले. अशा प्रकरणांमध्ये पोलीस प्रशासनाला आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

हिवरा बु. येथे दिवसा घरफोडी; अवघ्या सात तासांत आरोपीला अटक

६४ हजार ९६० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास

■ प्रतिनिधी | मानोरा ■



तालुक्यातील हिवरा बु. येथे शेतातील कामासाठी संपूर्ण कुटुंब घराबाहेर गेले असताना घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने चोरणाऱ्या आरोपीला मानोरा पोलिसांनी अवघ्या सात तासांत अटक केली. विवेक कुमार मनवर असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, या कारवाईमुळे परिसरात चर्चेला उधाण आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, हिवरा बु. येथील भास्कर प्रल्हाद मनवर (वय ४५) हे ११ नोव्हेंबर रोजी सकाळी पत्नी, मुलगा व मुलगी यांच्यासह घराला कुलूप लावून शेतातील कामासाठी गेले होते. दरम्यान, अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि आलमारीचे कुलूप तोडून त्यातील सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले. शेतातील काम आटोपून भास्कर मनवर हे मानोरा येथे भाजीपाला विक्री करून घरी परतत असताना सायंकाळी त्यांच्या मुलाने फोन करून घरातील आलमारी उघडी असल्याची व दागिने चोरीला गेल्याची माहिती दिली. घरी जाऊन पाहणी केली असता सोन्याचे डोरले, मणी, मंगळसूत्रातील मणी, टॉप्स तसेच चांदीचे पायपट्टे, कडे, साखळ्या व इतर दागिने चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. चोरीस गेलेल्या सोन्याच्या दागिन्यांची किंमत ४३ हजार ३९० रुपये, तर चांदीच्या दागिन्यांची किंमत २१ हजार ५७० रुपये अशी एकूण ६४ हजार ९६० रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले.

या प्रकरणी मानोरा पोलीस ठाण्यात अप. क्र. ५९८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०५ व ३३१(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

श्री कूष्मांडनवमी महोत्सवानिमित्त भक्ती, ज्ञान, आणि संस्कृतीचा संगम साकारणार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

प.पु. विजय काका पोफळी महाराज यांची पत्रकारांना माहिती

वाशिम येथे १५ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर पर्यंत श्री वासुदेव आश्रमात श्री कूष्मांडनवमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून हा श्री कूष्मांडनवमी महोत्सव म्हणजे भक्ती, ज्ञान, आणि संस्कृतीचा संगम असणार , असे मत प.पु. विजय काका पोफळी महाराज यांनी पत्रकार परिषदेमध्ये बोलतांना व्यक्त केले.

याबाबत अधिक माहिती देतांना विजय काका पोफळी महाराज म्हणाले की, वाशिमकरांसाठी आठवडाभर चालणारा हा अध्यात्मिक महोत्सव म्हणजे अनमोल विचाराची देणगी असेल. कारण या महोत्सवात ह.भ.प. वेदमुर्ती अनंतशास्त्री मुळे, प्रधानाचार्य वेदमुर्ती श्री कृष्णशास्त्री आळंदीकर यांच्यासारखे अन्य मोठे संत भक्तगणांना चारही वेदाचे मार्गदर्शन करणार आहेत. विशेष म्हणजे या श्री कूष्मांडनवमी महोत्सवामध्ये सर्व जाती धर्माच्या लोकांना मनुष्य जन्माचे आद्यकर्तव्य कोणते? ज्ञान आणि कर्म तसेच मी कोण? अशा विविध विषयांना संत मंडळी हात घालणार असल्याने हा कार्यक्रम निश्चितच प्रत्येक माणसाच्या मनामध्ये चांगले विचार निर्माण करणारा तसेच या विचारातून आचार निर्माण करणारा असणार आहे. या महोत्सवामध्ये यावेळी कोणत्याही राजकीय पुढाऱ्यांना बोलाविण्यात आले नाही. असे परमपुज्य प.पु. विजय काका पोफळी यांनी पत्रकारांशी बोलतांना स्पष्ट केले. दरम्यान श्री वासुदेव आश्रमात कार्यक्रमामध्ये श्री भागवत संहिता पठण, श्रीमद् भागवत महात्म्य, गोकर्ण महात्म्य, मंगला चरण, तसेच विविध धार्मिक कार्यक्रम होत असणार आहेत. याचप्रकारे १९ नोव्हेंबरला श्री स्वानंद पुंड वणी, यांच्या १०० व्या पुस्तकाचे प्रकाशन देखिल होत आहे.

पाच दिवसीय खाटू श्याम जन्मोत्सवाचे आयोजन

अकोला : लाखो भक्तांचे तारणहार भगवान खाटू नरेश श्यामबाबा यांच्या पावन जन्मोत्सवा निमित्त महानगरात पाच दिवसीय भव्य खाटू श्याम जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

स्थानिक गीतानगर येथील रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिरात रामदेवबाबा-श्यामबाबा सेवा समितीच्या वतीने बुधवार दिनांक १८ नोव्हेंबर ते रविवार, दिनांक २२ नोव्हेंबर या कालावधीत हा जन्मोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या उत्सवात बाबांची भव्य भजन संध्या, अखंड ज्योत पाठ, धरती-पाताळ झाकी आणि भव्य निशाण यात्रा साकार केली जाणार आहे. जन्मोत्सवाची विधिवत सुरुवात बुधवार दिनांक १८ नोव्हेंबर रोजी बाबांची पूजा-अर्चना आणि सामूहिक आरतीने होईल.

अवैधरीत्या गोवंशाची वाहतूक करणाऱ्या दोघांवर पोलिसांची कारवाई

■ प्रतिनिधी | वाशिम ■



जिल्ह्यात अवैध गोवंश वाहतुकीविरोधात पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू केला असून, स्थानिक गुन्हे शाखा वाशिमच्या पथकाने १४ नोव्हेंबर रोजी मंगरूळपीर ते वाशिम मार्गावर कोंबळा फाट्याजवळ सापळा रचून अवैधरीत्या गोवंशाची वाहतूक करणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले. या कारवाईत आठ बैलांसह दोन महिंद्रा ?पे मालवाहू वाहने असा एकूण अंदाजे १३ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांनी जिल्ह्यातील अवैध गोवंश वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला पेट्रोलिंगदरम्यान मंगरूळपीर-वाशिम मार्गावर दोन महिंद्रा अॅपे वाहनांतून गोवंशाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने सकाळी ५.३० वाजताच्या सुमारास कोंबळा फाट्याजवळ सापळा रचून एमएच ३७ टी १९६२ आणि एमएच ०३ सीपी ५८८५ क्रमांकाची वाहने अडवून तपासणी केली.

तपासणीदरम्यान वाहनांमध्ये निर्दयतेने कोंबून ठेवलेले आठ बैल आढळून आले. वाहतुकीदरम्यान जनावरांसाठी चारा व पाण्याची कोणतीही व्यवस्था करण्यात आली नव्हती. तसेच आवश्यक कागदपत्रांशिवाय जनावरांची वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले.

या प्रकरणी मोहम्मद फैजान मोहम्मद जावेद (वय २८, रा. दरगाह चौक, बडाईपुरा, मंगरूळपीर) आणि जावेद अहमद अब्दुल रऊफ (वय ४५, रा. टेकेळीपुरा, मंगरूळपीर) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये आसेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक लता फड मॅडम, पोलीस निरीक्षक सुधाकर आढे तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक शेखर मास्कर व पोलीस अंमलदार विठ्ठल महाले, तुषार ठाकरे, संदीप दुतोंडे यांच्या पथकाने केली. जिल्ह्यात अवैध कृत्यांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणार असून, अशा प्रकारच्या बेकायदेशीर हालचालींची माहिती नागरिकांनी तातडीने पोलिसांना द्यावी, असे आवाहन स्थानिक गुन्हे शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

शिरपूर येथे क्षयरोग व एचआयव्ही तपासणी शिबिर; ५७ संशयितांची छातीची एक्स-रे तपासणी



■ प्रतिनिधी | शिरपूर ■

प्राथमिक आरोग्य केंद्र शिरपूर येथे क्षयरोग व एचआयव्ही तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश परभणकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अरिंजय बांडे व वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी शिबिराचे नियोजन केले.

तसेच लिंक वर्कर प्रशांत सूर्यवंशी व बंडू सुर्वे यांनी ३८ व्यक्तींची एचआयव्ही तपासणी केली. यावेळी डॉ. गजानन मिटकरी, सीताराम लाखाडे, भास्कर गुढदे, क्षितिज लांडगे, आशिष मोहळे, प्रवीण इंगळे, दीपिका उमरे, देशपांडे, सुरेखा मोरे, विलास कळमकर, विकास वैद्य, आकाश केंद्रे तसेच आशा कार्यकर्ती उपस्थित होत्या.

शिबिरादरम्यान उपस्थित नागरिकांना क्षयरोग व डेंग्यू आजाराची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि वेळेवर तपासणी व उपचार घेण्याचे महत्त्व याबाबत आरोग्य शिक्षण देण्यात आले.

विद्यार्थी हेच उद्याच्या राष्ट्राचे शिल्पकार - पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर

एज्यु एक्स्पो २०२६ ला थाटात प्रारंभ; पहिल्याच दिवशी विद्यार्थी-पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■



'केजी ते पीजीपर्यंतचे विद्यार्थी हेच उद्याच्या राष्ट्राचे खरे शिल्पकार आहेत. त्यांच्या बौद्धिक जडणघडणीत अशा शैक्षणिक प्रदर्शनींचे योगदान मोलाचे असते. ही प्रदर्शनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना नवी दिशा आणि नवी ऊर्जा देईल,' असा विश्वास पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी व्यक्त केला.

स्थानिक आरडीजी महिला महाविद्यालयाच्या प्रांगणात शनिवारी 'एज्यु एक्स्पो २०२६' चा मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. उद्घाटक म्हणून पालकमंत्री फुंडकर बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून खा. अनुप धोत्रे, आ. साजिदखान पठाण, माजी महापौर विजय अग्रवाल यांच्यासह आयोजन समितीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या जल्लोषात मान्यवरांनी आकाशात फुगे सोडून व फीत कापून प्रदर्शनीचे रीतसर उद्घाटन केले. विदर्भात प्रथमच होत असलेल्या या अभिनव शैक्षणिक प्रदर्शनीचे खा. अनुप धोत्रे यांनी कौतुक करून आयोजन समितीला शुभेच्छा दिल्या. विज्ञान भारतीच्या सौजन्याने दाखल झालेली इस्रोची 'स्पेस ऑन व्हील्स' ही फिरती अंतराळ प्रदर्शनी विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण ठरत असून, मान्यवरांनी तिचे उद्घाटन करून विविध स्टॉल्सची पाहणी केली.

एकाच छताखाली करिअरचे सर्व पर्याय

प्रदर्शनीत अकोला, नागपूर व पुणे येथील नामांकित शैक्षणिक व संबंधित संस्थांचे १२० वैविध्यपूर्ण स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. त्यामुळे विद्यार्थी व पालकांना शिक्षण व करिअरचे विविध पर्याय एकाच ठिकाणी जाणून घेण्याची संधी मिळत आहे. विज्ञान व रोबोटिक्स कार्यशाळांमध्ये विद्यार्थी उत्साहाने सहभागी होत आहेत.

संवाद वाढवा, दुरावा मिटवा - डॉ. वेद प्रकाश मिश्रा

शैक्षणिक व तांत्रिक व्याख्यानमालेत पहिल्या दिवशी प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ. वेद प्रकाश मिश्रा यांनी 'कल्चरल शिफ्ट' (सांस्कृतिक बदल) या विषयावर मार्गदर्शन केले. आजच्या धावपळीच्या युगात पालक आणि मुलांमध्ये वाढत चाललेला संवादाचा दुरावा कसा कमी करावा, याबाबत त्यांनी केलेल्या प्रेरणादायी मार्गदर्शनाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

रोजगाराची सुवर्णसंधी

प्रदर्शनीत सर्व स्तरांवरील नोकरी व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या 'जॉब फेअर'चे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुकांनी ''र्व्दर्त्यिदें.म्दस्र या संकेतस्थळावर त्वरित नोंदणी करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३४७ ■ रविवार, १५ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

भरधाव चारचाकीच्या धडकेत गौरव सिंह गंभीर; डोक्याला जबर दुखापत

अपघातानंतर चालक वाहनासह पसार, सेलू पोलिसांकडून तपास

सेलू जनमाध्यम : भरधाव वेगाने आलेल्या चारचाकी वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत गौरव सिंह (रा. सुकळी स्टेशन, ता. सेलू, जि. वर्धा) हे गंभीर जखमी झाले. शनिवारी, १४ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास रमना फाट्याजवळील पेट्रोल पंप परिसरात हा अपघात घडला. धडक दिल्यानंतर जखमीला मदत करण्याऐवजी संबंधित चारचाकी वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गौरव सिंह हे रमना फाटा परिसरात असताना भरधाव वेगाने आलेल्या चारचाकी वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ते रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर संबंधित वाहनचालक घटनास्थळी न थांबता वाहनासह पसार झाला.

अपघाताची माहिती मिळताच रुग्णमित्र प्रज्वल दादा लटारे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमी गौरव सिंह यांना तातडीने मदत करीत सेलू येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, डोक्याला गंभीर दुखापत असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सावंगी मेघे येथील रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान, अपघातानंतर वाहनचालक फरार झाल्याने त्याचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. अपघातग्रस्त वाहनाची ओळख पटवून चालकावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

या प्रकरणी सेलू पोलिसांकडून अपघाताचा तपास सुरू असून, अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनचालकाचा शोध घेण्यात येत आहे.

एक कोटी ९० लाखांच्या कर्जाचे आमिष;
हॉटेल व्यावसायिकाला ६.३० लाखांचा गंडा

कर्ज मंजुरीचे बनावट पत्र दाखवून विश्वास संपादन

वर्धा जनमाध्यम : एक कोटी ९० लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाल्याचे आमिष दाखवून हॉटेल व्यावसायिकाचा विश्वास संपादन करण्यात आला. त्यानंतर बँक खात्याशी संबंधित चेकचा वापर करून परस्पर ६ लाख ३० हजार रुपये काढण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार वर्ध्यात उघडकीस आला आहे. कर्ज मंजुरीचे पत्र दाखवून कागदपत्रे मिळविणे, मोबाईल बंद करण्यास सांगणे आणि त्याच दरम्यान खात्यातील रक्कम काढून घेणे, अशा संशयास्पद घटनाक्रमामुळे या प्रकरणात नियोजनबद्ध आर्थिक फसवणुकीचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी रामनगर पोलिसांनी शिवकुमार आणि विलास राखे (रा. जालना) या दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(२) आणि ३१९(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी अनिल पुरुषोत्तमराव कावळे (वय ५१, व्यवसाय हॉटेल, रा. बॅचलर रोड, मुनोत लेआउट, मेहर बाबा सेंटरजवळ, मानस मंदिर, वर्धा) यांच्या तक्रारीनुसार, २७ ऑक्टोबर रोजी सकाळी त्यांनी शिवाजी चौक येथील आयसीआयसीआय बँकेच्या खात्यातून बँक ऑफ बडोदा, इंदिरा मार्केट रोड शाखेतील स्वतःच्या खात्यात सात लाख रुपये आरटीजीएसद्वारे जमा केले होते. ही रक्कम खात्यात जमा झाल्यानंतर दुपारी सुमारास शिवकुमार त्यांच्या घरी आला. त्याने कावळे यांच्या नावाने एक कोटी ९० लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाल्याचे पत्र दाखविले. कर्जप्रक्रियेसाठी बँक खात्याचे दोन चेक द्यावे लागतील, असे सांगून त्याने चेक घेतले.

कावळे यांनी एक कॅन्सल चेक आणि दुसरा २ हजार २०० रुपयांचा चेक प्लामा डेव्हलपमेंट फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या नावाने लिहून दिला. हे दोन्ही चेक घेऊन शिवकुमार तेथून निघून गेला. मात्र, पुढे घडलेल्या घटनांनी कावळे यांना मोठा आर्थिक धक्का बसला.

२८ ऑक्टोबर रोजी सकाळी शिवकुमारने फोन करून काही कागदपत्रांवर सह्या राहिल्याचे सांगितले आणि त्यांना पुलगाव येथे बोलावले. कावळे वर्ध्यातून पुलगावकडे जात असताना दहेगावजवळ

चेकच्या आधारे दुसऱ्यानेच काढली रक्कम, रामनगर पोलिसांत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

शिवकुमारचा पुन्हा फोन आला. कंपनीकडून कर्ज खात्याचा यूजर आयडी मिळाला काय, अशी विचारणा त्याने केली. यूजर आयडी मिळाला नसल्याचे सांगताच त्याने कावळे यांना मोबाईल बंद करण्यास सांगितले. कावळे यांनी त्याच्या सांगण्याप्रमाणे मोबाईल बंद केला आणि पुढील प्रवास सुरू ठेवला.

पुलगाव येथे पोहोचल्यानंतर मोबाईल सुरू करून शिवकुमारशी संपर्क साधला असता, त्याने आणखी दोन तास लागतील, तुम्ही वर्ध्याला परत जा, फोनवरच काम करून देतो, असे सांगितले. त्यानुसार कावळे वर्ध्याला परतले. त्यानंतर मोबाईलवरील संदेश तपासले असता बँक ऑफ बडोदा खात्यातून तब्बल ६ लाख ३० हजार रुपये काढण्यात आल्याचा संदेश त्यांच्या निदर्शनास आला. क्षणातच त्यांच्या पायाखालची जमीन सरकली.

कावळे यांनी तातडीने बँकेत धाव घेऊन व्यवस्थापकांकडे विचारणा केली. त्यावेळी विलास राखे नामक व्यक्तीने चेक सादर करून त्यांच्या खात्यातून सहा लाख ३० हजार रुपये काढल्याचे सांगण्यात आले. विशेष म्हणजे, विलास राखे याच्या नावाने आपण कोणताही चेक दिलेला नाही आणि त्या व्यक्तीला आपण ओळखतही नसल्याचे कावळे यांनी स्पष्ट केले. बँक व्यवस्थापकांनी संबंधित व्यक्तीचे आधारकार्ड दाखविल्याचेही तक्रारीत नमूद आहे. एवढी मोठी रक्कम चेकद्वारे काढताना खातेदाराशी साधी दूरध्वनीवरून पडताळणीदेखील करण्यात आली नाही, असा आक्षेप कावळे यांनी घेतला. एक लाख रुपये काढतानाही खातेदाराला फोन करून खात्री केली जाते, मग सहा लाख ३० हजार रुपये काढताना चौकशी का झाली नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मात्र, खाते चालू स्वरूपाचे असल्याने विचारपूस केली नसल्याचे बँकेकडून सांगण्यात आल्याचा दावा त्यांनी तक्रारीत केला आहे.

दरम्यान, कर्जप्रकरणात मध्यस्थी करणारे मित्र प्रवीण खापरे यांच्याशी संपर्क साधल्यानंतर शिवकुमारशी बोलणे झाल्याचे त्यांनी सांगितले. विलास राखे हा कंपनीचा कर्मचारी असून त्यानेच चेकद्वारे रक्कम काढली आहे आणि कंपनीकडून पैसे परत केले जातील, असे शिवकुमारने सांगितल्याचे प्रवीण खापरे यांनी कळविले. मात्र, पाच ते सात दिवस उलटूनही रक्कम परत आली नाही. शिवकुमारचाही मोबाईल बंद येऊ लागल्याने आपली फसवणूक झाल्याचे कावळे यांच्या लक्षात आले.

शिवकुमारने विलास राखे याला हाताशी धरून प्लामा कंपनीचा कर्मचारी असल्याचा बनाव केला आणि पूर्वनियोजित कट रचून चेकच्या माध्यमातून खात्यातील सहा लाख ३० हजार रुपये काढून घेतले, असा आरोप फिर्यादीने केला आहे. तसेच बँकेच्या कर्मचाऱ्यांनी योग्य पडताळणी न करता एवढी मोठी रक्कम दिल्याने आपले आर्थिक नुकसान झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

या प्रकरणी १३ नोव्हेंबर रोजी दुपारी १. वाजता रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस कर्मचारी मुंडे करीत आहेत.

भाऊबीजेच्या आनंदावर काळाची झडपः माहेरी निघालेल्या कुटुंबाचा भीषण अपघात

तीन वर्षांच्या अनन्याचा मृत्यू, आई-वडील अन् पाच वर्षांचा भाऊ गंभीर

विरूळ आकाजी जनमाध्यम : दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह आणि नात्यांचा गोडवा! भाऊबीजेच्या निमित्ताने माहेरी जाणाऱ्या प्रत्येक बहिणीच्या मनात आनंदाचे असंख्य क्षण फुललेले असतात. मात्र, याच आनंदाच्या प्रवासात एका कुटुंबाच्या आयुष्याचा काळाने क्रूरपणे घास घेतला. भाऊबीजेसाठी सासरी निघालेल्या आहाके कुटुंबाच्या दुचाकीला समृद्धी महामार्गाच्या पुलाजवळ भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत अवघ्या तीन वर्षांच्या चिमुकली अनन्याचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर आई-वडिलांसह पाच वर्षीय भाऊ गंभीर जखमी झाला. दिवाळीच्या आनंदावर या घटनेने दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



देवळी येथील नरेश आहाके हे पत्नी मीरा, पाच वर्षीय मुलगा रुद्रेश आणि तीन वर्षीय मुलगी अनन्या यांच्यासह दुचाकीने तळेगाव शामजीपंत येथे भाऊबीज साजरी करण्यासाठी जात होते. पुलगाव-आर्वी मार्गाने प्रवास सुरू असताना विरूळ परिसरातील समृद्धी महामार्गाच्या पुलाखाली हनुमान मंदिर, ठाणेगाव परिसरात अचानक दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि भीषण अपघात घडला.

अपघाताची तीव्रता एवढी होती की, चिमुकली अनन्याचा डोक्याला गंभीर दुखापत झाली. या दुर्घटनेत तिचा मृत्यू झाला. नरेश आहाके, मीरा आहाके आणि रुद्रेश हे तिघेही गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी पुलगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून उपचार सुरू आहेत.

भाऊबीजेच्या ओवाळणीसाठी माहेरी निघालेल्या या कुटुंबाला नियतीने वाटेतच गाठले. ज्या घरात दिवाळीचा आनंद आणि भाऊबीजेची तयारी सुरू होती, तिथे आता चिमुकलीच्या मृत्यूने शोककळा पसरली आहे. पाच वर्षांच्या भावाच्या डोक्यावरून बहिणीचे छत्र हरपले, तर आई-वडिलांवर आपल्या काळजाच्या तुकडीला गमावण्याची वेळ आली. या हृदयद्रावक घटनेने विरूळ परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

या अपघाताचा पुढील तपास पुलगाव पोलीस ठाण्याचे सागर होले करीत आहेत.

पाच वर्षांच्या चिमुकल्याला मिळाले नवजीवन

एव्हीबीआरएचमध्ये जन्मजात हृदयविकारावर जटिल शस्त्रक्रिया यशस्वी

वर्धा जनमाध्यम: जन्मजात गंभीर हृदयविकाराशी झुंज देणाऱ्या पाच वर्षीय चिमुकल्यावर आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात (एव्हीबीआरएच) अत्यंत गुंतागुंतीची हृदयशस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. फॉन्टन कंप्लीशन सर्जरीनंतर बालकाची प्रकृती स्थिर झाली असून त्याला रुग्णालयातून सुटी देण्यात आली. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे एका कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.



या बालकाला ट्रायकस्पिड एट्रेशिया हा जन्मजात हृदयविकार होता. या आजारात हृदयाची उजवी बाजू पूर्णपणे विकसित होत नाही. त्यामुळे बालपणात दोन ते तीन टप्प्यांत जटिल शस्त्रक्रिया कराव्या लागतात. आर्थिक अडचणी आणि मोठ्या शहरांतील रुग्णालयांची प्रतीक्षा यामुळे पालकांसमोर उपचारांचे मोठे आव्हान होते. बालहृदय शल्यचिकित्सक डॉ. गौरी दातार यांनी शस्त्रक्रियेचे यशस्वी केली. भूल व आतिदक्षता विभागाची जबाबदारी डॉ. भक्ती पाटील यांनी सांभाळली.

बालकाची पहिल्या टप्प्यातील शस्त्रक्रिया मुंबई येथे झाली होती. मात्र, अंतिम शस्त्रक्रियेसाठी पालक अनेक महिन्यांपासून प्रतीक्षेत होते. अखेर त्यांनी वर्ध्यातील एव्हीबीआरएचमध्ये उपचार घेण्याचा निर्णय घेतला. बालहृदयरोग तज्ज्ञ डॉ. वैभव राऊत आणि डॉ. शंतनू गोमासे यांनी तपासणी केल्यानंतर बालहृदय शल्यचिकित्सक डॉ. शैलेश बोरकर यांच्या मार्गदर्शनात शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर बालकाला कार्डियाक आयसीयूमध्ये विशेष देखरेखीखाली ठेवण्यात आले. कोणतीही गुंतागुंत न होता त्याची प्रकृती सुधारली.

ग्रामीण भागातच अशा जटिल शस्त्रक्रिया उपलब्ध होत असल्याने विदर्भातील गरजू कुटुंबांसाठी ही दिलासादायक बाब ठरली आहे. या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी आणि रुग्णालय प्रशासनाने संपूर्ण वैद्यकीय पथकाचे कौतुक केले.

आता आर्वीत राजकीय फटाके फुटणार?

आर्वी जनमाध्यम : आर्वी विधानसभा मतदारसंघातील राजकारणात दिवाळीनंतर मोठी उलथापालथ होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. भाजपचे माजी आमदार दादाराव केचे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमर काळे यांच्यातील जवळीक सध्या राजकीय चर्चेचा विषय ठरत आहे. दिवाळीनिमित्त आयोजित एका कार्यक्रमात या दोन्ही नेत्यांमध्ये झालेली प्रदीर्घ चर्चा अनेकांच्या भुवया उंचावणारी ठरली. या भेटीत नेमकी कोणत्या विषयावर चर्चा झाली, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नसली तरी आर्वीच्या राजकारणात नव्या समीकरणांची जुळवाजुळव सुरू झाल्याची चर्चा रंगू लागली आहे.

दादाराव केचे हे आर्वी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आहेत. मात्र, अलीकडच्या राजकीय घडामोडींमध्ये विद्यमान आमदार सुमित वानखेडे यांच्याशी निर्माण झालेल्या राजकीय अंतरामुळे केचे यांच्या भूमिकेकडे विशेष लक्ष लागले आहे.

भाजपमध्ये आपली राजकीय भूमिका आणि स्थान याबाबत केचे समर्थकांमध्येही अस्वस्थता असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात ऐकायला मिळत आहे. पक्षांतर्गत घडामोडींमुळे केचे नाराज असल्याचे बोलले जात असतानाच त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील संभाव्य प्रवेशाच्या चर्चेने जोर धरला आहे. याच पार्श्वभूमीवर खासदार अमर काळे यांच्याशी झालेली त्यांची भेट महत्त्वाची मानली जात आहे. दोन्ही नेत्यांमधील चर्चेचा तपशील गुलदस्त्यात असला तरी या भेटीला केवळ दिवाळीच्या शुभेच्छांची औपचारिक भेट समजायचे की त्यामागे राजकीय गणित दडले आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



केचे राष्ट्रवादीच्या वाटेवर?

आर्वी मतदारसंघात दादाराव केचे यांचा स्वतंत्र राजकीय प्रभाव आणि कार्यकर्त्यांचे जाळे आहे. अशा परिस्थितीत त्यांनी भाजपपासून अंतर राखण्याचा निर्णय घेतला किंवा अन्य राजकीय पर्याय स्वीकारला, तर स्थानिक राजकारणात त्याचे पडसाद उमटू शकतात. खासदार अमर काळे यांच्याशी वाढणारा संवाद भविष्यातील राजकीय समीकरणांचा भाग आहे का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे, सुमित वानखेडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपची सध्याची वाटचाल सुरू असताना केचे यांची पुढील भूमिका काय असेल, हा पक्षांतर्गत चर्चेचा विषय बनला आहे. केचे समर्थकांची भूमिका, राष्ट्रवादी काँग्रेसची संभाव्य रणनीती आणि खासदार अमर काळे यांची भूमिका या तीन बाबी आगामी घडामोडींच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणार आहेत. दिवाळीच्या रोषणाईत झालेली ही राजकीय भेट आर्वीच्या राजकारणात नव्या समीकरणांची ठिणगी ठरणार का? केचे भाजपमध्येच राहणार की राष्ट्रवादीचा पर्याय स्वीकारणार? याची उत्तरे अद्याप गुलदस्त्यात आहेत. मात्र, दिवाळीनंतर आर्वीच्या राजकीय पटावर काही अनपेक्षित घडामोडी घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पक्षीसप्ताहात ९० हून अधिक पक्षीप्रजातींची नोंद

बहार, वन विभागाचा संयुक्त उपक्रम; बोर व्याघ्र प्रकल्पात सप्ताहाचा समारोप

वर्धा जनमाध्यम : बहार नेचर फाउंडेशन, वन विभाग आणि बोर व्याघ्र प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने ५ ते १२ नोव्हेंबरदरम्यान आयोजित पक्षीसप्ताहात विविध अधिवासांमध्ये ९० हून अधिक पक्षीप्रजातींची नोंद करण्यात आली. पक्ष्यांची जैवविविधता, त्यांचे अधिवास आणि संवर्धनाविषयी जनजागृती करणाऱ्या या उपक्रमाचा समारोप बोर व्याघ्र प्रकल्पातील धनेश निसर्ग पर्यटन सभागृहात झाला.



समारोप कार्यक्रमात नागपूरच्या सेंट्रल इंडिया बर्ड अकॅडमीचे सदस्य नितीन मराठे यांनी 'पाणपक्ष्यांची ओळख', तर अनंत हिंगवे यांनी 'मध्यभारतातील शिकारी पक्षी' या विषयांवर छायाचित्रांसह मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहार नेचर फाउंडेशनचे अध्यक्ष संजय इंगळे तिगावकर होते. वनपरिक्षेत्र अधिकारी नितीन बोरकर, अर्चना नौकरकार, ज्ञानेश्वर गजबे, शालिनी शिरपूरकर, मीनल तुरखडे आणि प्रा. किशोर वानखडे यांची उपस्थिती होती.

रमाबाई तांबसकर यांचे निधन

मागील वर्षापर्यंत शहीद स्मारकावर करीत होत्या ध्वजारोहण; आष्टीच्या स्वातंत्र्यलढ्याच्या आठवणींना उजाळा

आष्टी (शहीद) जनमाध्यम : आष्टी (शहीद) येथील स्वातंत्र्यसंग्राम सैनिक स्व. भाऊरावजी तांबसकर यांच्या पत्नी रमाबाई भाऊराव तांबसकर यांचे शनिवार, १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.४५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.



रमाबाई तांबसकर यांचे जीवन आष्टीच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासाशी जोडलेले होते. स्वातंत्र्यसंग्राम सैनिक स्व. भाऊरावजी तांबसकर यांच्या सहचारिणी म्हणून त्यांनी स्वातंत्र्यलढ्याच्या आठवणी जपल्या. पतीच्या देशसेवेचा वारसा आणि स्वातंत्र्यलढ्याशी असलेली नाळ त्यांनी अखेरपर्यंत जिवंत ठेवली. विशेष म्हणजे, मागील वर्षापर्यंत त्या आष्टी येथील शहीद स्मारकावर आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमात सहभागी होत राष्ट्रध्वजाला वंदन करीत होत्या. त्यांच्या उपस्थितीमुळे स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृतींना उजाळा मिळत असे.

त्यांच्या निधनाने आष्टीच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासाशी प्रत्यक्ष नाते असलेले एक ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या निधनाबद्दल परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

त्यांची अंत्ययात्रा रविवार, १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता आष्टी (शहीद) येथील राजेश तांबसकर यांच्या राहत्या घरून निघणार आहे.

पोलीस क्राईम डायरी

शेतीच्या पैशांवरून मामाने भाचीलाच लोखंडी रॉडने मारले

वर्धा : शेतीच्या पैशांच्या वादातून मामाने भाचीलाच लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केल्याची घटना बोरगाव गिट्टीखदान येथे घडली. छाया योगेश चतुर्वेदी (३१) असे जखमी महिलेचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, छाया या मुलगी आणि आजीसोबत राहतात. आरोपी त्यांचा मामा असून तो घराच्या मागे राहतो. १२ नोव्हेंबरच्या रात्री आजी सुमित्रा यांना मिळालेल्या शेतीच्या पैशांची मागणी आरोपीने केली. यावरून वाद घालत त्याने शिवीगाळ केली. त्यानंतर हातातील लोखंडी रॉडने छाया यांच्या डाव्या कानामागे, दोन्ही खांद्यांवर आणि पायांवर वार केले. यात त्या जखमी झाल्या. त्यांच्या तक्रारीवरून सावंगी मेघे पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

कंपनीच्या वरिष्ठांना अश्लील ई-मेल;माजी कर्मचाऱ्यावर गुन्हा

वर्धा : नोकरीवरून कमी केल्याच्या रागातून कंपनीतील महिला कर्मचारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना अश्लील व अपमानास्पद मजकूर असलेले ई-मेल पाठविल्याचा प्रकार देवळी येथे उघडकीस आला आहे. याप्रकरणी दिनेश कुमार सिंह हर्ष नारायण सिंह (३१, रा. समतानगर, वर्धा) याच्याविरुद्ध देवळी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपी यापूर्वी एसएमडब्ल्यू इस्पात प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत कार्यरत होता. काही कारणास्तव त्याला नोकरीवरून कमी करण्यात आले होते. त्यानंतर १३ नोव्हेंबर रोजी त्याने कंपनीतील महिला कर्मचारी तसेच तिच्या २० ते २२ वरिष्ठ अधिकाऱ्यांना उद्देशून अश्लील आणि अपमानास्पद शब्दांचा वापर करीत ई-मेल पाठविले. त्यामुळे संबंधितांना मानसिक त्रास सहन करावा लागल्याचे तक्रारीत नमूद आहे. लेखी तक्रारीवरून पोलिसांनी कारवाई केली.

दुचाकीला कारने कट मारून ठार मारण्याचा प्रयत्न

वर्धा : जुन्या वादातून आणि कौटुंबिक संबंधांच्या रागातून दुचाकीस्वाराला कारने धडक देत ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना देवळी-सोनगाव आबाजी मार्गावर घडली. प्रवीण प्रकाशराव कामठी (३०, रा. कामठी चौक, देवळी) यांनी याप्रकरणी तक्रार दिली. पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादीची पत्नी मागील दोन महिन्यांपासून सोनू विश्वकर्मा याच्यासोबत राहत आहे. याच कारणावरून सोनू हा फिर्यादीला व्हॉट्स?प कॉलद्वारे जिवे मारण्याच्या धमक्या देत होता. १२ नोव्हेंबरला फिर्यादी दुचाकीने जात असताना इंडियन ऑईल पेट्रोलपंपाजवळ आरोपीने मित्रांसह स्विफ्ट डिझायर कारने मागून येत दुचाकीला जोरदार कट मारला. यात फिर्यादी किरकोळ जखमी झाले. देवळी पोलिसांनी गुन्हा दाखल करून गौरव कंवलदास व अनिल ठाकरे यांना अटक केली. पुढील तपास सुरू आहे.

तरुणीला शिवीगाळ; शेजाऱ्याविरुद्ध गुन्हा

पुलगाव : जुन्या वादाचा राग मनात धरून तरुणीला अश्लील शिवीगाळ करीत कुटुंबाला धमकी दिल्याप्रकरणी रोशन कराळे याच्याविरुद्ध पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पीडित तरुणी (२३, रा. हरिरामनगर, पुलगाव) ही शिक्षण घेत आहे. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी दहाच्या सुमारास आरोपी तिच्या घरासमोरील रस्त्यावर आला. जुन्या भांडणाच्या कारणावरून त्याने तरुणी आणि तिच्या कुटुंबीयांशी वाद घालण्यास सुरुवात केली. तरुणीने जाब विचारला असता आरोपीने तिला अश्लील भाषेत शिवीगाळ केली. तसेच तुम्हाला पाहून घेईल, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. यावेळी परिसरातील काही महिला उपस्थित होत्या. आरोपीकडून यापूर्वीही त्रास दिला जात असल्याचा आरोप तरुणीने केला आहे. तिच्या तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी गुन्हा नोंदविला.

हिंगणघाटात जुगार अड्ड्यावर छापा; ४,६२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त

हिंगणघाट : आठवडी बाजारातील शिवमंदिर परिसरात सुरू असलेल्या जुगारावर पोलिसांनी छापा टाकून रोख रकमेसह मोबाईल आणि जुगाराचे साहित्य जप्त केले. याप्रकरणी सुरेश बाजीराव चिरकुटे (६८, रा. रामनगर वॉर्ड, हिंगणघाट) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ नोव्हेंबर रोजी दुपारी आठवडी बाजारातील शिवमंदिर परिसरात जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारवाई केली. घटनास्थळावरून ३ हजार ६२० रुपयांची रोख रक्कम, अंदाजे एक हजार रुपये किमतीचा जुना मोबाईल, पाच रुपयांचा पेन आणि जुगाराचे आकडे लिहिलेले चार कागद असा एकूण ४ हजार ६२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई केली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

भारताचा पाकिस्तानवर एका विकेटने रोमहर्षक विजय! U19 आशिया चषक चॅम्पियन ठरले



नवी दिल्ली/वृत्तसंस्था- भारताच्या अंडर-१९ संघाने रोमहर्षक सामन्यात पाकिस्तान संघावर एका विकेटने दणदणीत विजय मिळवला. भाराताला अखेरच्या चेंडूत ३ धावांची गरज असताना गोलंदाज मोहित उल्वाने दणदणीत चौकार मारला आणि टीम इंडियाच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. लक्ष्य रायचंदानी-आर्यवीर सेहवाग व मनल चौहान-मोहित उल्वा यांच्या भागीदारीच्या बळावर टीम इंडियाने गतवर्षीच्या अंडर-१९ संघाच्या पराभवाचा बदला घेत जेतेपदावर नाव कोरलं. गतवर्षी पाकिस्तान अंडर-१९ संघाने भारत अंडर-१९ संघाचा फायनलमध्ये पराभव केला होता.भाराताला विजयासाठी १८ चेंडूत ३० धावांची गरज असताना मनल चौहान व मोहित उल्वा यांनी अर्धशतकी भागीदारी साकारत खेळत होते. पण ४८व्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात मनल चौहान ४७ धावांवर झेलबाद झाल्याने भारताला मोठा धक्का बसला. यासह भारताने ९ विकेट्स गमावल्या होत्या, म्हणजे १ विकेट गमावली तर भारत सर्वबाद अशी स्थिती ओढवली. मोहित उल्वाने चौकार व षटकाराने ४९व्या षटकाची सुरूवात केली आणि यानंतर चिगुरूपति वेंकटाने चौकार लगावला, यासह या षटकात भारताने १७ धावा कुटल्या. आता भारताला विजयासाठी ६ चेंडूत ८ धावांची गरज होती. १-१ धाव काढत

पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना उस्मान खानच्या १०७ धावांच्या चर अब्दुल कादीरच्या झटपट ८० धावांच्या खेळीच्या बळावर ३३७ धावांचा डोंगर उभारला. पाकिस्तानच्या टॉप-५ फलंदाजांनी संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. तर प्रत्युत्तरात भारताने सावध व चांगली सुरूवात केली होती, पण पाकिस्तानच्या गोलंदाजीसमोर भारताने ठराविक अंतराने विकेट्स गमावल्या आणि अखेरच्या षटकांमध्ये ९ विकेट्स गमावले असतानाही मोहित उल्वा, मनन चौहान व चिगुरूपति वेंकट यांनी संघाला एका विकेटने विजय मिळवून दिला.पाकिस्तानने दिलेल्या ३३८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने सावध सुरूवात केली. आर्यवीर सेहवाग व लक्ष्य रायचंदानी यांनी पहिल्या विकेटसाठी ९५ धावांची भागीदारी केली. आर्यवीर सेहवागने शानदार ५८ धावांची खेळी केली, तर लक्ष्य रायचंदानीने ८० धावा केल्या. यानंतर विनीतने २४ धावांचं योगदान दिलं, तर अर्जुन राजपूतने १६ धावा केल्या. यानंतर अन्वय द्रविडने येताच ३ चौकार मारत त्याने १९ धावा केल्या, तितक्यात लक्ष्य रायचंदानी बाद झाला आणि पुढच्याच चेंडूवर अन्वय धावबाद झाल्याने संघावर पुन्हा एकदा दबाव आला.त्यानंतर आर्यन व काव्य पटेल झटपट बाद झाले. पण मनल चौहान व मोहित उल्वा या जोडीने चौकार-षटकारांच्या मदतीने झटपट अर्धशतकी खेळी साकारली.

पाकिस्तानने सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेत धावांचा डोंगर उभारला. पाकिस्तानकडून सलामीवीर उस्मान व हयाम खान यांनी पहिल्या विकेटसाठी ६२ धावांची भागीदारी केली. उस्मान खानने या सामन्यात ११ चेंजूत ११ चौकार व ३ षटकारांच्या मदतीने १०७ धावांची उत्कृष्ट खेळी साकारली. यानंतर अब्दुल कादीरने ५४ चेंडूत ३ चौकार व तब्बल ८ षटकारांसह वेगवान ८० धावा केल्या आणि संघाला मोठी धावसंख्या उभारण्यात मोलाची भूमिका बजावली. अब्दुल व उस्मानने दुसऱ्या विकेटसाठी १३५ धावांची भागीदारी केली. यानंतर आलेल्या कर्णधार फरहान युसूफने ६० चेंडूत ६३ धावा केल्या. अहमद हुसैनने १७ धावांचं योगदान दिलं आणि यानंतर इतर सर्व फलंदाज झटपट माघारी परतले. पाकिस्तानने काव्य पटेलने ४ विकेट्स आणि चिगुरूपति व्यंकटा याने ३ विकेट्स घेतल्या. याशिवाय अर्जुन राजपूतने १ विकेट घेत योगदान दिलं.

'रामायण'चा बॉक्स ऑफिसवर महाविक्रम!



मुंबई : रणबीर कपूरच्या 'रामायण: राइज ऑफ अ लेजेंड' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धडाकेबाज कामगिरी सुरुच ठेवली आहे. प्रदर्शनाच्या अवघ्या नवव्या दिवशी या चित्रपटाने विकी कौशलच्या 'छावा' चित्रपटाचा भारतातील कमाईचा विक्रम मोडला आहे. विशेष म्हणजे, जगभरातील कमाईनेही १,१०० कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. त्यामुळे 'रामायण'ने बॉक्स ऑफिसवर नवा इतिहास रचला आहे. चित्रपटाने नवव्या दिवशी भारतात ४७.८५ कोटी रुपयांची कमाई केली. यामुळे भारतातील एकूण कमाई ६१२.४५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. यापूर्वी विकी कौशलच्या 'छावा' चित्रपटाने भारतात एकूण ६०१.५७ कोटी रुपयांची कमाई केली होती. आता 'रामायण'ने हा आकडा मागे टाकला आहे. नवव्या दिवशी 'रामायण'चे देशभरात २२,९९३ शो झाले. यामध्ये हिंदी भाषेतील शोमधून सर्वाधिक कमाई झाली. हिंदी आवृत्तीने ३६.२५ कोटी रुपये कमावले. तर मल्याळम भाषेतून ३.२५ कोटी, कन्नडमधून ३ कोटी, तमिळमधून २.७५ कोटी आणि तेलुगूमधून २.६० कोटी रुपयांची कमाई झाली.चित्रपटाची भारतातील एकूण ग्रॉस कमाई आता ७३२.२० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. तर परदेशातील कमाईनेही चांगली आघाडी घेतली आहे. नवव्या दिवशी परदेशात चित्रपटाने २५ कोटी रुपयांची कमाई केली. त्यामुळे परदेशातील एकूण ग्रॉस कमाई ३७८.५० कोटी रुपयांवर गेली आहे. भारत आणि परदेशातील कमाई मिळून चित्रपटाचा जगभरातील एकूण गल्ला १,११०.७० कोटी रुपये झाला आहे. याआधी 'रामायण'ने शाहरुख खानच्या 'पठाण' आणि रणबीर कपूरच्याच 'निमल' या चित्रपटांचे भारतातील कमाईचे विक्रमही मोडले आहेत. 'पठाण'ने भारतात ५४४.२८ कोटी, तर 'निमल'ने ५५६.३६ कोटी रुपयांची कमाई केली होती.

मुलाकडून वृद्ध आईची हत्या



मुंबई : घरखर्चावरुन होर्णा-या भांडणातून रागाच्या भरात एका तरुणाने त्याच्याच वृद्ध आईची बेदम मारहाण करुन हत्या केली. हल्ल्यात जखमी झालेल्या साधना भोलेनाथ कारंडे या ६२ वर्षांच्या महिलेचा शुक्रवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे बांगुरनगर पोलिसांनी आता आरोपी मुलगा अभिषेक भोलेनाथ कारंडेवर (२८) हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. याच गुन्ह्यांत तो सध्या पोलीस कोठडीत असून त्याची पोलिसांकडून चौकशी सुरु आहे. साधना तिच्या पती आणि मुलांसोबत गोरेगाव येथील लक्ष्मीनगर, महाकाली मंदिरामागील पुर्नवासी गल्लीतील रुम क्रमांक सातमध्ये राहत होती. गेल्या वर्षी तिला अर्धांगवायू झाल्याने ती घरीच असते. तिचा मोठा मुलगा प्रथमेश हा राजस्थान येथे राहत असून अभिषेक हा तिचा लहान मुलगा आहे. त्याला दारु पिण्याचे व्यसन होते. त्यातून तो घरात शिवीगाळ करुन सर्वांशी वाद घालण्याचा प्रयत्न करत होता. गेल्या आठवड्यात प्रथमेश दिवाळी सणानिमित्त मुंबईत आला होता.

राष्ट्रवादी काँग्रेस भाजपसोबत जाणार नाही ; काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ



मुंबई /प्रतिनिधी- भाजपच्या धोरणांमुळे देशाचे मोठे नुकसान झाले आहे, हे सत्य आता सर्वांनीच स्वीकारले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष भाजपसोबत जाण्याचा कोणताही निर्णय घेईल, असे मला वैयक्तिकरीत्या वाटत नाही, असे मत काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांनी नवी मुंबईत व्यक्त केला.

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने राज्यभर दोन दिवसीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत वाशी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी शिक्षण, बेरोजगारी, फोन टॅपिंग आणि राज्यातील सद्यस्थितीतील राजकारणावर भाष्य केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबाबत सुरू असलेल्या चर्चांवर बोलताना सपकाळ म्हणाले की, या प्रश्नावर सध्या भाष्य करणे योग्य ठरणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हा 'इंडिया' आघाडीचा महत्त्वाचा घटक आणि काँग्रेसचा विश्वासू मित्रपक्ष आहे. आघाडीची जी भूमिका असेल, ती त्यांना नक्कीच मान्य असेल. त्यांच्या नेत्यांनी या विषयावर केलेल्या वक्तव्यावर आपण विश्वास ठेवला पाहिजे. तसेच, केवळ विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांपुरते मर्यादित न राहता राजीव गांधींनी आणलेले स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी देण्याचे धोरण पुढे नेण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

शिक्षण आणि बेरोजगारीच्या मुद्द्यावर बोलताना सपकाळ यांनी केंद्र सरकारवर टीका केली. शिक्षण हे समाजाशी जोडले जावे, ही महात्मा गांधींची संकल्पना होती; परंतु स्पर्धा आणि भांडवलशाहीच्या युगात आपण त्यापासून दूर जात आहोत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दरवर्षी दोन कोटी रोजगार देण्याची घोषणा केली होती. त्यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात २४ कोटी रोजगार निर्माण व्हायला हवे होते. मात्र, सरकारला स्वत:च्या आश्वासनाचा विसर पडला असून नवीन नोक-या मिळण्याऐवजी सध्या कार्यरत असलेल्यांचेही रोजगार जात आहेत. नव्या तरुणांसमोर आणि शिक्षण व्यवस्थेसमोर हे मोठे संकट आहे, असेही सपकाळ म्हणाले.

कोठी-कोरणार पूल दुर्घटनेची चौकशी कागदावरच

समिती जिल्ह्यात फिरकलीच नाही; जबाबदार अधिकारी अन् कंत्राटदार अद्याप दाखल झालेली नाही.

आयआयटी मुंबईच्या प्रा. सोविक बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीला ३० दिवसांत अहवाल देण्याचे होते निर्देश



गडचिरोली /प्रतिनिधी- कोठी-कोरणार पुलाच्या दुर्घटनेने सार्वजनिक बांधकाम विभागातील कथित अनियमितता आणि बांधकामाच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आणला होता. पूल कोसळल्यानंतर विविध राजकीय संघटनांनी आंदोलने करीत दोषींवर कारवाईची मागणी केली. शासनाने तीन सदस्यीय चौकशी समिती गठीत केली. मात्र, समिती स्थापन होऊन तीन महिने उलटले तरी ती समिती अद्याप गडचिरोली जिल्ह्यात दाखल झालेली नाही. दुर्घटनेची प्रत्यक्ष चौकशीही सुरू झालेली नसल्याने हे प्रकरण दडपण्याचे प्रयत्न होत आहेत काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

कोठी-रेंगानदी-पिपळीगुंडी-कोरणार मार्गावरील बांडीया नदीवरील हा पूल १५ ऑगस्ट २०२३ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पित करण्यात आला होता. मात्र, ३१ जुलै २०२६ रोजी पुराच्या पाण्यामुळे हा पूल कोसळला. अवघ्या तीन वर्षांत कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेली वास्तू जमीनदोस्त झाल्याने बांधकामाचा दर्जा, वापरण्यात आलेले साहित्य आणि देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले. विरोधकांनी मुख्यमंत्र्यांवर टीकेची झोड उठवली होती. तरीही प्रशासन अधिकाऱ्यांना वाचविण्यासाठी धडपडत होते. विशेष म्हणजे, पुलाच्या दुर्घटनेनंतर विभागाकडून पावसामुळे पूल कोसळल्याचे हास्यास्पद स्पष्टीकरण देण्यात आले होते. मात्र, नैसर्गिक आपत्तीच्या नावाखाली बांधकामातील त्रुटी आणि जबाबदारी झटकता येणार नाही, अशी भूमिका विविध संघटनांनी घेतली होती. या प्रकरणात तत्कालीन अधीक्षक अभियंता नीता ठाकरे यांच्यावरही आरोप झाले. त्यानंतर त्यांच्याकडील पदभार काढण्यात आला. मात्र, ही प्रशासकीय कारवाई वगळता कोणत्याही जबाबदार अधिकाऱ्यावर ठोस कारवाई झालेली नाही. संबंधित कंत्राटदारावरही कारवाई झाली नाही. दरम्यान, २१ ऑगस्टच्या शासन निर्णयानुसार आयआयटी मुंबईचे स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे प्रा. सोविक बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीला ३० दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश होते. मात्र, समितीने अद्याप घटनास्थळाची पाहणीही केलेली नसल्याची स्थिती आहे. कोट्यवधींच्या सार्वजनिक निधीतून उभारलेला पूल कोसळूनही चौकशी नाही, कारवाई नाही आणि कंत्राटदारावरही जबाबदारी निश्चित नाही. त्यामुळे गडचिरोलीत भ्रष्टाचाराचा 'गडचिरोली पॅटर्न' रुजत आहे काय, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. दुर्घटनेचा तपास आणि दोषनिश्चिती नेमकी कधी होणार, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

राष्ट्रवादीचे विलीनीकरण ही एक दंतकथा, लवकरच कथेचा फुलस्टॉप !



मुंबई /प्रतिनिधी: राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चा या केवळ दंतकथा आहेत. त्यावर येत्या एक-दोन दिवसांत फुलस्टॉप लागलेला दिसेल असा विश्वास शिवसेना ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी व्यक्त केला. संसदीय कार्यसमितीच्या बैठकांमध्ये ४० ते ४५ लोक सहभागी असतात. त्या बैठकांमध्ये काय पक्षांच्या विलीनीकरणाची चर्चा होऊ शकते का असा सवालही त्यांनी केला.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहेत. सुप्रिया सुळे यांनी यावर आता आपल्याकडून फुलस्टॉप लागल्याचे स्पष्ट केले आहे. संजय राऊत यांनी देखील हाच मुददा मांडला आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण या केवळ दंतकथा आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस एकच आहे ती म्हणजे शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील, दुसरा गट हा अमित शहा यांचा गट आहे. शरद पवार,सुप्रिया सुळे, जयंत पाटील ज्या विचारधारेने काम करतात त्यात अमित शहा यांचा गट कुठेच बसत नाही. त्यामुळे या दंतकथेवर येत्या एक-दोन दिवसांत फुलस्टॉप लागलेला दिसेल असे संजय राऊत म्हणाले. या बैठकीत काय विलीनीकरणाच्या चर्चा होतात का

सुप्रिया सुळे, प्रफुल पटेल, सुनिल तटकरे हे शुक्रवारी दिल्लीत होते. त्यावेळी चर्चा झाल्याच्या वावडया होत्या. त्याबाबत राऊत म्हणाले, संसदीय कार्यसमितीच्या बैठकांमध्ये ४० ते ४५ लोक हजर असतात. तिथे अशा प्रकारची चर्चा होऊ शकते का. अमित शहांसोबत अशा बैठकांना मी देखील हजर असतो तेव्हा आम्ही काय विलीनीकरणाच्या चर्चा करतो का असेही संजय राऊत म्हणाले. प्रफुल पटेल, सुनिल तटकरे यांच्या विधानाबाबत राऊत म्हणाले, मी काही त्यांच्या पक्षाचा प्रवक्ता नाही. पण प्रफुल पटेल यांचा 'डायलॉग' अमित शहांसोबतच जास्त असतो असा टोलाही राऊत यांनी लगावला.

जनतेच्या मूळ प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी राजकीय वाद



पुणे/ प्रतिनिधी- राज्यातील राजकीय घडामोडी, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य एकत्र येण्याच्या चर्चा आणि मुंबईतील लोकल ट्रेनमधील भाषिक वादाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकार आणि भाजपवर जोरदार टीका केली आहे. चाकण आणि पुणे दौ-यादरम्यान माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी महागाई, भ्रष्टाचार, प्रदूषण आणि औद्योगिक समस्या यांसारख्या जनतेच्या मूळ प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी हे सर्व राजकीय वाद जाणीवपूर्वक घडवून आणले जात असल्याचा आरोप केला. दिल्लीत प्रफुल्ल पटेल आणि सुप्रिया सुळे यांच्या झालेल्या भेटीबाबत विचारले असता आदित्य ठाकरे म्हणाले की, सत्तेत असणा-यांनी आधी प्रशासन आणि राज्य कसे चालवायचे यावर लक्ष केंद्रित करावे. राज्यात सध्या अतिशय खालच्या पातळीचे राजकारण सुरू असून, केवळ पक्ष फोडणे आणि जंगलतोड करून जमिनी उद्योगपतींच्या घशात घालणे एवढाच अजेंडा दिसत आहे. अशा राजकीय चर्चा आणि अफवांमध्ये अडकण्यापेक्षा जनतेच्या प्रश्नांवर बोलणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.निवडणुका जवळ आल्या की भाजप पुरस्कृत वाद पुढे आणले जातात, असा आरोपही ठाकरेंनी केला. मुंबईच्या लोकल ट्रेनमध्ये भोजपुरी गाणी वाजवण्यामागे कोणाचा आदेश होता, असा सवाल करत मराठी-अमराठी, हिंदू-मुस्लिम किंवा जातीय वाद हे मूळ प्रश्नांवरून लक्ष हटवण्यासाठी केले जातात, असे ते म्हणाले. तसेच, सरकारने तपास यंत्रणांचा वापर अतिरेकी आणि गुन्हेगारांवर लक्ष ठेवण्यासाठी करावा, विरोधक आणि पत्रकारांचे फोन टॅप किंवा हॅक करण्यासाठी करू नये, असा टोलाही त्यांनी लगावला.

दुष्काळाच्या सावटातही सोने खरेदीचा उच्चांक

दिवाळीत तब्बल ६२ हजार कोटींची उलाढाल



जळगाव /प्रतिनिधी- दुष्काळ आणि महागाईचे सावट असतानाही राज्यात दीपावलीच्या कालावधीत विक्रमी सोने खरेदी करण्यात आली. धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी आणि पाडव्याचा मुहूर्त साधून राज्यभरात तब्बल ६२ हजार कोटींची सोन्याची उलाढाल नोंदवण्यात आली. गेल्यावर्षीच्या तुलनेत हा आकडा दुप्पट आहे. एकट्या मुंबईतच ३२ हजार कोटींचे सोने विकले गेले.

सोन्याच्या दरात मोठी घसरण झाल्याने खरेदीदारांनी मोड देऊन नवीन हलके कमी वजनाचे दागिने, बारसह पारंपरिक दागिन्यांची खरेदी केली. यावर्षी सराफ बाजाराला राज्यभर तेजी होती. मुंबई, नाशिक, पुणे, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि कोल्हापूर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सोने खरेदी करण्यात आले, अशी माहिती 'इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन'ने दिली आहे. गत वर्षी दिवाळीमध्ये सोन्याचा दर १ लाख ३१ हजार रुपयांवर पोहोचला. त्यानंतर ३० डिसेंबर २०२५ रोजी सोने १ लाख ४० हजार रुपयांपर्यंत पोहोचले आणि तिथूनच सोन्याच्या दरात वाढ होण्यास सुरुवात झाली. २९ जानेवारीला सोने १ लाख ८६ हजार रुपये प्रतितोळापर्यंत पोहोचले. हा चालू वर्षातील सर्वात उच्चांकी दर सराफ बाजारात नोंदविण्यात आला. यामुळे एक तोळे सोने घेताना ग्राहकाला घडणावळ आणि जीएसटीसह २ लाख ११ हजार रुपये मोजावे लागले होते.पुढे अक्षय तृतीयेला सोन्याच्या दरात घसरण झाली. ते प्रतितोळा १ लाख ६५ हजार रुपयांपर्यंत आले. गणपतीत १ लाख ५० हजार आणि दस-याला त्याचा भाव १ लाख ४५ हजार रुपयांपर्यंत आला. दस-याच्या दिवशी सोन्याच्या दरात तोळ्यामागे ४,२०० रुपयांची घसरण झाली. दस-याच्या सणाच्या दरात प्रथमच मोठी घसरण झाली होती. पुढे दर चढ-उतरणीचा हा सिलसिला सुरूच राहिला. दिवाळीच्या आधी दर घसरल्याने खरेदीदारांची चांदी झाली. दिवाळीत आणखी दरवाढ होण्याच्या भीतीने या सणासुदीच्या काळात ग्राहकांनी सोने खरेदी केले.

राज्यात हुडहुडी !



मुंबई/ पुणे / प्रतिनिधी- नोव्हेंबर महिन्याच्या मध्यावर पोहोचताच संपूर्ण महाराष्ट्रात गुलाबी थंडीची जोरदार चाहूल लागली आहे. उत्तरेकडून येणा-या थंड वा-यांमुळे राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत किमान तापमानाचा पारा झपाट्याने खाली घसरला आहे. विदर्भातील गोंदिया येथे राज्यातील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली असून, मराठवाड्यातील लातूर (उदगीर – १२.८), पश्चिम महाराष्ट्रातील पुणे (१४) आणि उत्तर महाराष्ट्रातील नाशिक (१३) अंश सेल्सिअस तापमान असून या ठिकाणी हुडहुडी वाढली आहे.मुंबईत थंडीची चाहूल जाणवू लागली असून, शुक्रवारी सकाळी सांताक्रूझ येथे यंदाच्या हंगामातील आतापर्यंतच्या नीचांकी तापमानाची नोंद झाली. सांताक्रूझ येथे किमान तापमान १८.९ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले. विशेष म्हणजे, यंदाच्या हंगामात प्रथमच शहरातील किमान तापमानाचा पारा २० अंशांच्या खाली घसरला आहे. दक्षिण बंगालच्या उपसागरात शुक्रवारी पहाटे कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. शुक्रवारी पहाटे ५.३० वाजता तयार झालेले हे कमी दाबाचे क्षेत्र सकाळी ८.३० वाजताही त्याच परिसरात कायम होते. हे क्षेत्र वायव्य दिशेकडे सरकण्याची शक्यता असून, १४ नोव्हेंबरपर्यंत त्याची तीव्रता वाढून ठळक कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतर होण्याचा अंदाज आहे. १५ नोव्हेंबरच्या सकाळच्या सुमारास या प्रणालीची तीव्रता वाढेल. १६ नोव्हेंबरच्या संध्याकाळपर्यंत मध्य बंगालच्या उपसागरावर त्याची तीव्रता वाढून चक्रीवादळात रूपांतर होऊ शकते. ही प्रणाली पुढे उत्तर-उत्तर-पश्चिम दिशेने सरकण्याची शक्यता आहे.

भविष्यातील धोक्याची घंटा- मुंबई हे समुद्रकिनारी वसलेले शहर असल्याने येथे अतिथंडी किंवा अतिउष्णतेचा अनुभव तुलनेने कमी असणे अपेक्षित आहे. मात्र, दोन दशकांतील तापमानातील बदल, पावसाचे बदलते स्वरूप लक्षात घेता वाढते तापमान पाहता भविष्यातील संभाव्य संकटाची ही धोक्याची घंटा मानली पाहिजे. दिवसाच्या प्रखर सूर्यप्रकाशामुळे अस्वस्थता आणि दमटपणा जाणवू शकतो. ठाणे, पालघर, रायगड आणि नवी मुंबईमध्येही हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. सध्या या भागांमध्ये पावसाबाबत कोणताही विशिष्ट इशारा देण्यात आलेला नाही. पुणे आणि नाशिकमध्ये सकाळी आणि रात्री थंडी वाढेल. पुणे आणि नाशिकमध्ये कमाल तापमान सुमारे ३३ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान १५ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. नाशिकमध्ये किमान तापमान सुमारे १४ ते १५ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. जळगाव, धुळे आणि नंदुरबारमध्येही सकाळी हलकी थंडी जाणवू शकते. मात्र, दुपारनंतर सूर्यप्रकाशामुळे हवामान उबदार राहील.

नागपूरमध्ये तापमान ३० अंशांपर्यंत पोहोचणार

नागपूरमध्ये शनिवारी हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. उपलब्ध हवामान माहितीनुसार, शहरात सुमारे १९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. कमाल तापमान सुमारे ३० अंश सेल्सिअस आणि किमान तापमान सुमारे १९ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे . राज्यात सर्वाधिक कमाल तापमान ३६.१ अंश सेल्सिअस इतके रत्नागिरी येथे नोंदवले गेले, तर सर्वात कमी किमान तापमान १२.० अंश सेल्सिअस इतके गोंदिया येथे नोंदवले गेले. सांताक्रूझ येथील किमान तापमान सरासरीपेक्षा २.७ अंश सेल्सिअसने कमी होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

सायबर अलर्ट

प्रत्येक तांत्रिक प्रगतीसोबत नवीन जोखीमही निर्माण होत असते. देशात डिजिटल व्यवहार जितके वाढले, तितक्याच वेगाने सायबर गुन्हेगारांनीही आपल्या पद्धती अधिक आधुनिक, संघटित आणि बुद्धिमान बनवल्या. डिजिटल अरेस्ट, बनावट केवायसी, फिशिंग, विशिंग, क्यूआर कोड फसवणूक, बनावट गुंतवणूक, सोशल मीडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाव्याने होणारे व्हिडिओ आणि आवाजाचे गैरवापर अशा अनेक प्रकारांमुळे हजारो नागरिक आयुष्यभराची बचत गमावत आहेत. या परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाने डिजिटल फसवणुकीतील पीडितांना नुकसानभरपाई मिळण्याचा मुद्दा पुढे आणला आहे. हा निर्णय केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित नसून, डिजिटल व्यवहारांमध्ये सुरक्षिततेची अंतिम जबाबदारी कोणाची, हा मूलभूत प्रश्न देशासमोर उभा करतो. ग्राहकाचा विश्वास टिकवायचा असेल, तर सुरक्षितता आणि उत्तरदायित्व यांची साखळी अधिक मजबूत करावी लागेल. डिजिटल फसवणुकीकडे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नाच्या दृष्टीने पाहून चालणार नाही, तर आर्थिक व्यवस्थेवरील विश्वास, तंत्रज्ञानाची विश्वासार्हता आणि संस्थांच्या नैतिक जबाबदारीशी जोडावा लागेल. डिजिटल व्यवहारांचा विस्तार जितका मोठा होईल, तितकी विश्वासाची हमी अधिक बळकट असणे आवश्यक आहे. अन्यथा, तंत्रज्ञानावरील नागरिकांचा विश्वास डळमळीत होण्याचा धोका कायम राहील. डिजिटल फसवणुकीचे स्वरूप आज इतके वेगाने बदलत आहे की, पारंपरिक सुरक्षा उपाय अनेकदा अपूरे ठरत आहेत. पूर्वी एटीएम कार्ड क्लोनिंग, बनावट फोन किंवा ई-मेलपुरते मर्यादित असलेले गुन्हे आत्ता कृत्रिम बुद्धिमत्ता, डीपफेक तंत्रज्ञान, बनावट ग्राहक सेवा केंद्रे, सोशल मीडिया, गुंतवणुकीच्या खोट्या योजना आणि तथाकथित डिजिटल अरेस्टपर्यंत पोहोचले आहेत. अलीकडे गुन्हेगार स्वतःला पोलीस अधिकारी, सीबीआय, ईडी, आयकर विभाग किंवा दूरसंचार विभागाचे अधिकारी असल्याचे सांगून नागरिकांमध्ये भीती निर्माण करतात. भीतीच्या मानसिक अवस्थेत अनेकजण आपल्याच खात्यातील रक्कम गुन्हेगारांच्या खात्यात वर्ग करतात. त्यामुळे ही केवळ आर्थिक फसवणूक रहत नाही, तर मानसिक दबाव, तंत्रज्ञानाचा गैरवापर आणि मानसशास्त्रीय डावपेच यांचे धोकादायक मिश्रण बनते. अशा परिस्थितीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेली भूमिका अत्यंत दूरदृष्टीची मानावी लागेल. न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले आहे की, एखाद्या वित्तीय संस्थेने आवश्यक दक्षता घेतली नाही आणि त्यातून ग्राहकाची फसवणूक झाली, तर पीडिताला किमान झालेल्या आर्थिक नुकसानीइतकी भरपाई मिळाली पाहिजे, या निरीक्षणामागे केवळ कायदेशीर विचार नाही, तर विश्वासाचे संरक्षण हा व्यापक सिद्धांत आहे. बँकिंग व्यवस्था विश्वासावर उभी असते. ग्राहकाने आपली आयुष्यभराची कमाई सुरक्षित राहील, वा विश्वासाने बँकेत ठेवलेली असते. त्यामुळे सुरक्षिततेची जबाबदारीही ग्राहकावर एकतर्फी टाकता येणार नाही. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तावित केवायसी सुधारणा निर्देश- २०२६ कडेही याच दृष्टीने पहावे लागेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून संशयास्पद व्यवहार ओळखणे, खातेदाराच्या नेहमीच्या व्यवहारांपेक्षा वेगळ्या व्यवहारांची तत्काळ नोंद, उच्च जोखमीचे व्यवहार काही काळासाठी रोखणे आणि पोलीस यंत्रणांना तत्काळ माहिती देणे, असे उपाय योजून भविष्यात. डिजिटल फसवणुकीवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येऊ शकते. असे असले तरी, केवळ नियम बनवून प्रश्न सुटणार नाही. बँकांनीही आपल्या कार्यपद्धतीत मूलभूत बदल करणे आवश्यक आहे. अनेकदा ग्राहकांची संपूर्ण आयुष्यभराची बचत काही मिनिटांमध्ये दुसऱ्या खात्यात वळवली जाते. परंतु त्या व्यवहाराबाबत कोणताही इशारा किंवा अतिरिक्त पडताळणी होत नाही. ग्राहकाच्या व्यवहाराच्या इतिहासाशी पूर्णपणे विसंगत असलेला व्यवहार अचानक होत असताना तो संशयास्पद असल्याचे ओळखणे आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी अवघड नाही. प्रश्न तंत्रज्ञानाचा नसून, ते प्रभावीपणे वापरण्याच्या इच्छाशक्तीचा आहे. म्हणूनच सायबर सुरक्षेकडे खर्च म्हणून नव्हे, तर ग्राहक संरक्षणातील गुंतवणूक म्हणून पाहण्याची वेळ आली आहे. प्रत्येक मोठ्या बँकेने रिअल टाइम फ्रॉड मॉनिटरिंग सेंटर, सातत्याने अद्ययावत होणारी जोखीम विश्लेषण प्रणाली, प्रशिक्षित सायबर प्रतिसाद पथक आणि चोवीस तास उपलब्ध तक्रार निवारण व्यवस्था उभारणे ही आता गरज बनली आहे. डिजिटल व्यवहार जितके जलद होत आहेत, तितक्याच वेगाने। सुरक्षा व्यवस्थाही कार्यरत राहिली पाहिजे. फसवणूक झाल्यानंतर काही मिनिटांमध्येच रक्कम अनेक खात्यांमधून फिरवली गेल्यास माग काढणे कठीण होते. डिजिटल भरपाईची संकल्पना ही त्यामुळे केवळ नुकसानभरपाईची बाब नाही. ती आर्थिक संस्थांना अधिक जबाबदार बनवण्याची यंत्रणा आहे. निष्काळजीपणामुळे नुकसानभरपाई द्यावी लागणार असेल, तर प्रत्येक बँक आपल्या सुरक्षा यंत्रणेत अधिक गुंतवणूक करेल, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण। देईल आणि ग्राहकसुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देईल. अखेरीस, भरपाई देण्यापेक्षा फसवणूक होऊ न देणेच प्रत्येक संस्थेसाठी अधिक हिताचे ठरणार आहे. बदलत्या काळात बँकांनी ग्राहकांकडे केवळ खातेधारक म्हणून नव्हे, तर सुरक्षा व्यवस्थेतील सक्रिय भागीदार म्हणून पाहिले पाहिजे. नियमित जनजागृती, प्रत्येक व्यवहाराबाबत स्पष्ट सूचना, संशयास्पद व्यवहार झाल्यास त्वरित संपर्क, सुलभ तक्रार निवारण प्रणाली आणि वेळेवर प्रतिसाद या गोष्टी बँकांच्या सेवासंस्कृतीचा भाग बनल्या पाहिजेत. दुसरीकडे, ग्राहकांनीही ओटीपी, यूपीआय पिन, पासवर्ड किंवा बँक खात्त्याचा तपशील कोणालाही न देणे, अनोळखी दुव्यांवर क्लिक न करणे, रिमोट ॲक्सेस ॲप डाउनलोड करण्यापूर्वी खातरजमा करणे, सामाजिक माध्यमांवरील आकर्षक गुंतवणूक योजनांना बळी न पडणे आणि संशयास्पद व्यवहार दिसताच तातडीने बँक आणि सायबर हेल्पलाइनशी संपर्क साधणे ही सवय अंगीकारली पाहिजे. डिजिटल साक्षरता ही आता ऐच्छिक बाब राहिलेली नाही ती आर्थिक सुरक्षिततेची पहिली अट बनली आहे. बँकांची अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्था आणि ग्राहकांची जागरूकता या दोन्हींचा संगमच सायबर गुन्हेगारांविरुध्द सर्वात प्रभावी ढाल ठरू शकते.

दुष्काळाचे संकट मोठे आहे; परंतु त्यापेक्षा मोठी आहे ती समाजाची सामूहिक कृती करण्याची क्षमता. महाराष्ट्रातील २८८ विधानसभा सदस्य आणि ७८ विधानपरिषद सदस्य मिळून ३६६ लोकप्रतिनिधी आहेत. प्रत्येकाने आपल्या मतदारसंघातील पाणी, शेती, रोजगार आणि पशुधन या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले, तर दुष्काळाचे परिणाम कमी करण्यासाठी राज्यव्यापी प्रयत्न उभे राहू शकतात. दुष्काळ हा शासनासाठी केवळ मदतकार्याचा विषय नसावा; तो लोकप्रतिनिधींच्या उत्तरदायित्वाची आणि समाजाच्या सामूहिक संवेदनशीलतेची कसोटी असावी.

आमदारांची भूमिका : अधिकार, कर्तव्ये अन् जबाबदारी

आमदार हा कार्यकारी अधिकारी नसतो. त्याला स्वतःहून टँकर मंजूर करणे, पीक नुकसानीचे पंचनामे करणे किंवा शासकीय मदत वाटपाचे आदेश देणे असे प्रशासकीय अधिकार नसतात. ही कामे संबंधित शासकीय यंत्रणांच्या कार्यक्षेत्रात येतात. मात्र, याचा अर्थ आमदाराची भूमिका मर्यादित आहे असा होत नाही. उलट, विधिमंडळातील अधिकार आणि जनतेशी असलेला थेट संपर्क यांचा उपयोग करून तो दुष्काळ व्यवस्थापनाला दिशा देऊ शकतो.

विधिमंडळातील भूमिका

प्रश्नोत्तराचा तास, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चा, स्थगन प्रस्ताव, नियम २९३ अंतर्गत चर्चा आणि अर्थसंकल्पीय मागण्यांवरील चर्चा ही आमदारांसाठी महत्त्वाची साधने आहेत. आपल्या मतदार संघातील पाणीटंचाई, पीक नुकसान, टँकर पुरवठा, रोजगार, पशुधनाची स्थिती आणि मदतीच्या निकषांतील अडचणी यांवर ते शासनाचे लक्ष वेधू शकतात.

प्रश्न विचारताना केवळ तक्रार मांडण्याऐवजी ठोस माहिती मागितली पाहिजे. कोणत्या गावात किती टँकर सुरू आहेत, किती जलस्रोत कोरडे पडले आहेत, किती शेतकऱ्यांचे पंचनामे झाले आहेत, किती कुटुंबांना रोजगार उपलब्ध झाला आहे, किती पशुधनाला पाणी आणि चारा मिळत आहे, याची माहिती सभागृहात मागता येते. अंदाजपत्रक आणि अनुदानांच्या मागण्यांवरील चर्चेत दुष्काळ निवारणासाठी आवश्यक आर्थिक तरतुदींचा आग्रह धरता येतो. सार्वजनिक लेखा समिती, अंदाज समिती आणि पंचायत राज समिती यांसारख्या समित्यांच्या कामातूनही शासनाच्या खर्चावर आणि योजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवता येते.

जिल्हा प्रशासन, यंत्रणांवर देखरेख

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हा नियोजन समिती आणि जिल्ह्यातील विविध प्रशासकीय यंत्रणा यांच्या कामकाजाबाबत आमदारांनी माहिती ठेवली पाहिजे. दुष्काळग्रस्त गावांची यादी, पाणीपुरवठ्याचे नियोजन, टँकरचे वेळापत्रक, रोजगार हमीची कामे, पीक नुकसानीचे पंचनामे आणि मदत वितरणाबाबत आढावा घेणे आवश्यक आहे.

गावातील ग्रामसभा, ग्रामपंचायत, शेतकरी गट, महिला बचत गट आणि स्थानिक संस्था यांच्याकडून प्रत्यक्ष माहिती मिळवून ती प्रशासनापर्यंत पोहोचवता येते. प्रशासनाने केलेल्या कामांची पडताळणी करणे आणि जिथे त्रुटी आहेत तिथे योग्य पाठपुरावा करणे ही महत्त्वाची जबाबदारी आहे.

मतदारसंघाचा जलसुरक्षा आराखडा

प्रत्येक आमदाराने आपल्या मतदारसंघातील गावांचा पाणी ताळेबंद तयार करण्यासाठी पुढाकार घ्यावा. उपलब्ध जलस्रोत, विहिरी, बोअरवेल, तलाव, लघुसिंचन प्रकल्प, पाणलोट क्षेत्र, भूजलपातळी, पाण्याची मागणी आणि पाण्याचा वापराची माहिती एकत्रित केली पाहिजे. कोणती गावे पिण्याच्या पाण्यासाठी असुरक्षित आहेत, कुठे जलसाठ्यांमध्ये गाळ साचला आहे, कुठे नाले व ओढे पुनरुज्जीवित करण्याची गरज आहे आणि कोणत्या भागात भूजल पुनर्भरणाची कामे आवश्यक आहेत, हे निश्चित करता येईल.

अशा माहितीच्या आधारे अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांचा आराखडा तयार करता येईल. टँकरसारख्या तातडीच्या उपायांबरोबरच जलसंधारण, जलपुनर्भरण, तलावांचे पुनरुज्जीवन, पाणलोट विकास आणि पाण्याच्या काटकसरीने वापरास प्राधान्य द्यावे. दुष्काळ पडल्यावर नव्याने धावपळ करण्याऐवजी मतदारसंघाची दीर्घकालीन जलसुरक्षा निर्माण करणे हे उद्दिष्ट असावे.

आमदार निधी, जिल्हा नियोजन समिती

●आज आमदार स्थानिक विकास निधीची तरतूद पूर्वीच्या तुलनेत लक्षणीय आहे. या निधीचा वापर मतदारसंघातील सार्वजनिक गरजां नुसार, लागू शासन निर्णय आणि मार्गदर्शक सूचनांच्या चौकटीत करता येतो. त्यामुळे आमदारांनी या निधीकडे केवळ लहान-मोठ्या बांधकामांच्या कामांसाठी उपलब्ध असलेली तरतूद म्हणून न पाहता, मतदारसंघातील मूलभूत पायाभूत सुविधा आणि जलसुरक्षेला हातभार लावणारे साधन म्हणून पाहिले पाहिजे.

●पाणी साठवण, पिण्याच्या पाण्याशी संबंधित सार्वजनिक सुविधा, जलसंधारणाशी निगडित पात्र कामे आणि दुष्काळाचा परिणाम कमी करणाऱ्या इतर अनुमत कामांना प्राधान्य देता येईल. मात्र प्रत्येक कामाची पात्रता संबंधित शासन निर्णयानुसार तपासली पाहिजे.



शासनाने लोकसहभागातून दुष्काळी भागा चारा छावणीचे नियोजन करणे आवश्यक आहे.

पशुधनाचे संरक्षण : दुष्काळ व्यवस्थापनातील अत्यावश्यक घटक

दुष्काळात पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीचा प्रश्न चर्चेत येतो; मात्र पशुधनाच्या प्रश्नाकडे अनेकदा पुरेसे लक्ष दिले जात नाही, ग्रामीण कुटुंबांसाठी जनावरे ही केवळ पशुसंपत्ती नसतात. ती दूध, शेतीकाम, शेणखत, उत्पन्न आणि कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेचा आधार असतात. दुष्काळात चारा आणि पाणी उपलब्ध न झाल्यामुळे पशुधनाची उपासमार होते. अनेक कुटुंबांना जनावरे विकावी लागतात किंवा त्यांना दूरवर हलवावे लागते. त्यामुळे पशुधनाचे संरक्षण हा दुष्काळ व्यवस्थापनाचा अविभाज्य भाग असला पाहिजे.

- या संदर्भात राज्यातील लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेण्याची मोठी संधी आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या विधानसभा मतदारसंघात किमान एक सक्षम पशुधन आधार केंद्र उभारण्याचा आदर्श घालून द्यावा. या केंद्रांमध्ये जनावरांसाठी पिण्याचे पाणी, चारा, सावली, निवारा आणि नियमित पशुवैद्यकीय तपासणीची व्यवस्था असावी. जिल्हा प्रशासन आणि पशुसंवर्धन विभागाच्या समन्वयाने अशा केंद्रांचे नियोजन व संचालन करता येईल.
- महाराष्ट्रातील शहरी मतदारसंघांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदारांची संख्याही लक्षणीय आहे. दुष्काळाचा परिणाम प्रामुख्याने ग्रामीण भागात होत असला, तरी शहरी भागातील लोकप्रतिनिधींच्या सामाजिक संपर्काचा, संस्थात्मक क्षमतेचा आणि सहकार्याच्या जाळ्याचा उपयोग ग्रामीण पशुधनाला आधार देण्यासाठी होऊ शकतो. त्यांनी आपल्या समविचारी सहकारी, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, सामाजिक संस्था, उद्योगसमूह आणि स्वयंसेवी संघटनांना या कामात सहभागी करून घ्यावे. योग्य जागा आणि आवश्यक सुविधा उपलब्ध असलेल्या शिक्षणसंस्थांच्या परिसरात, शैक्षणिक कामकाजाला बाधा न आणता, तात्पुरती पशुधन आधार केंद्रे उभारण्याचा विचार करता येईल.
- अशा केंद्रांसाठी केवळ जागा उपलब्ध करून देणे पुरेसे नाही. पाणी, चारा, स्वच्छता, सावली, जनावरांची आरोग्य तपासणी आणि व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. स्थानिक पशुपालक, ग्रामपंचायत, पशुसंवर्धन विभाग, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक उत्तरदायित्व निधी यांची सांगड घालता येईल.
- महाराष्ट्र विधानसभेचे २८८ आणि विधानपरिषदेचे ७८ असे एकूण ३६६ सदस्य आहेत. या सर्व लोकप्रतिनिधींनी पक्षीय भेद बाजूला ठेवून आपल्या क्षमतेनुसार पशुधन संरक्षणासाठी पुढाकार घेतला, तर दुष्काळग्रस्त कुटुंबांना मोठा आधार मिळू शकतो. सत्ताधारी पक्षातील सदस्यांनी शासकीय यंत्रणांशी समन्वय साधावा, तर विरोधी पक्षातील सदस्यांनीही केवळ टीका करण्यापुरती भूमिका मर्यादित न ठेवता आपले कार्यकर्ते, समर्थक आणि संस्थांना प्रत्यक्ष मदतकार्यात सहभागी करून घ्यावे. ही स्पर्धा राजकीय नसून सामाजिक उत्तरदायित्वाची असावी.
- मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी स्वतःच्या मतदारसंघात अशा केंद्रांची सुरुवात केली, तर राज्यातील इतर लोकप्रतिनिधींनाही प्रेरणा मिळेल. शहरी आणि ग्रामीण लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने उभा राहिलेला हा उपक्रम देशातील इतर राज्यांसाठीही अनुकरणीय ठरू शकतो. कारण पशुधन वाचवणे म्हणजे ग्रामीण कुटुंबांची संपत्ती, उपजीविका आणि आर्थिक सुरक्षितता वाचवणे होय.

●जिल्हा नियोजन समितीतील आमदारांची भूमिका याहून व्यापक आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी उपलब्ध निधीचे प्राधान्यक्रम ठरवताना आणि विविध विभागांच्या योजनांमध्ये समन्वय साधताना आमदार आपापल्या मतदारसंघातील दुष्काळी परिस्थिती ठोस आकडेवारीसह मांडू शकतात. जिल्हा नियोजन समितीचा निधी हा कोणत्याही एका आमदाराचा वैयक्तिक निधी नसतो; परंतु समितीतील सहभाग, चर्चा आणि नियोजन प्रक्रियेद्वारे आपल्या भागातील गरजांना प्राधान्य मिळवून देण्याची संधी लोकप्रतिनिधींना असते.

●आमदार निधी आणि जिल्हा नियोजन समितीतील भूमिका या दोन स्वतंत्र बाबी आहेत. त्यांचा योग्य समन्वय साधला, तर मतदारसंघातील दुष्काळ निवारणाच्या प्रयत्नांना अधिक परिणामकारक स्वरूप देता येईल.

पक्षीय राजकारणापलीकडील सामूहिक जबाबदारी

दुष्काळ कोणत्याही पक्षाचा किंवा मतदारसंघाचा नसतो. तो समाजातील सर्व घटकांना प्रभावित करतो. त्यामुळे दुष्काळाच्या काळात राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वपक्षीय सहकार्याची भूमिका स्वीकारली पाहिजे. सत्ताधारी आमदारांनी शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

विरोधी पक्षातील आमदारांनी शासनाच्या त्रुटी दाखवून देतानाच आपल्या मतदारसंघात उपलब्ध सामाजिक आणि संस्थात्मक साधनसंपत्तीच्या माध्यमातून मदतकार्य उभे करावे.

विधिमंडळात प्रश्न विचारणे, चर्चा करणे आणि शासनाला उत्तरदायी धरणे हे विरोधी पक्षाचे महत्त्वाचे काम आहे. परंतु त्याचबरोबर स्थानिक पातळीवर कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था आणि नागरिक यांना एकत्र आणून प्रत्यक्ष कृती करणेही शक्य आहे. लोकप्रतिनिधींच्या या भूमिकेमुळे राजकीय मतभेद कायम ठेवूनही सार्वजनिक हिताच्या प्रश्नांवर सहकार्य करता येते.

दुष्काळ येण्यापूर्वीची तयारी...

दुष्काळ निवारणासाठी काही मूलभूत उपाययोजना प्रत्येक मतदारसंघात संस्थात्मक स्वरूपात राबविणे आवश्यक आहे.

●प्रत्येक मतदारसंघाचा गावनिहाय जलस्रोत आणि पाणी ताळेबंद तयार करावा.

●पावसाचे प्रमाण, पावसातील खंड, पेरणी, पीकस्थिती, भूजल आणि जलसाठे यांचे नियमित निरीक्षण करावे.

●दुष्काळाची शक्यता निर्माण होताच पिण्याचे पाणी, रोजगार, पीक संरक्षण आणि पशुधन संरक्षण यांचा पूर्वनियोजित कृती आराखडा सक्रिय करावा.

●आमदार निधी आणि जिल्हा नियोजन समितीच्या प्रक्रियेतून पात्र जलसुरक्षा व दुष्काळ प्रतिबंधक कामांना प्राधान्य मिळवून द्यावे.

●पशुधनासाठी पाणी, चारा, निवारा आणि पशुवैद्यकीय सेवा यांचा समावेश असलेली स्थानिक व्यवस्था तयार करावी

●टँकर, मदत, रोजगार आणि इतर शासकीय उपाययोजनांबाबत पारदर्शक माहिती नागरिकांना उपलब्ध करून द्यावी.

●ग्रामसभा, ग्रामपंचायती, महिला बचत गट, युवक, शेतकरी गट आणि स्वयंसेवी संस्था यांना नियोजन व अंमलबजावणीत सहभागी करून घ्यावे.

●दुष्काळ व्यवस्थापनासाठी विधिमंडळात सर्वपक्षीय संवाद आणि नियमित आढावा घेण्याची व्यवस्था विकसित करावी.

दुष्काळाचे संकट मोठे आहे; परंतु त्यापेक्षा मोठी आहे ती समाजाची सामूहिक कृती करण्याची क्षमता. महाराष्ट्रातील २८८ विधानसभा सदस्य आणि ७८ विधानपरिषद सदस्य मिळून ३६६ लोकप्रतिनिधी आहेत. प्रत्येकाने आपल्या मतदारसंघातील पाणी, शेती, रोजगार आणि पशुधन या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले, तर दुष्काळाचे परिणाम कमी करण्यासाठी राज्यव्यापी प्रयत्न उभे राहू शकतात. दुष्काळ हा शासनासाठी केवळ मदतकार्याचा विषय नसावा; तो लोकप्रतिनिधींच्या उत्तरदायित्वाची आणि समाजाच्या सामूहिक संवेदनशीलतेची कसोटी असावी.

(उत्तरार्ध)

डॉ. सुमंत पांडे
९७६४००६६८३
(माजी कार्यकारी संचालक,
जलसाक्षरता केंद्र, यशदा, पुणे)

संवाद

शासनाने शुभमंगल योजना राबवावी

राज्यभरातील अनेक भागात दुष्काळाची भयावह परिस्थिती आता बघायला मिळत असून आगामी काळात ती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त होत आहे. अशा काळात उपवर मुला-मुलींची लग्ने कशी करावीत, असाही प्रश्न दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबापुढे पडला आहे. दुष्काळामुळे शेतीचे उत्पन्न शून्य, हाताला काम मिळण्याची शाश्वती नाही. त्यातच रोजचा घरखर्च भागवतानाच शेतकरी कुटुंबांची मोठी दमछाक होत आहे. त्यामुळे मुला-मुलींच्या लग्नाचा खर्च कसा भागवायचा हा देखील ग्रामीण भागातील मोठा प्रश्न झाला आहे. अलीकडेच अशा परिस्थितीत मराठवाड्यातील बीड जिल्हा प्रशासनाने सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करण्यासाठी विशेष पुढाकार घेतला आहे. त्यानुसार तालुकास्तरावर विवाह सोहळे आयोजित करून पात्र कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे नियोजन केले जात आहे. या उपक्रमातून शेतकरी, शेतमजूर, ऊसतोड कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

राजकीय पुढारी आपल्या मुला-मुलींचे लग्ने खर्चिक होणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रापुढे दुष्काळाचे मोठे संकट उभे असताना राज्यातील शेतकरी, कुटुंबातील मुला-मुलींची लग्ने सामूहिक विवाह सोहळ्यात पार पाडावीत याकरिता बीड पॅटर्नचे सर्वांनी अनुकरण करण्याची आवश्यकता आहे.

प्रा. मधुकर चुटे

राजकारणाचा नवा अध्याय

कोणत्याही देशातील विरोधी पक्षनेत्याचे पद हे राष्ट्राध्यक्ष किंवा पंतप्रधानांच्या खालोखाल अत्यंत महत्त्वाचे आणि मानाचे मानले जाते. या पदाला एक राजकीय प्रतिष्ठा असते आणि संविधानात्मक गरिमा असते. विरोधी पक्षनेत्याने मांडलेल्या प्रत्येक शब्दाला आणि भूमिकेला संसदेत व देशात वजन असते. मात्र, अलीकडच्या काळात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी या पदाची गरिमा आणि जबाबदारी धुळीस मिळवली आहे, असे म्हटले तर अजिबात वावगे ठरणार नाही. संसदेत योग्य तो अभ्यास करून प्रश्न विचारणे, कायदेशीर व नियमबद्ध चर्चा करणे आणि विचारांची लढाई विचारांनी लढणे यासाठी ज्या राजकीय परिपक्वतेची गरज असते, ती राहुल गांधी यांच्याकडे दिसत नाही. जेव्हा राजकीय मुद्द्यांवर बोलण्यासारखे काही उरत नाही, तेव्हा अशा प्रकारच्या वैयक्तिक व खळबळजनक विषयांना हवे देऊन चर्चेत राहण्याचा प्रयत्न केला जातो.

अविनाश देशपांडे

रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

‘व्होट बचाव, देश बचाव’चा नारा देत महागावात काँग्रेसची पदयात्रा!

पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मोठ्या संख्येने सहभाग

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



महागाव, दि. १४ : ‘व्होट बचाव, देश बचाव’ हा नारा देत काँग्रेस कमिटीच्या वतीने महागाव शहरात पदयात्रा काढण्यात आली. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक , महागाव तालुका अध्यक्ष सुनील राठोड, शहर अध्यक्ष शैलेश कोपरकर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या पदयात्रेत पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

लोकशाही आणि मतदान प्रक्रियेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने ही पदयात्रा काढण्यात आली. महागाव शहरातील बसस्थानक परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून पदयात्रेला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर तहसील कार्यालयाच्या मुख्य मार्गावरून रॅली काढण्यात आली. यावेळी सहभागी कार्यकर्त्यांनी ‘व्होट बचाव, देश बचाव’ अशा घोषणा देत लोकशाहीच्या रक्षणाचा संदेश दिला. या पदयात्रेमुळे शहरातील राजकीय वातावरणात चांगलीच चर्चा रंगली. या पदयात्रेत काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुनील राठोड, शहराध्यक्ष शैलेश कोपरकर, जिल्हा काँग्रेसच्या मंगलाताई देशमुख, महागाव महिला काँग्रेसच्या अध्यक्षा जयश्री नरवाडे,अनुसूचित जाती विभागाचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र कावळे सर, महबूबखा पठाण, स्वप्निल नाईक, विलास बापूराव गावंडे, मनोज गावंडे उटी, समाधान राऊत, सुनील भवानकर, महेश पाटील यांच्यासह काँग्रेसचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले होते.

प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात तळणीच्या महिला आक्रमक ‘आडवी बाटली’ मतदानाची मागणी!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. १४ : आर्णी तालुक्यातील तळणी येथील मनशांती बार बंद करण्याच्या मागणीने आता जोर धरला असून, प्रशासनाच्या दिरंगाई विरोधात गावातील साडेचारशे महिला एकवटल्या आहेत. वारंवार निवेदने आणि आंदोलने करूनही ठोस कारवाई होत नसल्याने महिलांनी पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन बार बंद करण्याची मागणी केली.

केवळ आश्वासनांवर समाधान न मानता महिलांनी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील तरतुदीनुसार ‘आडवी बाटली’ पद्धतीने मतदान घेऊन दारूबंदीचा निर्णय लागू करण्याची मागणी केली आहे. मतदानाची तारीख निश्चित करून ग्रामपंचायतीला लेखी सूचना द्यावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली. ४ सप्टेंबर २०२६ रोजी निवेदन देऊनही दोन महिन्यांहून अधिक काळ कारवाई न झाल्याने महिलांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दारूमुळे सामाजिक शांतता, कौटुंबिक वातावरण आणि संसार उद्ध्वस्त होण्याची भीती व्यक्त करत गावातील सर्व राजकीय पक्षांचे कार्यकर्तेही पक्षीय मतभेद बाजूला ठेवून या लढ्यात सहभागी झाले आहेत.

१७ नोव्हेंबरला चक्काजाम

मनशांती बार बंद करण्याबाबत निर्णय न झाल्यास १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता तळणी चौफुलीवर चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. महिलांसह पुरुष ग्रामस्थही रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

न्यायव्यवस्थेचे मर्म उलगडण्यासाठी माजी सरन्यायाधीश डॉ. चंद्रचूड यांचे यवतमाळात व्याख्यान!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. १४ : न्यायव्यवस्था, कायद्याचे राज्य आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीत न्यायसंस्थेची भूमिका यावर थेट विचारमंथन करण्याची संधी यवतमाळकरांना मिळणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश डॉ. धनंजय यशवंत चंद्रचूड १५ नोव्हेंबर रोजी यवतमाळात विशेष व्याख्यान देणार आहेत. विद्या प्रसारक मंडळ संचालित स्वतंत्रता सेनानी जवाहरलाल दर्डा कॉलेज ऑफ लॉ यांच्या वतीने आयोजित ‘जवाहरलाल दर्डा स्मृती व्याख्यानमाले’त सायंकाळी ५ वाजता अमोलकचंद महाविद्यालयाच्या सभागृहात हा कार्यक्रम होईल.

‘कायदा आणि न्यायशास्त्र’ हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख अतिथी, तर डॉ. विजय दर्डा अध्यक्षस्थानी राहतील. न्यायव्यवस्थेतील सर्वोच्च पदाचा अनुभव असलेल्या व्यक्तीचे विचार ऐकण्याची ही संधी विधी विद्यार्थी, वकील आणि अभ्यासकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मात्र, केवळ व्याख्यानापुरता हा संवाद मर्यादित न राहता न्यायव्यवस्थेतील बदलत्या आव्हानांवरही यातून प्रकाश पडण्याची अपेक्षा आहे.

अवतार मेहेर बाबा गूढवादी आध्यात्मिक गुरू होते : गणेश धर्माळे

पुसद, दि. १४ : प्रेम, भक्ती, सेवा आणि ईश्वरप्राप्ती हाच जीवनाचा खरा मार्ग असल्याचा संदेश देणारे अवतार मेहेर बाबा हे गूढवादी आध्यात्मिक गुरू होते. त्यांनी तब्बल ४४ वर्षे मौनसाधना करून आध्यात्मिक विचारांचा प्रसार केला. त्यांचे विचार आजही लाखो भाविकांना प्रेरणा देतात, असे प्रतिपादन गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष गणेश धर्माळे यांनी केले. गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूरच्या वतीने पुसद तालुक्यात आयोजित ५१ सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. याच उपक्रमांतर्गत उदासी वॉर्डातील उषा महाजन यांच्या निवासस्थानी प्रार्थना व भजन संध्या पार पडली. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान व मेहेर बाबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. धुनी दिनानिमित्त धुनी प्रज्वलित करून सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली.धर्माळे यांनी विज्ञानासोबत अध्यात्माची सांगड घातल्यासच मानवकल्याणाचा मार्ग प्रशस्त होईल, असे सांगितले. यावेळी भजन संध्या रंगली. रमेश पळसकर यांनी सूत्रसंचालन, तर अनिल साताळे यांनी आभार मानले. मेहेर परिवारातील असंख्य भक्त उपस्थित होते.

थोडक्यात



मुलीच्या वाढदिवसानिमित्त पोलीस स्टेशनला वॉटर फिल्टर व कुलर भेट.

महागाव : कु.सानिका संजय नरवाडे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या आई जयश्री संजय नरवाडे (नगरसेविका तथा तालुकाध्यक्ष, महिला काँग्रेस कमिटी, महागाव) यांच्या पुढाकारातून महागाव पोलीस स्टेशनला वॉटर फिल्टर व वॉटर कुलर भेट देण्यात आला. पोलीस स्टेशनमध्ये विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना शुद्ध व थंड पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या सामाजिक भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. सानिका संजय नरवाडे या भोपाळ येथील ॥ISER संस्थेत शिक्षण घेत आहेत. यावेळी ठाणेदार सेवानंद वानखेडे, पोलीस कर्मचारी व पत्रकार बांधव उपस्थित होते.जयश्री संजय नरवाडे परिवाराच्या या सामाजिक उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.



पंजाबराव राऊत पाटील यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश..

जिल्हाध्यक्ष सचिन नाईक यांच्या नेतृत्वात पक्षप्रवेश

महागाव : महागाव तालुक्यातील कलगाव येथील सामाजिक कार्यात सक्रिय असलेले पंजाबराव माधवराव राऊत पाटील यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात अधिकृत प्रवेश केला. यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सचिन नाईक, महागाव तालुकाध्यक्ष सुनील भाऊ राठोड व शहराध्यक्ष शैलेश कोपरकर यांच्या नेतृत्वाखाली हा पक्षप्रवेश पार पडला. यावेळी सुनील भवानकर, समाधान पाटील राऊत, इमरान पठाण, स्वप्नील नाईक यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पंजाबराव राऊत पाटील यांचा सामाजिक क्षेत्रातील सक्रिय सहभाग आणि कलगाव परिसरातील जनसंपर्क लक्षात घेता त्यांच्या प्रवेशामुळे काँग्रेस संघटनेला बळ मिळणार असल्याचे मानले जात आहे. ग्रामीण भागातील सामाजिक कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडण्याच्या दृष्टीने हा प्रवेश महत्त्वपूर्ण ठरत आहे.



आदिवासी गुणवत्तेला व्यासपीठ भूमिका आणि मरियमच्या कर्तृत्वाचा गौरव!

क्रिकेटच्या मैदानापासून पीएच.डी.पर्यंतची झेप

पांढरकवडा : गुणवंतांच्या यशाची दखल घेण्यासाठी समाजसंस्थांनी पुढाकार घेणे गरजेचे असताना युवा टायगर फोर्सने कृतीतून आदर्श निर्माण केला आहे. झटाळा येथील आदिवासी कन्या भूमिका गेडाम हिने सलग तिसऱ्यांदा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला क्रिकेट संघात स्थान मिळविले, तर मरियम बेगम यांनी पीएच.डी. पदवी संपादन करून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविले. या दोघींच्या कर्तृत्वाचा युवा टायगर फोर्सतर्फे सन्मान करण्यात आला. १३ नोव्हेंबर रोजी मरियम बेगम यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यापूर्वी भूमिका गेडामचाही सन्मान करण्यात आला होता. आदिवासी, ग्रामीण आणि सर्वसामान्य कुटुंबांतील गुणवंतांना केवळ कौतुक नव्हे, तर प्रोत्साहन आणि व्यासपीठ मिळणे आवश्यक आहे. गुणवत्तेला जात, धर्म किंवा परिस्थितीचे बंधन नसते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. संस्थापक अध्यक्ष मदन जिद्देवार आणि संयोजक अंकित नैताम यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयात पंडीत जवाहरलाल नेहरु यांना अभिवादन

यवतमाळ : देशाचे पहिले पंतप्रधान दिवंगत पंडीत जवाहरलाल



नेहरु यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

गणोरीत मूलभूत सुविधांचा बोजवारा,ग्रामस्थांचा प्रशासनाला आठ दिवसांचा अल्टिमेटम!

ग्रामस्थांचा स्वाक्षऱ्यांसह आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



बाभूळगाव, दि. १४ : गावाच्या विकासासाठी नागरिकांकडून नियमित कर वसुली केली जाते; मात्र त्या बदल्यात मिळणाऱ्या मूलभूत सुविधांचे काय? असा संतप्त सवाल गणोरी येथील ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता आणि सांडपाणी व्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला असून ग्रामपंचायतीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासनाने आठ दिवसांत ठोस कार्यवाही करावी, अन्यथा ग्रामपंचायत कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

गावातील पाणीपुरवठ्याच्या टाकीची वर्षानुवर्षे स्वच्छता करण्यात आलेली नाही. चार विहिरी उपलब्ध असतानाही नियोजनाअभावी चार ते सहा दिवसांआड पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. दुसरीकडे, गावातील नाल्या तुंबलेल्या असून सांडपाण्याचा निचरा होत नसल्याने अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले आहे. डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने मलेरिया, चिकनगुनियासारख्या आजारांचा धोका नागरिकांना सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, नाल्यांच्या स्वच्छतेवर दाखविण्यात आलेल्या खर्चाबाबत ग्रामस्थांनी संशय व्यक्त केला आहे. प्रत्यक्ष परिस्थिती आणि कागदोपत्री खर्च यामध्ये तफावत असल्याचा आरोप करत या कामांची स्वतंत्र विभागामार्फत चौकशी आणि विशेष लेखापरीक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे. वारंवार अर्ज-विनंत्या करूनही समस्यांची दखल घेतली जात नसल्याने ग्रामस्थांचा संताप आता आंदोलनाच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. १२ नोव्हेंबर २०२६ रोजी गटविकास अधिकारी उज्ज्वला ढोले यांना पालकमंत्री संजय राठोड, आरोग्यमंत्री, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित प्रशासनाच्या नावे निवेदन सादर करण्यात आले. ८० हून अधिक नागरिकांनी स्वाक्षऱ्या करून या मागण्यांना पाठिंबा दिला आहे. आता प्रश्न केवळ आश्वासनांचा नसून प्रत्यक्ष कार्यवाहीचा आहे. आठ दिवसांत प्रशासन जागे होणार की ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागणार, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

नेचरल शुगरचे १ लाख ६५ हजार मे. टन उसाचे गाळप

शेतकऱ्यांना पहिली उचल प्रतिटन ३ हजार २०० रुपये, संपूर्ण ऊस गाळपाचे नियोजन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




महागाव, दि. १४ : गुंज नेचरल शुगर अँड अलाइड इंडस्ट्रीज लिमिटेड, युनिट-२, गुंज (महागाव) येथील साखर कारखान्याचा चालू गळीत हंगाम ११ ऑक्टोबरपासून सुरू झाला असून, अवघ्या ३८ दिवसांत कारखान्याने १ लाख ६५ हजार मे. टन उसाचे गाळप पूर्ण केले आहे. या गळीत हंगामासाठी कारखान्याकडे शेतकऱ्यांनी ९ हजार १०० हेक्टर क्षेत्रावरील उसाची नोंद केली आहे.

त्यापैकी आजपर्यंत १ हजार ७०० हेक्टर क्षेत्रावरील ऊस तोडून गाळपासाठी आणण्यात आला आहे. सध्या कारखान्यात दररोज ५ हजार २०० ते ५ हजार ५०० मे. टन उसाचे गाळप सुरू आहे. नेचरल शुगरने विदर्भात उसाला सर्वाधिक दर देण्यासोबतच गाळपासाठी आलेल्या उसाची रक्कम नियमानुसार वेळेत शेतकऱ्यांना देण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. यंदाच्या हंगामात प्रतिमेट्रिक टन ३ हजार २०० रुपये पहिली उचल जाहीर करण्यात आली असून, ३१ ऑक्टोबरपर्यंत गाळपासाठी आलेल्या उसाची रक्कम शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अदा करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाचाही अंतिम ऊसदर समाधानकारक राहणार असल्याचे कारखाना प्रशासनाने यापूर्वीच जाहीर केले आहे. कारखान्याकडील आधुनिक तोडणी व वाहतूक यंत्रणा कार्यरत असून, तोडणी कार्यक्रमानुसार दररोज ७ ते ८ हजार मे. टन ऊस गाळपासाठी येत आहे. यंदा नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, त्याचा परिणाम उसाच्या उत्पादनावर होण्याची शक्यता आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त गाळप करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा कारखाना प्रशासनाचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांनी नेचरल शुगरकडे नोंद केलेल्या संपूर्ण उसाचे गाळप फेब्रुवारी २०२७ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता आपला ऊस नेचरल शुगर कारखान्याला देऊन सहकार्य करावे, असे आवाहन कारखान्याचे चेअरमन व कार्यकारी संचालक बी.बी.ठोंबरे यांनी केले आहे.

शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा दणका!

१२ तासांत बोरीच्या शेवटच्या शेतापर्यंत सिंचनाचे पाणी,रब्बी पिकांना जीवदान

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



उमरखेड, दि. १४ : सिंचनाच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला आणि त्यानंतर अवघ्या १२ तासांत पाणी शेतापर्यंत पोहोचले. तालुक्यातील बोरी (चा.) येथील सुमारे १०० शेतकऱ्यांच्या एकजुटीने पाटबंधारे विभागाला तातडीने हालचाल करण्यास भाग पाडले.

इसापूर धरणाच्या डाव्या कालव्यातून पाणी सोडण्याच्या मागणीसाठी शुक्रवारी (दि. १३) शेतकऱ्यांनी ऊर्ध्व पैनगंगा पाटबंधारे प्रकल्प क्रमांक २ च्या उपविभागीय अभियंता कार्यालयावर घेराव घातला होता. इसापूर धरणातून १० नोव्हेंबरला पाणी सोडण्याचे जाहीर झाले होते. मात्र, प्रत्यक्षात पाणी न पोहोचल्याने बोरीच्या लाभक्षेत्रातील रब्बी पिके संकटात सापडली होती. पाण्याअभावी पिकांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाल्याने सरपंच धनंजय माने यांच्यासह सुमारे १०० शेतकऱ्यांनी कार्यालय गाठून निवेदन दिले. यावेळी उपविभागीय अभियंता श्रीराम खोकले यांनी दोन दिवसांत पाणी पोहोचविण्याची ग्वाही दिली होती. मात्र, दोन दिवसांची प्रतीक्षा न करता खोकले यांनी तातडीने नियोजन केले. मुख्य कालव्यावरील सिंचन पूर्ण झालेल्या वितरिका बंद करणे, पाण्याची मागणी असलेल्या भागातील उपसा थांबविण्याचे आवाहन आणि आवश्यक तांत्रिक उपाययोजना करून पूर्ण दाबाने पाणी सोडण्यात आले. विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रात्रंदिवस मेहनत घेत अवघ्या १२ तासांत बोरीच्या टेलवरील शेवटच्या शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पाणी पोहोचविले. शेतकऱ्यांच्या एकजुटीचा परिणाम आणि अधिकाऱ्यांची तत्परता यामुळे रब्बी पिकांना दिलासा मिळाला. खोकले व त्यांच्या कर्मचाऱ्यांचे शेतकऱ्यांनी आभार मानले. मात्र, पाण्यासाठी आंदोलनाची वेळच येऊ नये, यासाठी सिंचनाचे नियोजन वेळेत होणेही तितकेच गरजेचे आहे.

देवाकडे जाताना ‘सत्कर्म’ आणि ‘दातृत्व’ हीच खरी करन्सी; हरिओम भूत यांचे प्रतिपादन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. १४ : आयुष्यभर मुलांसाठी कष्ट उपसणाऱ्या आई-वडिलांना उतारवयात आधाराची गरज असताना त्यांनाच वृद्धाश्रमाचा रस्ता धरावा लागणे, हे बदलत्या समाजव्यवस्थेचे विदारक वास्तव आहे. ज्येष्ठांच्या आयुष्यात मायेचा दिवा लावणे, त्यांच्या अश्रूंना आधार देणे आणि त्यांना सन्मानाने जगण्याची संधी देणे, हेच खरे माणुसकीचे कार्य आहे.

परदेशात जशी त्या देशाची करन्सी चालते, तशीच देवाकडे जाताना ‘सत्कर्म’ आणि ‘दातृत्व’ हीच खरी करन्सी असते, असे भावस्पर्शी प्रतिपादन स्व. सत्यनारायण अमोलकचंदजी भूत वृद्धाश्रमाचे अध्यक्ष हरिओम भूत यांनी केले. चौसाळा येथील वृद्धाश्रमात शनिवारी (दि. १४) दिवाळीनिमित्त आयोजित पत्रकार स्नेहमिलन सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यवतमाळ जिल्हा श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष श्रीकांत राऊत होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार तथा दैनिक लोकमतचे उपवृत्तसंपादक विशाल सोनटक्के उपस्थित होते. मंचावर संस्थेच्या उपाध्यक्ष मंजुदेवी भूत यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात हरिओम भूत यांनी वाडवडिलांकडून मिळालेला दानधर्माचा वारसा पुढे नेत ज्येष्ठांना उत्तम सुविधा आणि कौटुंबिक जिव्हाळा देण्याचा संकल्प व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात श्रीकांत राऊत यांनी वृद्धाश्रमांची वाढती संख्या ही समाजासाठी चिंतेची बाब असल्याचे सांगितले. नोकरी, स्थलांतर किंवा अन्य कारणांमुळे ज्येष्ठांना एकाकी जीवन जगावे लागत असले, तरी जन्मदात्यांना प्रेम, सन्मान आणि आपुलकी देण्याची जबाबदारी कुटुंबांनी विसरू नये, असे त्यांनी स्पष्ट केले. विशाल सोनटक्के यांनी भविष्यात भारताची ओळख वृद्धांच्या देशाच्या रूपात होण्याची शक्यता व्यक्त करताना ‘वृद्धाश्रमविरहित समाज’ निर्माण करण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी वृद्धाश्रमातील ज्येष्ठांनी येथे निवास, भोजनासह सर्व सुविधा मोफत मिळत असून २४ तास रुग्णवाहिकेची व्यवस्था असल्याचे सांगितले. हरिओम भूत आणि भूत परिवाराच्या सेवाभावामुळे हा वृद्धाश्रम नसून आमच्यासाठी ‘आनंदाश्रम’ आहे, अशा कृतज्ञ भावना त्यांनी व्यक्त केल्या. रमन अग्रवाल यांनी संचालन, डॉ. विजय अग्रवाल यांनी आभार मानले, तर सचिव हरिभाऊ घलवार यांनी ज्येष्ठांशी संवाद साधला. पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खुनाच्या आरोपातून नऊ वर्षांनंतर केले निर्दोष मुक्त.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पुसद, दि. १४ : सातघरी महागावं जि यवतमाळ येथील किशोर जाधव ह्यांनी दिनांक २४ फेब्रुवारी २०१७ रोजी मुलगा धीरज वय वर्ष ४ हा पाळण्याचे झोळीत असता घरी कोणी नसताना मरण पावला म्हणून पोलीस स्टेशन महागाव येथे लेखी कळिवले . प्रकरणात सरकारच्या वतीने दिलीप चव्हाण ना. पो कॉ १०२५ पो स्टे महागाव ह्यांनी अज्ञात व्यक्तीचे नावे भा दवी कलम ३०२ नुसार अपराध नोंदविला, तपासा दरम्यान वडील किशोर जाधव ह्यास दि.२५ फेब्रुवारी २०१७ रोजी मुलगा धीरज ह्याचें खुनात आरोपी म्हणून अटक केले, प्रस्तुत प्रकरणी आरोपी किशोर जाधव ह्याचे जामीन अर्ज वेळोवेळी नामंजूर झाल्याने प्रकरण अखेरीस पुरावे नोंदणी साठी लागले ह्या सेशन प्रकरणात शासनाच्या वतीने सन २०२२ पासून पुरावे नोंदणी होऊन सरकारने मृतक धीरज ची आई सह जवळपास ११ साक्षीदार तपासले त्यात तपास अधिकारी के आय मिर्झा ह्यांच्या महत्वपूर्ण साक्ष झाल्यात, सदर प्रकरण पुसद येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब श्रीमती एस जे रामघडीया मॅडम ह्यांचे न्यायालयात चालले प्रकरणात आरोपी किशोर जाधव ह्याचे वतीने ॲड. विरेंद्र राजे ह्यांनी समर्थपणे बाजू मांडली त्यात मा.अतिरिक्त सत्र न्यायालयाने आरोपी किशोर ह्यास दिनांक ७ नोव्हेंबर २०२६ रोजी निकाल देऊन निर्दोष केले.

माहिती व जनसंपर्क विभागातील सहायक अधीक्षक सुमित राठोड यांचे आकस्मिक निधन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. १४ : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई येथे कार्यरत असलेले यवतमाळचे सुपुत्र तथा सहायक अधीक्षक सुमित हरीदास राठोड (वय ४५) यांचे १४ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने विरार येथील त्यांच्या राहत्या घरी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने माहिती व जनसंपर्क विभागातील अधिकारी-कर्मचारी वर्ग व पत्रकार बांधवांमध्ये शोककळा पसरली आहे.

सुमित राठोड हे मुळचे यवतमाळ जिल्ह्यातील रहिवासी होते. त्यांची २००८ मध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई येथे लिपिक पदावर नियुक्ती झाली होती. गेल्या १८ वर्षांपासून ते महासंचालनालयात सेवेत होते. आपल्या कार्यकाळात त्यांनी विविध शाखांमध्ये जबाबदारीने आणि उत्तमपणे कामकाज केले. त्यांच्या कार्यतत्परतेची दखल घेऊन त्यांना सहायक अधीक्षक पदावर पदोन्नती मिळाली होती. कार्यालयीन कामकाजात प्रभावी, कर्तव्यदक्ष आणि मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. शांत स्वभाव, कष्टाळू आणि उत्तम विनोदबुद्धीमुळे ते सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये लोकप्रिय होते. त्यांच्या अकाली निधनाने विभागाने एक कार्यक्षम आणि दिलखुलास सहकारी गमावला आहे. त्यांचे पार्थिव काल रात्री मुंबई येथून यवतमाळ येथे आणण्यात आले. आज रविवारी सकाळी ९ वाजता यवतमाळ येथील मोक्षधाम, आर्णी रोड, वडगाव येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात आई-वडील, एक भाऊ, दोन बहिणी, पत्नी, १३ वर्षांची मुलगी आणि ९ वर्षांचा मुलगा असा आप्त परिवार आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

मनपाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी

परभणी महानगरपालिकेच्या धर्तीवर जीएसटीत वाढ

अमरावती/का.प्र.

अमरावती महानगरपालिकेची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी आणि शहराच्या विकासाला गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्याचे संकेत राज्य सरकारने दिले आहेत. परभणी महानगरपालिकेच्या धर्तीवर अमरावती महानगरपालिकेला मिळणाऱ्या वस्तू आणि सेवा कराच्या (जीएसटी) रकमेत मोठी वाढ होणार असून, दरमहा मिळणारे अनुदान सुमारे १८ कोटी रुपयांवरून ४७ कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे, महानगरपालिकेद्वारे निर्माण होणारी ही प्रचंड रक्कम विकासाचा मार्ग स्वीकारण्यास मदत करेल, असा विश्वास राज्याचे महसूल मंत्री आणि जिल्हा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

सर्किट हाऊस परिसरात आयोजित दिवाळी मिलन कार्यक्रमात अमरावतीचे संपादक, पत्रकार आणि माध्यम प्रतिनिधी यांच्यात उत्तम संवाद झाला. यावेळी कचरा, अस्वच्छता, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती, सुरू असलेले विकास प्रकल्प आणि स्थानिक पालकमंत्र्यांच्या मुद्द्यावर महत्त्वाची भूमिका मांडली. दिवाळी मिलन कार्यक्रमाला आ.संजय खोडके, प्रवीण पोटे-पाटील, सुलभा खोडके, प्रताप अडसड, प्रवीण तायडे, चंदू यावलकर, माजी खासदार नवनीत राणा यांच्यासह भाजपचे अधिकारी, नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

विकासकामांना मिळणार गती



२७ नोव्हेंबरला महानगरपालिकेत बैठक

अमरावतीसारख्या विभागीय मुख्यालयाच्या शहरात, पत्रकारांनी कचऱ्याचे ढिग, स्वच्छतेचा भार आणि वाढत्या नागरी समस्यांकडे लक्ष वेधले. स्वच्छतेची समस्या आणि त्यासंबंधित कार्यपद्धतीबद्दल प्रश्न उपस्थित करण्यात आले. यावर बावनकुळे यांनी २७ नोव्हेंबर रोजी अमरावती महानगरपालिकेची मोठी बैठक घेणार असल्याची घोषणा केली. या बैठकीत केवळ स्वच्छतेचाच नव्हे, तर महानगरपालिकेशी संबंधित सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांचा आढावा घेतला जाईल. प्रत्येक मुद्द्यावर अधिकाऱ्यांकडून उत्तरे मागितली जातील. समस्यांच्या मुळाशी जाऊन त्यावर तोडगा काढण्याचे प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे या बैठकीत महापालिका प्रशासन आणि स्वच्छता कंत्राटदाराच्या कामकाजाबाबत काय निर्णय होतो, याकडे शहरवासियांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळात शेतकऱ्याना शासनाचा आधार

बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील दुष्काळ परिस्थितीसाठी नियोजन करताना दूरदृष्टी दाखवली. जलस्रोतांचे नियोजन करणे, आवश्यक उपाययोजना करणे आणि शेतकऱ्यांना मदतीचा हात देणे ही सरकारची जबाबदारी होती. ते म्हणाले की, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री आणि लोकप्रतिनिधींनी दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी कुटुंबांसोबत दिवाळीची सजावट केली आणि सरकार त्यांचे शिष्य असल्याचे आश्वासन दिले. आदिवासी कुटुंबासोबतच्या दिवाळी फराळाच्या अनुभवामुळे त्यांनी हे विधान केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र वेगाने प्रगती करत असल्याचा दावा बावनकुळे यांनी केला. २०२९ ते २०३४ पर्यंत राज्य पोलीस दलाचे नेतृत्वही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संक्षिप्त

विद्यापीठात पंडीत जवाहरलाल नेहरू जयंती



अमरावती -संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात भारताचे पहिले पंतप्रधान भारतरत्न पंडीत जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील तसेच कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. संचालन तसेच पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

विभागीय आयुक्त कार्यालयात अभिवादन



अमरावती-भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती आज अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विभागीय आयुक्त कार्यालयातील नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी नाझर आशिष अंबाडकर, सुरज पुनसे यांच्यासह विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या स्मृतीना अभिवादन केले.

तिवसा नगरपंचायतवर भाकपची धडक



कुऱ्हा-तिवसा नगरपंचायत मधील विविध प्रश्नाचे सोडवणून होण्याचे अनुषंगाने भारतीय कम्युनिस्ट पक्ष तिवसा शहर कमेटीने धडक मोर्चा आयोजीत करण्यात आला होता.यावेळी डिसेंबर २६ पर्यंत गुणवत्ता पुर्वक काम करून जनतेला शुध्द पाण्याचा पुरवठा करा,गुरांकरीता शेतकरी मागतील त्या जागेवर हौद निर्माण करा, झालेल्या कामाचे स्पेशल ऑडिट करून अहवाल सार्वजनिक करा.घर कुलाचे थांबलेले पैश्याचे वाटप करा. आर्थिक दुष्ट्या कमकुवत व्यक्तीस नळ घेण्यासाठी अनामत रक्कम भरण्यास सवलत द्या आदी मागण्या करण्यात आल्या.यावेळी शिष्टमंडळाने नगरपंचायत अध्यक्षा व अधिक्षक यांचेसोबत चर्चा केली.यावेळी कॉ प्रकाश सोनोने, कॉ.चंद्रकांत वडस्कर, कॉ दिलीप गोहत्रे,हिम्मत थोटे,माया वाघमारे,शशिकला आवाड,अनुबाई यावले,नथ्थु फरकाळे,कॉ संजय गोरडे, नरेंद्र बावणे,अनिल मुंदाने,प्रविण सुरजुसे,अतुल डाखोरे,किसन आप्पा मंजु नवाद पठान,रूपराव चाफले सुरेश कळसकर, शकुंतला बाई वानखडे,तेजस्वीनि दारवेकर आदीनी सहकार्य केले.

‘जोतिबाची सावली-सावित्री माऊली’ महानाट्य आज

दर्यापूर-फुले दांपत्याच्या जीवनावर आधारित ’ज्योतिबांची सावली-सावित्री माऊली’ हे ऐतिहासिक आणि संघर्षमय भव्य नाटक रविवार, १५ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता इंद्रप्रस्थ लॉनवर आयोजित करण्यात येत आहे.हे नाटक महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्ट दर्यापुरचा यांच्या वतीने आयोजित केले जात आहे. याचे लेखन किंवा नाट्यरूपांतर अपूर्व सोनार प्रा. लि. यांनी केले असून, जयकुमार चरजन यांची प्रमुख भूमिका आहे. सदर महानाट्याच्या लाभासाठी विश्वासू प्राचार्य नीलकंठ बोरोले, मुख्य संयोजक प्रदीप लांडे, महासचिव रवींद्र ढोकणे, अंबादास जावरकर इत्यादींनी आवाहन केले आहे.



एसआरपीएफ वसाहतीतील रस्त्यांची दुरवस्था

डांबरीकरण उखडले, रस्ते बंद, सुरक्षेचा प्रश्न उपस्थित
नगरसेवक पंचफुला चव्हाण यांचे पालकमंत्र्यांना निवेदन

अमरावती/का.प्र.

वडाळी राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) गट क्रमांक ९ च्या ५०० क्वार्टर निवासी भागातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. रस्त्यावरील खडी पूर्णपणे उखडली असून सर्वत्र मोठे खड्डे पडले आहेत.यामुळे रात्री संपूर्ण परिसर अंधारात राहतो. त्यामुळे पोलिसांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या समस्येबाबत, अडचणींना तोंड देत असलेले नगरसेवक पंचफुला चव्हाण यांचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवासी रस्त्यांचे नवीन डांबरीकरण आणि पथदिव्यांची व्यवस्था करण्याची मागणी केली आहे.

एसआरपीएफ परिसरात अनेक कुटुंबे राहतात. मात्र, अनेक वर्षांपासून रस्त्याची योग्य देखभाल आणि दुरुस्ती न झाल्यामुळे, रस्त्यावरील खडीवर धूळ साचली आहे. विविध ठिकाणी खड्डे बांधल्यामुळे वाहनचालकांना खूप त्रास सहन करावा लागतो. विशेषतः दुचाकीचा अपघात होण्याची शक्यता असून, त्याचा फटका लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना बसतो. विशेषतः, गट क्रमांक ९ मधील वसाहतीच्या निवासस्थानाच्या परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण केले जात आहे. फक्त पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांनाच हे लागू आहे.



रस्त्यांच्या दुर्लक्षाचा मुद्दा विनंतीनुसार उघडकीस आणण्यात आला आहे. त्यांनी नमूद केले आहे की, सुमारे १० ते १२ किलोमीटरच्या मुख्य आणि उपनगरीय रस्त्यांचे नवीन डांबरीकरण करण्याची गरज आहे. याशिवाय, बंद असलेले रस्त्यावरील दिवे तात्काळ दुरुस्त करून आवश्यक ठिकाणी नवीन दिवे बसवण्याची मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा जिल्हा प्रशासनामार्फत या कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी पालकमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानव मुक्ती लढ्याचे अमरावतीत रणशिंग फुंकले

प्राचार्य डॉ.संजय खडसे यांचे प्रतिपादन

अमरावती/का.प्र.

भारतरत्न बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १३ व १४ नोव्हेंबर १९२७ रोजी अमरावती येथे अंबादेवी मंदिर सत्याग्रह परिषद घेतली. या परिषदेत अस्पृश्यता व सत्याग्रहाची सिद्धी विशद करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानव मुक्ती लढ्याचे रणशिंग फुंकले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अमरावती नगरीला बाबासाहेबांचा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. अमरावतीचा अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रह, महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हे भारतीय इतिहासाच्या मानव मुक्ती संग्राम मधील दखलपात्र पर्व होय. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संजय खडसे यांनी धम्मदेसना देताना केली.



ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अमरावती शहर आगमन भूमी आता धम्मभूमी बनली आहे बाबासाहेबांच्या ९९ व्या आगमन अमरावती आगमन स्मृतिदिनानिमित्त दोन दिवसीय बौद्ध धम्म प्रबोधन मेळाव्याचे आयोजन भीम वाटिका धम्मभूमी बुद्ध विहार परिगणित कॉलनी, काँग्रेस नगर रोड, अमरावती येथे संपन्न होत असलेल्या कार्यक्रमात बोलत होते.परिगणित कॉलनी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याला प्रा. डॉ. अंबादास वानखडे व प्राचार्य डॉ. संजय खडसे यांच्या हस्ते हारार्पण करण्यात आले. तद्नंतर पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण संपन्न झाले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून वीरपिता धनंजय गुळदेकर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. भीमराव वानखडे, तथागत टीव्ही चॅनलचे अरुण वानखडे, मोहन खंडारे, अंबादास वानखडे हे उपस्थित होते. कार्यक्रमास धीरज सोनवणे, सुरेश रामटेके, रंजना बनसोड,संगीता मेश्राम, ज्योती तंतरपाळे, प्रियंका प्रतीक खंडारे,प्रियंका खंडारे, मानसी मंगेश वानखडे, डॉ. अविनाश सवाई, आयु. प्रतीक खंडारे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

तपोवनाते रंगली विदर्भ साहित्य संघाची ‘दिवाळी काव्यपहाट’

अमरावती/का.प्र.

विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन या अतिरम्य ठिकाणी दीपावलीच्या पर्वावर विदर्भ साहित्य संघ शाखा अमरावती आणि जॉईटस ग्रुप ऑफ अमरावती तसेच गोविंद कासट मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने भेटवस्तू वाटप आणि ‘दिवाळी काव्यपहाट’ हा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष तसेच तपोवनचे विद्यमान अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई होते. याप्रसंगी नामवंत साहित्यिका तथा विदर्भ साहित्य संघाच्या केन्द्रीय कार्यकारिणी सदस्या डॉ. शोभा रोकडे,अभिनंदन बँकेचे अध्यक्ष सुदर्शन गांग, वि. सा. संघाचे शहराध्यक्ष मा. डॉ. शामसुंदर निकम,शहर सचिव आबासाहेब कडू, पत्रकार सुधीर जोशी तसेच जॉयन्टस् ग्रुपचे पदाधिकारी व्यासपीठावर विराजमान होते.

उपस्थित मान्यवरांच्या



स्वागत समारंभाचा आणि मनोगताच्या कार्यक्रमापूर्वी विदर्भ साहित्य संघ शाखा अमरावतीच्या केंद्रीय कार्यकारी सदस्य प्रसिद्ध साहित्यिक डॉ शोभा रोकडे यांनी तपोवन बद्दल सुंदर विधान केले. कुष्ठरोगी बांधवांकरिता आणि उपस्थितांकरिता विदर्भ साहित्य संघाच्या वतीने कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले या कवी संमेलनाचे संचालन प्रसिद्ध कवीयत्री शिवानी वेरुळकर यांनी केले.संमेलनाची सुरुवात प्रसिद्ध साहित्यिक डॉ.शोभा रोकडे यांच्या सुंदर अभंगांनी झाली.

'उजाळले कसे, दिव्यांचे हे पर्व
पिऊनचा सर्व, पावसाळा...'

'नाही ओला थेंब , धरणीत मुरला
दाह ना सरला, मनातला...'

यावर्षी हे दिव्याचे पर्व कसे उजाळले...अवनी तृप्त झाली नाही... मन चिंब झाले नाही... कोरड्या पावसाळ्याचे आणि दुष्काळाचे वर्णन करणारी ही अभंग रूपी कविता कवी किशोर जऱ्हाड यांनी आपल्या सुमधुर स्वरात गाऊन सर्वांचे लक्ष आकर्षित केले. यानंतर कवी किशोर जऱ्हाड यांनी स्वतःची रचना स्वरबद्ध सादर केली.

'मी पाहिले फुलांना काट्यात हासतांना
गंधीत रातराणी वा-यात वाहतांना...
रात्रीस भूक त्याच्या पोटात पेट घेते
तो झोपडीत विझतो अंधार जाळतांना...'

यानंतर कवी संदीप देशमुख यांनी ‘चांदण्यांनी गाव न्हावं.....’ ही सुंदर रचना सादर केली.कवी ॲड.सुरेश चापोरकर यांनी आपली ‘सन दिवाळीचा...’ ही कविता सादर केली. कवी संमेलनामध्ये प्रा.डॉ.प्रवीण गुल्हाणे यांनी ‘घेणं नाही देणं नाही...’ही माझी संसारीक वऱ्हाडी कविता सादर केली. कवी विशाल मोहोड यांनी ‘अरे गरीबी अमेरी असे मनाचं दुखणं....’, ज्येष्ठ वऱ्हाडी कवी आबासाहेब कडू यांनी ‘दिवाई सहाय्य गरीब गुदाले....’ इत्यादी हृदयस्पर्शी कविता सादर केल्या यासोबतच डॉ.श्यामसुंदर निकम सर, तीरमारे,प्रभा आवारे यांनी सामाजिक आशयाच्या कविता सादर केल्या. कवी दीपक दारव्हेकर यांच्या ‘कुठं लावान थीगय...’या कवितेने समाजात आणि शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या बदलांकडे सर्वांचे लक्ष वेधले.

दिवाळीच्या दिवशी तपोवन येथे उपस्थित सर्वांनी कुष्ठबांधवांसोबत घालवलेले तीन तास त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य पाहून कसे निघून गेले कळलेही नाही. यानंतर सर्वांनी तपोवन मधील कुष्ठरोगी बांधवांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आणि तपोवन च्या वतीने दिवाळीच्या फराळाचा आस्वाद घेतला.

सुरतहून २२१ मीटरची साडी कौडण्यपूरच्या मातेला अर्पण करण्यासाठी रवाना!

रविराज देशमुख यांची संकल्पना

कौंडण्यपूर/वार्ताहर

विदर्भाची तहान भागवणारी आणि लाखो शेतकऱ्यांसाठी जलसंजीवनी ठरणारी वर्धा नदी अर्थात वरदायिनी मातेला २२१ मीटर लांबीची भव्य साडी अर्पण करण्यात येणार आहे. अंबा रुक्मिणी महोत्सव २०२६ च्या निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या या अनोख्या सोहळ्यासाठी विशेष स्वरूपात तयार करण्यात आलेली २२१ मीटरची साडी गुजरातमधील सुरत येथून कौंडण्यपूरच्या दिशेने रवाना झाली आहे. महोत्सवाचे अध्यक्ष रविराज देशमुख यांची ही संकल्पना असून, नदीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासोबतच जलसंवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश या माध्यमातून दिला जाणार आहे.

वर्धा नदी ही विदर्भातील शेती, पिण्याचे पाणी आणि जनजीवनाचा महत्त्वाचा आधार आहे. शेतकऱ्यांच्या शेतशिवाराला समृद्ध करणाऱ्या आणि असंख्य गावांची तहान भागविणाऱ्या या नदीला मातृस्वरूप मानून २२१ मीटर साडी अर्पण करण्याची संकल्पना रविराज देशमुख यांनी मांडली आहे. ॲड. योगेश देशमुख यांच्या माध्यमातून साकारण्यात आलेली ही भव्य साडी आता सुरतहून कौंडण्यपूरकडे रवाना झाली आहे. साडीचे आगमन झाल्यानंतर अंबा रुक्मिणी महोत्सवात वरदायिनी मातेला ती अर्पण करण्याचा भव्य सोहळा पार पडणार आहे.

विविध स्पर्धेकरिता विद्यापीठ महिला व पुरूष संघ घोषित

अमरावती/का.प्र.

पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ विविध स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे पुरुष व महिला संघ घोषित करण्यात आले आहेत.

क्रिकेट (महिला संघ)- चमूमध्ये श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची शलमली क्षत्रिय, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीची अश्विनी देशमुख, जान्हवी गोफणे, श्रृती गिते, एकता भावसार, प्राची पुरी, भारतीय महाविद्यालय, अमरावतीची ग्रीष्मा तट्टे, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीची दिशा काळे, शिवराजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केळापूरची भूमिका गेडाम, व्यवस्थापन महाविद्यालय, खामगांवची पायल बैस, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची आरसिया अब्दुल व विनिथा कुमारी, पद्मश्री डॉ. व्ही.बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालय, मलकापूरची ऋतुजा लोणे, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीची पायल महिंगे, सुश्री संत यशोदाबी पवार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्णीची रेणुका दरडे, ब्राजलाल बियाणी महाविद्यालय, अमरावतीची अंजली इंगोले, गुंजकर महाविद्यालय, खामगांवची अपूर्वा लकडे, बी.डी. पार्वेकर महाविद्यालय, पांढरकवडाची जान्हवी कुंभारपेल्लीवार, राजश्री शाहु विज्ञान महाविद्यालय, चांदुररेल्वेची उन्नती कोपरकर, श्रीमती आर.डी.जी. महाविद्यालय, अकोलाची राणी घुगे यांचा समावेश आहे.

बुध्दीबळ (पुरुष संघ)- चमूमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख



महाविद्यालय, अमरावतीचा खुश दोशी, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा रोशन कपूर, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा निलिमेश पैठणकर, एस.एस.जी.एम. अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगांवचा शरवा कोलवाडकर, प्रतिक तायडे व आयुष जैस्वाल, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीचा राहुल चाफले, प्रो. राम मेघे इन्स्टिटुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, बडनेराचा विनित सहारे, जे.डी. इन्स्टिटुट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळचा ओम वानखडे याचा समावेश आहे.

टेबल टेनिस (पुरुष संघ)- डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा अथर्व वाईगकर व नलेंद्र मंगमा, एस.एस.जी.एम. सी.ई., शेगांवचा उज्वल शर्मा, डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिटुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, अमरावतीचा कृष्णा महल्ले,विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचा आदर्श कदम व रियान शहा, प्रो. राम मेघे इन्स्टिटुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, बडनेराचा ओम ताकवाले याचा समावेश आहे.

फुटबॉल (पुरुष संघ)- चमूमध्ये मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हाचा ऋतिक अतकर, प्रज्योत तायडे व ओम काशिकर, डी.सी.पी.ई. , अमरावतीचा राज मिश्रा, डुकी वाकोर सातेन, आफिर्मिंग टिलांग, मेडॉन गुजो फिरा, जॉय शेळके, सोनम तमांग, एम्ब्रू शिला, डेहॉनलांग बैंक, डोरंगु मारक व इयाकीसलाम लॅनॉंग, नेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंतचा कार्तिक मुंधडा, जी.एस. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारचा साहिल बेनिवाले, तन्विर लालुवाले, फैजल शेख व सुफियान अब्दुल, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा ओम धारव, मुस्तफा शेख, इंदिरा गांधी महाविद्यालय, राळेगांवचा अभिषेक बुटके, यश यादव, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा हिमालय लोंढे, जे.डी. इन्स्टिटुट ऑफ इंजि. ॲन्ड टेक्नॉ., यवतमाळचा कैवल्य राठोड, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचा आयुष जगनाडे, केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा भूषण गेडाम, इंदिरा महाविद्यालय, कळंबचा वेदांत जैस्वाल याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. अधिक माहितीसाठी क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांचेशी संपर्क साधता येईल.

ग.भा.शकुंतला साऊतकर यांचे निधन

कुऱ्हा-मारडा येथील भाजीपाला विक्रीता गजानन साऊतकर यांची मातोश्री वयोवृद्ध जेष्ठ महिला ग.भा.शकुंतलाबाई जानरावजी साऊतकर यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा गजानन, मुलगी सुमित्रा ठाकरे, स्नुषा, जावाई, नातू, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.त्यांचे अंत्य विधीकरिता सर्वच स्तरावरील नातेवाईक, गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहिक श्रध्दांजली देण्यात आली.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

भारताची वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाहनांची झपाट्याने वाढणारी संख्या यामुळे ऊर्जेची मागणी सातत्याने वाढत आहे. आज देशाच्या ऊर्जा गरजांचा मोठा भाग खनिज तेल आणि नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांवर अवलंबून आहे. भारताला कच्च्या तेलाची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील तेलाच्या किमतीतील चढ-उतार आणि भू-राजकीय संघर्षांचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. या पार्श्वभूमीवर पर्यायी इंधनांचा विकास ही केवळ पर्यावरणीय गरज नसून आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेचीही गरज झालेली आहे.

इथेनॉलचा पुढचा प्रवास

इथेनॉल हे अशा पर्यायी इंधनांपैकी एक महत्त्वाचे इंधन आहे. भारताने पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळून वापरण्याचे धोरण आधीपासून स्वीकारले आहे. ई-२० म्हणजेच २० टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोलला प्रोत्साहन दिल्यानंतर आता १०० टक्के इथेनॉल वापराला मुभा देण्यात आली आहे. मात्र इथेनॉल हे भारताच्या ऊर्जा समस्येवरील संपूर्ण उत्तर आहे का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

इथेनॉल हा रंगहीन आणि ज्वलनशील द्रवपदार्थ असून औषधनिर्मिती, रसायन उद्योग आणि इंधन अशा अनेक क्षेत्रांत त्याचा वापर होतो. इंधन म्हणून इथेनॉलचे महत्त्व त्याच्या ज्वलनक्षमतेमुळे आहे. त्याचा ऑक्टेन क्रमांक पेट्रोलपेक्षा जास्त असल्याने योग्य इंजिनमध्ये नॉकिंगची शक्यता कमी होते. मात्र, त्याची ऊर्जाघनता पेट्रोलपेक्षा कमी आहे. त्यामुळे समान अंतरासाठी काही वाहनांमध्ये इथेनॉलमिश्रित इंधन वापरल्यास मायलेज कमी होऊ शकते. इथेनॉल जैविक स्रोतांपासून तयार करता येते.

भारतात इथेनॉल उत्पादनासाठी प्रामुख्याने ऊस, मळी, मका आणि इतर साखरयुक्त किंवा स्टार्चयुक्त कृषी पदार्थांचा वापर केला जातो. उसाच्या रसातील साखरेचे यीस्टच्या साहाय्याने किण्वन केले जाते. साखर कारखान्यांमध्ये साखर तयार करताना मिळणाऱ्या मळीतील उरलेल्या साखरेपासूनही इथेनॉल तयार करता येते. त्यानंतर डिस्टिलेशन आणि निर्जलीकरणाद्वारे पेट्रोलमध्ये मिसळण्यासाठी आवश्यक असलेले निर्जल इथेनॉल मिळवले जाते. मका आणि इतर धान्यांमधील स्टार्चचे एन्झाइमच्या साहाय्याने साखरेत रूपांतर करून त्यापासूनही इथेनॉल तयार करता येते. याशिवाय भाताचे तूस, गव्हाचे काड, उसाचे पाचट आणि इतर कृषी अवशेषांमधील सेल्युलोज व हेमिसेल्युलोजचे विघटन करून दूजी इथेनॉल तयार केले जाते. यामुळे अन्नधान्याशी थेट स्पर्धा न करता शेतीतील काडीकचऱ्याचा उपयोग होऊ शकतो.



इथेनॉल वापराचे अनेक फायदे आहेत. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळल्याने पेट्रोलियमची गरज काही प्रमाणात कमी होते. त्यामुळे परकीय चलनाची बचत होते आणि ऊर्जा सुरक्षेला मदत होऊ शकते. ऊस आणि मका उत्पादक शेतकऱ्यांना अतिरिक्त बाजारपेठ मिळते. साखर कारखान्यांसाठीही इथेनॉल हा उत्पन्नाचा पर्यायी स्रोत ठरतो. डिस्टिलरी, साठवण, वाहतूक आणि प्रक्रिया उद्योगांमुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होतात. शाश्वत कृषी स्रोतांपासून तयार केलेल्या इथेनॉलमुळे संपूर्ण जीवनचक्राचा विचार करता जीवाश्म इंधनांच्या तुलनेत कार्बन उत्सर्जन कमी होऊ शकते.

तथापि, इथेनॉल उत्पादनासमोर काही गंभीर आव्हाने आहेत. भारतातील इथेनॉल उत्पादनाचा मोठा भाग ऊस आणि मळीवर आधारित आहे. ऊस हे पाण्याची मोठी गरज असलेले पीक आहे. ऊसशेतीचा विस्तार करताना पिण्याचे पाणी, शेती आणि औद्योगिक वापर यांच्यात संतुलन राखणे अत्यंत आवश्यक आहे. मका आणि इतर अन्नधान्यांचा इथेनॉल उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावर वापर केल्यास अन्नधान्याच्या उपलब्धतेवर आणि किमतींवर परिणाम होऊ शकतो.

वाहनांच्या दृष्टीनेही आव्हाने कमी नाहीत. इथेनॉलची ऊर्जाघनता पेट्रोलपेक्षा कमी असल्यामुळे इथेनॉल मिश्रित इंधन वापरताना काही वाहनांमध्ये मायलेज घटू शकते. इथेनॉल पाणी शोषून घेणारे असल्यामुळे जुन्या वाहनांमधील काही धातू, रबर आणि प्लास्टिक घटकांशी सुसंगततेचे प्रश्न निर्माण होऊ शकतात. डिस्टिलेशन आणि निर्जलीकरणासाठी ऊर्जा लागते. सांडपाण्याची प्रक्रिया आणि वाहतूक यांचाही खर्च विचारात घ्यावा लागतो. त्यामुळे इथेनॉलचा पर्यावरणीय फायदा मोजताना संपूर्ण उत्पादन साखळीचे मूल्यमापन आवश्यक आहे.

महाराष्ट्रासाठी इथेनॉल उद्योग मोठी संधी ठरू शकतो. राज्यात सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांचे मोठे जाळे आहे. मळी, उसाचा रस आणि सिरप यांपासून इथेनॉल तयार करणे हा साखर कारखान्यांसाठी अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत ठरू शकतो. मात्र राज्यातील सर्व भागांची जलसंपत्ती समान नाही. पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादन आणि मराठवाडा-विदर्भातील पाण्याची उपलब्धता यांचा स्वतंत्र विचार करणे आवश्यक आहे. ठिबक सिंचन, पाण्याचा पुनर्वापर आणि उसाच्या पाचटापासून दूजी इथेनॉल निर्मिती यांमुळे या उद्योगाला अधिक शाश्वत दिशा मिळू शकते.

जगातील काही देशांनी इथेनॉलचा वापर मोठ्या प्रमाणावर केला आहे. ब्राझीलने १९७५मध्ये तेल आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी ईर्देत्म्ददत कार्यक्रम सुरू केला. उसापासून इथेनॉल उत्पादन , पेट्रोलमध्ये मिश्रण आणि शुद्ध इथेनॉलवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन देण्यात आले. तेथे फ्लेक्स फ्युएल वाहने लोकप्रिय झाली. अमेरिका हा जगातील मोठ्या इथेनॉल उत्पादक देशांपैकी एक असून तेथे मका हा प्रमुख कच्चा माल आहे. थायलंडमध्ये ऊस आणि कसावा यांपासून इथेनॉल तयार केले जाते. युरोपीय महासंघाने शाश्वत जैवइंधन, जीवनचक्र विश्लेषण आणि कडक पर्यावरणीय निकषांवर भर दिला आहे.

ऊसशेतीत ठिबक सिंचन आणि पाणी बचतीच्या पद्धती वाढवाव्या लागतील. शेतातील काडीकचऱ्यापासून दूजी इथेनॉल उत्पादनाला आर्थिक व तांत्रिक प्रोत्साहन द्यावे लागेल. अन्नधान्याच्या उपलब्धतेवर प्रतिकूल परिणाम होणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. ई-२० आणि भविष्यातील अधिक मिश्रणांसाठी योग्य इंजिन व इर्ते-इलत वाहन तंत्रज्ञान विकसित करावे लागेल. त्याचबरोबर इलेक्ट्रिक वाहने, बायोडिझेल, बायोगॅस, ग्रीन हायड्रोजन आणि ऊर्जा कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक यांचा समन्वित विकासही आवश्यक आहे.

ई-१०० पेट्रोलची जागा घेऊ शकते का, या प्रश्नाचे उत्तर सावध आशावादाचे आहे. भविष्यात ते काही प्रमाणात पेट्रोलला पर्याय ठरू शकते; पण त्यासाठी वेळ लागेल. सध्या भारतातील बहुतेक कार, बाईक आणि स्कूटर पेट्रोल किंवा ई-२० इंधनासाठी तयार केलेल्या आहेत. त्यामुळे त्या थेट ई-१०० वर चालू शकत नाहीत. पुढील काही काळ पेट्रोल आणि ई-१०० दोन्ही एकत्र वापरले जात राहतील. जसजशी फ्लेक्स-फ्यूएल वाहने बाजारात येतील, तसतसा ई-१००चा वापर वाढेल.

इथेनॉल हे भारताच्या ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. मात्र ते पेट्रोलियमवरील अवलंबित्व पूर्णपणे संपवणारे किंवा सर्व पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करणारे इंधन नाही. पाणी, अन्नसुरक्षा, उत्पादन खर्च, वाहनांची सुसंगतता आणि प्रत्यक्ष कार्बन बचत यांचा समतोल साधला, तरच इथेनॉलचा प्रवास खऱ्या अर्थाने शाश्वत ठरेल. (साभार-म.टा.)

रवींद्र कुलकर्णी

जेडीपी आणि रोजगार

देशाच्या अर्थव्यवस्थेबद्दल चर्चा करताना जीडीपीचा आकडा नेहमी पुढे केला जातो. पण सामान्य माणसाला जीडीपीपेक्षा जास्त महत्त्वाचे वाटते ते म्हणजे त्याच्या हाताला काम आहे का, त्याच्या मुलाला नोकरी मिळते का. सध्या रोजगाराबाबत काही चिंताजनक आकडे समोर आले आहेत. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमीच्या अहवालानुसार ऑक्टोबर महिन्यात सुमारे पाच लाख रोजगार कमी झाले आहेत. बेरोजगारीचा दर ४ टक्क्यांवरून ४.७ टक्क्यांवर गेला आहे. महिलांमधील बेरोजगारी ११.७ टक्क्यांवरून १२.७ टक्क्यांवर, तर ग्रामीण बेरोजगारी ३.४ टक्क्यांवरून ४.७ टक्क्यांवर पोहोचली आहे. शहरी तरुणांमधील बेरोजगारीही वाढली आहे. हे आकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीत.त्याचबरोबर नीती आयोगाच्या अहवालानुसार देशातील सुमारे ८.७ कोटी तरुण हे सध्या शिक्षण, रोजगार किंवा प्रशिक्षण या तिन्हीपासून दूर आहेत. १५ ते २९ या वयोगटातील तरुण ही देशाची खरी ताकद आहे. त्यांच्यापैकी केवळ ८.२५ टक्के पदवीधरांनाच त्यांच्या शिक्षणाशी अनुरूप नोकरी मिळते, हेही वास्तव आहे. म्हणजे शिक्षण आणि रोजगार यामध्ये अजूनही मोठी तफावत आहे.याचा अर्थ असा नाही की देशात काहीच चांगले घडत नाही. गेल्या काही वर्षांत देशात पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक झाली आहे. रस्ते, रेल्वे, मेट्रो, बंदरे, विमानतळ यामुळे अप्रत्यक्ष रोजगार मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. स्टार्टअप, डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, मुद्रा योजना, स्किल इंडिया यामुळे स्वयंरोजगाराची नवी दारे उघडली आहेत. आज लाखो तरुण नोकरी शोधण्यापेक्षा स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करत आहेत. गिग इकॉनॉमी, डिलिव्हरी, ई-कॉमर्स, पर्यटन या क्षेत्रातही नव्या संधी निर्माण झाल्या आहेत.पण तरीही एक प्रश्न कायम आहे, जीडीपी वाढतो आहे, मग रोजगार त्या गतीने का वाढत नाही? याचे कारण आहे, अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलले आहे. पूर्वी उत्पादन क्षेत्रात जेवढी माणसे लागायची, तेवढी आता ऑटोमेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे लागत नाहीत. सेवा क्षेत्र वाढते आहे, पण त्यासाठी विशिष्ट कौशल्य लागते. आपले शिक्षण मात्र अजूनही केवळ पदवीवरच थांबले आहे. त्यामुळे पदवीधर तरुण आहे, पण त्याच्याकडे उद्योगाला हवे असलेले कौशल्य नाही. हीच खरी अडचण आहे. म्हणूनच आता रोजगाराच्या प्रश्नाकडे केवळ सरकारी नोकरीच्या चष्म्यातून पाहून चालणार नाही. सरकारी नोकऱ्या मर्यादित आहेत. खरा रोजगार हा उद्योग, शेतीपूरक व्यवसाय, प्रक्रिया उद्योग, पर्यटन आणि सेवा क्षेत्रातूनच येणार आहे. ग्रामीण भागात शेतीवर आधारित उद्योग वाढले तर ग्रामीण बेरोजगारी कमी होईल. महिलांसाठी घराजवळ काम, बचत गटांच्या माध्यमातून उद्योग आणि डिजिटल कामाची संधी वाढवली तर महिलांची बेरोजगारीही कमी होईल.केंद्र सरकार असो की राज्य सरकार, सर्वांनी आता एकत्रितपणे या विषयावर काम करण्याची गरज आहे. कौशल्य प्रशिक्षण हे केवळ प्रमाणपत्र वाटण्यापुरते न राहता, ते प्रत्यक्ष नोकरीशी जोडले पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यात कोणते उद्योग येऊ शकतात, याचा अभ्यास करून त्यानुसार प्रशिक्षण दिले पाहिजे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये केवळ पुस्तकी ज्ञान न देता, उद्योगांची गरज लक्षात घेऊन अभ्यासक्रम बदलला पाहिजे.रोजगाराचे दिवाळे निघाले आहे, असे म्हणण्यापेक्षा रोजगाराचे स्वरूप बदलले आहे, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. जुने रोजगार कमी होत आहेत, नवे रोजगार निर्माण होत आहेत. पण या नव्या रोजगारासाठी तरुणांना तयार करणे, हीच आजची सर्वात मोठी जबाबदारी आहे. सरकार, उद्योग आणि शिक्षण संस्था यांनी एकत्र येऊन काम केले तरच ही तफावत भरून निघेल.देशातील तरुण हा केवळ मतदार नाही, तो देशाचे भविष्य आहे. त्याच्या हाताला काम मिळाले तरच देशाची अर्थव्यवस्था खऱ्या अर्थाने मजबूत होईल. जीडीपीचा आकडा आणि रोजगाराचा आकडा हे दोन्ही एकाच वेळी वाढले तरच विकासाला खरा अर्थ येईल. त्यासाठी टीका करण्यापेक्षा उपाय शोधणे आणि संधी निर्माण करणे, हाच पुढचा मार्ग आहे.

संस्था सक्षम करणे म्हणजे काय?

पाणी वापर संस्था बळकटीकरणाच्या गोंडस नावाखाली संस्था जागरूक राहणार नाहीत, याचीच काळजी जलसंपदा विभागाने आणि आज कृषी विद्यापीठांनी घेतली आहे. सक्षमीकरणाच्या नावाखाली आजवर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाला, पण गेल्या २० वर्षात संस्था सक्षम करण्याचे सूत्र यांना गवसले नाही, की त्यांना ते शोधायचेच नाही?

पाणी व्यवस्थापनात शेतकऱ्यांचा सहभाग मिळावा, वाढावा आणि त्यांना पाण्याचा हक्क मिळावा, या उद्देशाने शासनाने राज्यात पाणी वापर संस्था स्थापन केल्या. पाण्याचा कार्यक्षम वापर व्हावा म्हणून स्वतंत्र सिंचन कायदा २००५ व नियम २००६ तयार करून मंजूर केला. वाल्मी (WALMI) आणि यशदा (YASHADA) या संस्थांमार्फत अधिकारी, कर्मचारी आणि शेतकऱ्यांना मेळाव्यातून जेथे देऊन या कायद्याचे मनापासून प्रशिक्षणही दिले गेले.

कायद्याचा उद्देश काय होता?

तांत्रिक आणि सहभागी नियोजन :'टेल टू हेड' (शेताच्या टोकापासून सुरुवातीपर्यंत) सुसूत्र पाणी वाटप व्हावे, ही जलसंपदा विभागाची अधिकृत जबाबदारी होती. संस्थेशी झालेल्या करारानुसार विभागाने तांत्रिक भूमिका पार पाडणे अपेक्षित होते.

पाण्याचा काटकसरीने वापर : संस्थेने आपल्या कोट्याचे पाणी मोजून घ्यावे आणि काटकसरीने वापर करून सिंचन क्षेत्र वाढवावे, हा यामागील मुख्य हेतू होता.

आर्थिक सक्षमीकरण : सिंचन क्षेत्र वाढल्याने पाणीपट्टी वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण होईल आणि त्यातून मिळणाऱ्या थेट रकमेच्या परताव्यामुळे संस्थेची आर्थिक व्यवहार सुरळीत चालेल, अशी ही व्यवस्था होती. थोडक्यात, संस्था आधी तांत्रिकदृष्ट्या सक्षम करणे आणि त्यातून तिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे, हाच संस्था बळकटीकरणाचा खरा मार्ग होता.

वस्तुस्थिती आणि गंभीर प्रश्न

दुर्दैवाने, पाणी वापर संस्था बळकटीकरणाच्या गोंडस नावाखाली संस्था



जागरूक राहणार नाहीत, याचाच काळजी जलसंपदा विभागाने आणि आज कृषी विद्यापीठांनी घेतली आहे. सक्षमीकरणाच्या नावाखाली आजवर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाला, पण गेल्या २० वर्षात संस्था सक्षम करण्याचे सूत्र यांना गवसले नाही, की त्यांना ते शोधायचेच नाही?कारण यांना फक्त निधी खर्चात रस आहे, संस्था खऱ्या अर्थाने उभी करण्यात नाही.

अनुत्तरित प्रश्न

कोट्यवधी रुपये खर्चूनही आजवर संस्था बळकट का झाल्या नाहीत?

संस्थेचे नियमित लेखापरीक्षण (Audit) आणि वार्षिक अहवाल सादर का होत नाही?जलसंपदा विभागाने याचा आढावा का घेतला नाही?

सिंचन कामाचे आणि कारभाराचे अमलबजावणी न करणारे अधिकारी संस्था सक्षम करण्यासाठी खरंच प्रयत्नशील आहेत का?

या निकषांमुळे शेतकऱ्याचे जे अतोनात नुकसान झाले आहे, त्याचा लेखाजोखा कोण घेणार?

जलसंपदा विभाग आणि विद्यापीठांनी या प्रश्नांची उत्तरे राज्यातील तमाम पाणी वापर संस्थांना दिलीच पाहिजेत.-

मनोज तायडे,
अध्यक्ष - काटेपूर्णा प्रकल्प समिती,
बोरगाव मंजू, जि. अकोला

गुजरातमधील हिंदू शेतमजुरांच्या २५ वर्षांतील मजुरीतील वाढ जाहीर करावी

मा.श्री. मोहनजी भागवत
सर संघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
नागपूर

विषय: गुजरातमध्ये भारतीय जनता पक्ष २५ वर्षांपासून सत्तेत असूनही हिंदू शेतमजुरांच्या मजुरीत किती वाढ झाली?

सस्नेह, सप्रेम नमस्कार



गुजरातमध्ये, फेब्रुवारी २००८ ला सुरत शहरात भारतीय किसान संघाचे राष्ट्रीय अधिवेशन पार पडले. अधिवेशनात शेतकऱ्यांच्या शोषणावर प्रकाश टाकणारी आकडेवारी छापलेले भगव्या रंगाचे एक पत्रक वाटण्यात आले. पत्रकातील छायाचित्रांच्या छायाप्रती सोबत जोडल्या आहेत.

आज देशभरात सहाव्या वेतन आयोगावरून जोरदार चर्चा सुरू आहे. पंतप्रधान मोदींनी गुजरातचे मुख्यमंत्री असताना सहाव्या वेतन आयोगाला विरोध केला होता, पण सत्तेवर आल्यानंतर त्यांनी सातवा वेतन आयोग लागू केला.

दिवसेंदिवस गावे आणि शहरे यांच्यातील आर्थिक विषमता वाढत आहे. १९९१ पासून देशात आलेल्या आर्थिक मंदीमुळे इंडियाचा सुपर इंडिया किंवा भारताचा आफ्रिकेचा सोमालिया बनत आहे.गेल्या १२ वर्षांपासून मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत, परंतु या पत्राचा विषय असलेल्या एका साध्या आणि सरळ प्रश्नाचे उत्तर मात्र अनुत्तरित राहिले आहे.

काही महिन्यांपूर्वी, मी गुजरात खेडूत समाजाच्या (कै. वास्तुभाभाई पटेल यांचे संस्थापक) एका कार्यक्रमाला उपस्थित होतो. तिथे माझ्या भाषणात मी हा प्रश्न विचारला होता. ग्रीसमधील एका वृत्तपत्राने ते प्रसिद्ध केले – मी त्याची एक छायाप्रत सोबत जोडत आहे.

शेतमजुरांच्या मजुरीचा प्रश्न १९७५ पासून उपस्थित केला जात आहे. भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी २००६ मध्ये माझ्या वायफड (वर्धा)या गावाला भेट देऊन हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यांनी मोदी सरकारला पत्र लिहून हा प्रश्न विचारला होता. पण त्यांना अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही.

भारतरत्न डॉ. एम. एस. स्वामिनाथन आयोगाने पिकांसाठी 2+50% आधारभूत किंमतीद्वारे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या केलेल्या सूचनांची पूर्तता झालेली नाही.आता '२०४७ मधील विकसित भारत' अशी नवीन घोषणा करण्यात आली आहे. विकसित भारतातील शेतमजुरांची मजुरी काय असेल? हा प्रश्न आम्ही मोदी सरकारलाही विचारला आहे.

आम्ही तुम्हाला विनंती करतो की, तुम्ही मोदीजी आणि शहाजी यांना गुजरातमधील हिंदू शेतमजुरांच्या गेल्या २५ वर्षांतील मजुरीतील वाढ जाहीर करण्याची विनंती करावी.

विजय जावंधिया
शेतकरी संघटना पाईक
मोबाईल: ०९४२१७२७९९८

आदिवासी गौरव दिन

संघर्ष, स्वाभिमान आणि संस्कृतीच्या अस्मितेचा जागर

भारताच्या सांस्कृतिक वैभवाचा विचार करताना आदिवासी समाजाचे योगदान दुर्लक्षित करून चालणार नाही. निसर्गाशी नाते जपणारा, जल-जंगल-जमिनीचे महत्त्व जाण णारा, सामूहिक जीवन मूल्यांवर विश्वास ठेवणारा आणि आपल्या संस्कृतीचे अस्तित्व पिढ्यान् पिढ्या जतन करणारा आदिवासी समाज हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. आदिवासी समाजाचा इतिहास म्हणजे केवळ परंपरा आणि रूढींचा इतिहास नाही, तर तो संघर्ष, शौर्य, त्याग, स्वाभिमान आणि आत्मसन्मानाचा गौरवशाली प्रवास आहे. या गौरवशाली इतिहासाचे स्मरण करून देणारा दिवस म्हणजे भगवान बिरसा मुंडा यांचा जन्मदिन.

अन्याय, शोषण आणि ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीविरुद्ध त्यांनी आदिवासी समाजाला संघटित केले. आदिवासींच्या जल, जंगल आणि जमिनीवरील हक्कांसाठी त्यांनी दिलेला लढा भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण पर्व ठरला. ब्रिटिशांच्या शोषणकारी व्यवस्थेविरुद्ध त्यांनी'उलगुलान' अर्थात महाक्रांतीचा नारा दिला. त्यांचा संघर्ष केवळ राजकीय स्वातंत्र्यासाठी नव्हता, तर आदिवासींचे सांस्कृतिक अस्तित्व, सामाजिक प्रतिष्ठा आणि पारंपरिक हक्क सुरक्षित ठेवण्यासाठीही होता. अल्पायुष्यात त्यांनी निर्माण केलेली जनजागृती आजही लाखो लोकांना प्रेरणा देते. ९ जून १९०० रोजी रांची येथील कारागृहात त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून भारत सरकारने २०२१ पासून १५ नोव्हेंबर हा दिवस जनजातीय गौरव दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. खरे पाहता आदिवासी समाजाने निसर्गसंवर्धनाचा आदर्श जगासमोर ठेवला आहे. आदिवासी समाजाचे जीवन निसर्गाशी अतूटपणे जोडलेले आहे. जंगल म्हणजे केवळ उपजीविकेचे साधन नसून ते त्यांच्या जीवनाचा, संस्कृतीचा आणि अस्तित्वाचा आधार आहे. वृक्ष, वन्यजीव, नद्या, डोंगर, माती आणि जैवविविधतेशी त्यांचे भावनिक नाते आहे.

आज संपूर्ण जग पर्यावरणीय असमतोल, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांच्या ऱ्हासाच्या समस्यांना सामोरे जात आहे. अशा परिस्थितीत आदिवासी समाजाची पारंपरिक जीवनशैली, पर्यावरणपूरक विचार आणि निसर्गसंवर्धनाची संस्कृती संपूर्ण मानवजातीला नवी दिशादर्शक आहे. आदिवासी समाजाकडे पारंपरिक ज्ञानाचा अनमोल ठेवा आहे. औषधी वनस्पतींचे ज्ञान, पारंपरिक शेतीपद्धती, लोककला,



डॉ. निलेशकुमार इंगोले
शिरजगाव कसबा, जि. अमरावती
मोब. ९३७११४५१९५

लोकगीते, नृत्य, बोलीभाषा आणि सामूहिक जीवनपद्धती ही त्यांची सांस्कृतिक संपत्ती आहे. या संपत्तीचे जतन करणे ही केवळ आदिवासी समाजाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हे सर्वाधिक प्रभावी साधन आहे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो, हक्कांची जाणीव होते आणि विकासाच्या नव्या संधी उपलब्ध होतात. मात्र दुर्गम आणि अतिदुर्गम भागातील अनेक आदिवासी विद्यार्थ्यांसमोर आजही भौगोलिक परिस्थिती, भाषेची अडचण, आर्थिक मर्यादा, शैक्षणिक साधनांचा अभाव आणि डिजिटल दरी अशी अनेक आव्हाने आहेत. विशेषतः बालकांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या मातृभाषेतून आणि परिचित सांस्कृतिक वातावरणातून होणे महत्त्वाचे आहे. मुलांच्या बोलीभाषेचा आदर करून त्यांना प्रमाणभाषेशी जोडणे, स्थानिक अनुभवांवर आधारित अध्यापन करणे आणि आनंददायी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शाळा ही केवळ अक्षरओळख करून देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे परिवर्तन केंद्र आहे. त्यामुळे प्रत्येक आदिवासी बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण, डिजिटल सुविधा, वाचनसंस्कृती, क्रीडा आणि कौशल्यविकासाच्या दृष्टीने आवश्यक पावले उचलून आदिवासी विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देता येईल. आदिवासी समाजाच्या विकासासोबतच त्यांच्या अस्मितेचेही जतन होणे आवश्यक आहे.

आदिवासी गौरव दिन हा केवळ एका महापुरुषाच्या जयंतीचा उत्सव नाही. हा दिवस आदिवासी समाजाच्या ऐतिहासिक योगदानाचे स्मरण करण्याचा, त्यांच्या संघर्षाचा सन्मान करण्याचा आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. आज गरज आहे ती म्हणजे आदिवासी गौरव दिन साजरा करण्यासोबतच आदिवासी समाजाच्या सन्मानपूर्ण अस्तित्वासाठी, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी, समान संधींसाठी आणि सांस्कृतिक अस्मितेच्या जतनासाठी कृतीशील होण्याची. आदिवासी गौरव दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

बिरसा मुंडा

डोंगरदऱ्यांच्या कुशीत
जन्मला होता एक अंगार

नाव त्यांचे बिरसा मुंडा
केला त्यांनी इतिहास साकार

लोककथा अन् लोकगीते
यांचा अथांग ते महासागर

मिटवला त्यांनी आदिवासा
जीवनातील गर्द अंधार

अन्यायाच्या छाताडावर
केला स्वाभिमानाचा प्रहार

संकटाशी झुंज देतांना
मानली नाही कधी हार

जंगल, जमीन, जलासाठी
उभा केला संघर्ष अपार

मायभुमीच्या रक्षणासाठी
झेलत राहिले सतत वार

अश्या या जननायकास
वंदन करूया त्रिवार

अखंड भारतभूमीचे ते
ठरतात खरे शिलेदार

राजश्री शेषरावजी खाजोने
चांदूरबाजार,
जि.अमरावती
मोब. ९६६५६८०६३९

■ रविवार, १५ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

अकोला
जिल्हा विशेष

आगामी जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये काँग्रेसची कामगिरी लक्षणीय असेल - प्रकाश तायडे

■ प्रतिनिधी | अकोला ■

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या निवडणुकांमध्ये अकोला जिल्ह्यात काँग्रेसची कामगिरी लक्षणीय असेल, असा विश्वास अकोला जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रकाश तायडे यांनी व्यक्त केला. ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीच्या मासिक सभेमध्ये बोलतांना त्यांनी काँग्रेसचे संघटन जिल्ह्यात आतापर्यंत कसे मजबूत तयार झाले आहे याची माहिती उपस्थित लोकसभा व विधानसभा प्रभारींसमोर मांडली. संघटनात्मक बांधणीचे राहिलेले काम ३१ डिसेंबर पर्यंत पूर्ण होईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सभेत नवनियुक्त प्रभारींचा सत्कार



शनिवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी काँग्रेसचे जिल्हा मुख्यालय स्वराज्य भवन येथे पार पडलेल्या या सभेत बोलताना ते म्हणाले की, अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाची धुरा आपल्याकडे आल्यापासून जिल्ह्यात काँग्रेसमध्ये कुठलेही मतभेद व मनभेद राहिलेले नसून सर्व नेते पदाधिकारी व कार्यकर्ते एकजुटीने व एकमताने काँग्रेससाठी कार्य करीत आहेत. या संघटनात्मक कार्याचे यशस्वी परिणाम आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये दिसून येतील. या निवडणुकांमध्ये जिल्ह्यात काँग्रेसचे यश लक्षणीय असेल. तसेच आगामी विधानसभा व लोकसभा निवडणुकांमध्ये सुद्धा जिल्ह्यात काँग्रेसचे वर्चस्व दिसून येईल, असा विश्वास प्रकाश तायडे यांनी यावेळी व्यक्त केला.

जनतेची कामे करण्यासाठी काँग्रेसकडे संवैधानिक पदे असणे आवश्यक आहे आणि त्यासाठी काँग्रेसचे संघटन अधिकाधिक मजबूत व सक्षम असणे आवश्यक आहे, असे मत आ. साजिद खान पठाण यांनी व्यक्त केले. देशातील राजकीय परिस्थिती बदलण्यासाठी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी रात्रंदिवस प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नांना आपल्या प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांची साथ असणे आवश्यक आहे, असे मत अकोला लोकसभा प्रभारी अरविंद कोलते यांनी व्यक्त केले. अकोला महानगरात काँग्रेसची स्थिती सध्या भक्कम व मजबूत आहे, त्याची प्रचिती गेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये दिसून आली. भविष्यात महानगरात काँग्रेस यापेक्षाही अधिकाधिक मजबूत स्थितीमध्ये राहील, असे महानगराध्यक्ष महेंद्र गवई यावेळी म्हणाले.

अकोला जिल्हा काँग्रेस विचारधारेचा जिल्हा आहे. अजूनही या जिल्ह्यात काँग्रेसच्या विचारधारेला मानणारे लोक प्रचंड प्रमाणात आहेत. त्या सर्वांना एकत्र आणून काँग्रेसची पकड पुन्हा एकदा जिल्ह्यावर निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे अकोला जिल्हा प्रभारी ?ड. दिलीपराव सरनाईक यावेळी म्हणाले. आपल्या प्रत्येक नगरसेवकाच्या पाठीशी आपण पक्षाच्या नेत्यांनी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे, तसेच जे उमेदवार पराभूत झालेत त्यांच्या सोबतही आपण खंबीरपणाने उभे राहिले पाहिजे, असे अकोला पश्चिम निरीक्षक धनंजय देशमुख यांनी यावेळी सांगितले. तर काँग्रेसला मजबूत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करा, कोणतीही अडचण आल्यास आपण काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू, असे आश्वासन काँग्रेस प्रभारी अनंतराव वानखडे यांनी यावेळी दिले. काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष डॉ. झिशान हुसेन, प्रदेश महासचिव महेश गणगणे, महानगर काँग्रेस निरीक्षक दिलीप एडतकर यांनीही यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. प्रदेश सचिव प्रशांत पाचडे, अक्षय राऊत, प्रदेश प्रवक्ते डॉ. सुधीर ढोणे, कपिल रावदेव, राजेश मते यांची यावेळी उपस्थिती होती. सभेचे संचालन विजय देशमुख यांनी केले. या सभेला जिल्हाभरातील काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई याबाबत सभेत चर्चा करण्यात आली. आगामी निवडणूकीसह संघटनात्मक बांधणी बाबत सविस्तर चर्चा यावेळी झाली. पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती मान्यवरांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली.

नवनियुक्त लोकसभा व विधानसभा प्रभारींचा सत्कार

अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या या सभेमध्ये लोकसभा व विधानसभेचे नवनियुक्त प्रभारी अरविंदजी कोलते, ॲड. दिलीप सरनाईक, डॉ. झिशान हुसेन, धनंजय देशमुख, अनंतराव वानखडे, डॉ. सुधीर ढोणे, जावेद हिदायत पटेल, ॲड. दिलीप एडतकर यांचा सत्कार करण्यात आला.

पाणीटंचाई परिस्थितीचा मागविला अहवाल

संपूर्ण जिल्ह्यात सध्या भीषण दुष्काळाची परिस्थिती असून पाणीटंचाईची परिस्थिती गंभीर आहे. तेव्हा जिल्हाभरातील काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आपापल्या परिसरातील पाणीटंचाई परिस्थिती व निवारण उपाययोजना संबंधीचा अहवाल आपल्याकडे सादर करावा. जेणेकरून सर्व अहवालांचा एकत्रितपणे विचार करून आ. साजिद खान पठाण यांच्या माध्यमातून पाणीटंचाई निवारणासाठी प्रयत्न करता येतील, असे प्रकाश तायडे यांनी यावेळी स्पष्ट केले.

बंद घरात जुगाराचा अड्डा; पोलिसांचा मध्यरात्री छापा!

■ प्रतिनिधी | अकोट ■

बंद घराच्या आडोशाने सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर सहायक पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांनी मध्यरात्री धडक कारवाई केली. अकोट उपविभागातील दहीहांडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोहोट्टा बाजार येथील करतवाडी शेतशिवारात करण्यात आलेल्या या छाप्यात तब्बल २१ जणांना जुगार खेळताना रंगेहात पकडण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळावरून रोख रकमेसह १७ मोबाईल, सहा दुचाकी आणि एका चारचाकी वाहनासह एकूण ८ लाख ६७ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

१३ नोव्हेंबरच्या मध्यरात्री मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सहायक पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांनी पथकासह चोहोट्टा बाजार येथील गोपाल सपकाळ यांच्या बंद घरावर पंचांसमक्ष छापा टाकला.

चोहोट्टा बाजार येथे २१ जुगारी जाळ्यात; ८.६७ लाखांचा मुद्देमाल जप्त



यावेळी घरातील दोन स्वतंत्र खोल्यांमध्ये २१ जण बावन्न पत्त्यांवर पैशांची हारजीत लावून जुगार खेळत असल्याचे आढळले. पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेत घटनास्थळावरील जुगाराचे साहित्य आणि मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत ४८ हजार ६०० रुपये रोख, अंदाजे ८१ हजार ९०० रुपये किमतीचे १७ अँड्रॉइड मोबाईल, ४ लाख ३५ हजार रुपये किमतीच्या सहा दुचाकी आणि ३ लाख रुपये किमतीची एक चारचाकी गाडी जप्त करण्यात आली. याशिवाय बावन्न पत्त्यांचे दोन जोड, स्टीलचे डबे, फोमच्या गाद्या, प्लास्टिक खुर्च्या आणि पाण्याचा जार असा साहित्यसाठाही पोलिसांनी ताब्यात घेतला. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ८ लाख ६७ हजार १०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी दहीहांडा पोलीस ठाण्यात २१ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम ४, ५ आणि ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक आणि प्रभारी अपर पोलीस अधीक्षक डॉ. निलेश पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक शामकुमार बुंदेले, पोलीस हवालदार गिरीधर चव्हाण, गोपाल निमकर्डे तसेच पोलीस अंमलदार गोविंद अवारे, रेहमत पठाण, फिरोज खान, राहुल ठाकूर, सचिन पटरे, राजेश राठोड, अजय तायडे, अक्षय तेलगोटे, भूषण मोरे आणि अक्षय दौड यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

एकाच क्रमांकाच्या दोन मोटारसायकली एलसीबीच्या ताब्यात!

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील पोस्ट ऑफिस परिसरातून चोरीस गेलेल्या मोटारसायकलचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावला आहे. विशेष म्हणजे, चोरीच्या मोटारसायकलीच्या क्रमांकासारखाच क्रमांक असलेली दुसरी मोटारसायकलही पोलिसांनी मूर्तिजापूर येथून हस्तगत केली आहे. या कारवाईत एका संशयित आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, दोन मोटारसायकली पोलिसांच्या हाती लागल्याने या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे.

प्राप्त माहितीनुसार, अकोल्यातील सुधीर कॉलनी येथील संजय देविदास ठोंबरे (वय ५६) यांनी १३ नोव्हेंबर रोजी आपली काळ्या रंगाची, हिरव्या पट्ट्यांची स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. एमएच ३० झेड ३४९२) पोस्ट ऑफिस परिसरात उभी केली होती. शासकीय कामानिमित्त ते अकोट येथे गेले होते. सायंकाळी परतल्यानंतर त्यांना मोटारसायकल जागेवर दिसून आली नाही. याप्रकरणी सिटी कोतवाली पोलिसांत गुन्हा क्रमांक ३८६/२०२६, कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहितेनुसार चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू होता. दरम्यान, गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे चोरीची मोटारसायकल अशोक वाटिका चौक परिसरात असल्याचे समजले. त्यानुसार एलसीबीच्या पथकाने तातडीने कारवाई करीत तेथून मंगेश कसनदास राठोड (वय २७, रा. जनुना, पोस्ट पिंजर, ता. बार्शीटाकळी, जि. अकोला) याला ताब्यात घेतले.

त्याच्याकडील मोटारसायकलच्या कंपनीचे नाव, रंग, इंजिन क्रमांक आणि चेसिस क्रमांकाची पडताळणी केली असता ती ठोंबरे यांची चोरीस गेलेली मोटारसायकल असल्याचे स्पष्ट झाले. पुढील तपासादरम्यान याच क्रमांकाची आणखी एक मोटारसायकल मूर्तिजापूर येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार ती मोटारसायकलही ताब्यात घेण्यात आली. त्यामुळे एकाच नोंदणी क्रमांकाच्या दोन मोटारसायकली आढळून आल्याने या प्रकरणातील तपासाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

ताब्यात घेतलेला संशयित आरोपी आणि हस्तगत केलेल्या मोटारसायकली पुढील कायदेशीर कारवाईसाठी सिटी कोतवाली पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आल्या आहेत. दुसऱ्या मोटारसायकलीचा या प्रकरणाशी नेमका काय संबंध आहे, याचा तपास आता पोलिसांकडून केला जाणार आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक डॉ. निलेश पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, एपीआय गोपाल जाधव, पोलीस हेडकॉन्स्टेबल रवींद्र खंडारे, किशोर सोनोने, महिंद्रा मलिये, वसीमउद्दीन, मंगेश इंगळे, स्वप्नील खेडकर, अन्सार आणि मनीष ठाकरे यांच्या पथकाने केली.

पोस्ट ऑफिस परिसरातील चोरीचा छडा; संशयित आरोपी ताब्यात, मूर्तिजापूरमधूनही दुचाकी हस्तगत



केशवनगरातील रस्त्याच्या डांबरीकरणाचे भूमिपूजन

अकोला शहराच्या विकासासाठी शिवसेना कटिबद्ध : ललित वानखडे



अकोला : शहराच्या सर्वांगीण विकासासह नागरिकांना मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शिवसेना सातत्याने प्रयत्नशील आहे. शहरातील प्रलंबित विकासकामांना गती देण्यावर भर दिला जात असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे जिल्हा विशेष प्रभारी ललितभाऊ वानखडे यांनी केले.

महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २० मधील केशवनगर चौक, डी-मार्ट रोड परिसरातील रुद्रराज फिटनेस सेंटर ते कृष्णा सोनाने यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याच्या डांबरीकरण कामाचा भूमिपूजन सोहळा शुक्रवारी (१३ नोव्हेंबर) पार पडला. यावेळी ते बोलत होते.

शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख तथा प्रभाग क्रमांक १२ च्या नगरसेविका उषाताई विर्क यांच्या निधीतून आणि माजी महापौर सुमनताई गावंडे यांच्या विशेष प्रयत्नांतून या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाला मंजुरी मिळाली आहे. ललितभाऊ वानखडे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी, जिल्हाप्रमुख मंगेश काळे, प्रभाग क्रमांक २० च्या नगरसेविका सुरेखा मंगेश काळे, महिला आघाडी महानगरप्रमुख वर्षा राऊत, सिंधू पवार यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झाल्यानंतर केशवनगर आणि परिसरातील नागरिकांची गैरसोय दूर होऊन वाहतुकीचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

त्यामुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाची माहिती शिवसेनेचे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अनिल मालगे यांनी दिली.

सिंधी समाजाच्या पारंपरिक संस्कृती संवर्धनासाठी विश्व सिंधी सेवा संगम कटिबद्ध

■ प्रतिनिधी | अकोला ■

सिंधी समाजाच्या पारंपरिक संस्कृती विकास व संवर्धनासाठी सेवारत असणाऱ्या विश्व सिंधी सेवा संगमच्या वतीने सातत्याने अनेक उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्यात सिंधी समाजाची संस्कृती व पारंपरिक खाद्यपदार्थांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने दर महिन्याला आयोजित केल्या जाणाऱ्या विशेष सिंधी खाद्यपदार्थ उत्सवाच्या शृंखलेत या नोव्हेंबर महिन्यात कढी भात दिन उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी सिंधी समाजातील हरीश हे नाव असणाऱ्या ६३ समाज बांधवांना संस्थेच्या वतीने सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती विश्व सिंधी सेवा संगमचे अकोला अध्यक्ष हरीश माखीजा यांनी गुरुवारी बाबा हरदासराम भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पूज्य सिंधी जनरल पंचायतचे अध्यक्ष कन्हैयालाल रंगवानी, भारुमल मुलानी, विश्व सिंधी सेवा संगम मुंबई स्टेट झोन २ चे अध्यक्ष हरीश पारवाणी, महाराष्ट्र उपाध्यक्ष अशोक बोधानी, सल्लागार भगतराम देवानी, सुरेशभाई संतानी, चंद्रलाल गुरबाणी, अशोकभाई मनवाणी उपस्थित होते. दि १५ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजता संत गोदडीवाला धाम, बाबा हरदासराम नगर, कच्ची खोली, अकोला येथे प्रथम मान्यवरांच्या उपस्थितीत समाजातील हरीश नाव असणाऱ्या ६३ समाज बांधवांना सन्मानित करण्यात येणार आहे. त्या नंतर रात्री ९ वाजता याच ठिकाणी हा सिंधी कढी-भात दिन सोहळा आयोजित करण्यात आला असल्याचे सांगण्यात आले. याबाबत माहिती देताना सांगण्यात आले की, या उपक्रमांचा मुख्य उद्देश सिंधी संस्कृती व परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे समाजात प्रेम, बंधुभाव आणि एकता वाढवणे हा आहे.

टिळक राष्ट्रीय शाळेत 'वृक्ष पूजनातून' हरित वसुंधरेचा संदेश

माजी विद्यार्थी संघाचा आगळावेगळा उपक्रम



■ प्रतिनिधी | अकोला ■

निसर्ग संवर्धनाचा संदेश देण्यासाठी टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर, मोठी उमरी येथील माजी विद्यार्थी संघाकडून दीपावलीच्या दिवशी शाळेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात 'वृक्ष पूजन' सोहळा पार पडला. यावेळी परिसरातील वृक्षांना जल अर्पण व पूजन करून पर्यावरणाचा समतोल राखण्याचा आणि हरित वसुंधरेचा संदेश देण्यात आला आहे.

दिवाळीच्या पवित्र व मांगल्याच्या पर्वावर निसर्गाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर, मोठी उमरी, येथील माजी विद्यार्थी संघाच्या वतीने दीपावलीच्या दिवशी अत्यंत उत्साहात 'वृक्ष पूजन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय संस्कृतीत निसर्ग, झाडे आणि पर्यावरण संवर्धनाला अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले आहे. याच विचारातून प्रेरित होऊन या कार्यक्रमात शाळेच्या प्रांगणातील विविध वृक्षांचे पूजन करण्यात आले. यावेळी वृक्षांना जल अर्पण करून पर्यावरणाचा समतोल राखण्याचा आणि हरित वसुंधरेचा संदेश देण्यात आला. या वृक्ष पूजन सोहळ्याला माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष दिगंबर वनारे यांचे नेतृत्वात माजी विद्यार्थी संघाचे संजय पळसपगार, उमेश मसने, प्रकाश मालगण, अंबादास निकाळजे, गजानन पोटे, अरुण धनबर, शैलेश ओळंबे, माधव चावरे, सुनिल मातुलकर, विलास केनेकर, अमोल राहुडकर, हरिदास मेहंगे, पंकज निखाडे, नितीन वर्गे, सुरेंद्र गिऱ्हे, रवींद्र वानखेडे, आदींसह आजी-माजी शिक्षकवृंद, माजी विद्यार्थी संघाचे पदाधिकारी तसेच शाळेशी संबंधित मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. दीपावलीच्या सणाचे औचित्य साधून राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमामुळे निसर्गप्रेमींमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयी विशेष जनजागृती होऊन सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

संस्कृती आणि पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संगम

दीपावली हा प्रकाशोत्सव साजरा करतानाच निसर्गाप्रती आपली जबाबदारी ओळखणे गरजेचे आहे. टिळक राष्ट्रीय शाळेतील माजी विद्यार्थी संघाने वृक्ष पूजनाचा उपक्रम राबवून संस्कृती आणि निसर्ग संवर्धनाचा एक उत्तम आदर्श समाजासमोर ठेवला आहे. सणाच्या आनंदात पर्यावरणाचे रक्षण करण्याचा हा संदेश खरोखरच कौतुकास्पद ठरत आहे.

क्रांतिवीर लहुजी साळवे जयंतीनिमित्त अभिवादन

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारतीय स्वातंत्र्य लढ्याकरिता सशस्त्र सेना घडवणारे नेतृत्व म्हणून लहुजी राघोजी साळवे यांचे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात लहुजी वस्ताद यांचे मोठे योगदान आहे असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे उपनेते मा. आमदार गोपीकिशन बाजोरिया यांनी आद्य क्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे यांच्या २३२ व्या जयंतीनिमित्त केले शिवसेना अनुसूचितजाती मोर्चा जिल्हाप्रमुख डॉ. रामकृष्ण डोंगरे यांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय बाजोरिया चेंबर्स गांधी रोड येथे आद्य क्रांतिवीर लहुजी साळवे यांना जयंती दिनी विनम्र अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी शिवसेना अनुसूचितजाती मोर्चाचे जिल्हाप्रमुख डॉ. रामकृष्ण डोंगरे म्हणाले की आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचे कार्य भारतीय स्वातंत्र्यलढा आणि सामाजिक समतेच्या चळवळीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

बिरसा मुंडा गौरव दिन सप्ताहानिमित्त अकोटमध्ये विविध उपक्रम



■ प्रतिनिधी | अकोट ■

आज रेल्वेस्थानक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत भव्य शोभायात्रा

भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त राज्य शासनाच्या वतीने ११ ते १८ नोव्हेंबरदरम्यान 'भगवान बिरसा मुंडा गौरव दिन सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहानिमित्त अकोट विधानसभा मतदारसंघात क्रांतीसूर्य बिरसा मुंडा जयंती उत्सव समितीच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून आज, १५ नोव्हेंबर रोजी अकोट शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

जनजातीय गौरव दिनाच्या निमित्ताने अनुसूचित जमातींचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकास साधण्यासह भगवान बिरसा मुंडा यांचे विचार व कार्य समाजापर्यंत पोहोचविण्याचा या सप्ताहाचा उद्देश आहे. समितीचे अध्यक्ष उमेश पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. १५ नोव्हेंबर रोजी रेल्वे स्थानकापासून शोभायात्रेला प्रारंभ होणार असून, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे अग्रसेन भवन, कबुतरी मैदान येथे तिचा समारोप होईल. आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या हस्ते शोभायात्रेचे उद्घाटन करण्यात येणार आहे. खा. अनुप धोत्रे, आ. रणधीर सावरकर आणि आ. केवतराम काळे यांच्या अध्यक्षतेखाली संत-महंतांचा सन्मान सोहळाही पार पडणार आहे. याशिवाय महिला बचत गटांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला देवा भारसाकळे, अजय कासदे, स्नेहलकुमार डाखोरे, संजय भिलवेकर, रामकिशोर चव्हाण, राजेंद्र बिगर, छोटू गेहलोत, विनोद कोपरखेडे आणि मनीष बामनकर उपस्थित होते.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३३१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

सोलर प्रकल्प उभारला, पण सुरक्षेचे काय, अग्निशमन यंत्रांचाही पत्ता नाही

शेतकऱ्यांच्या पांधन रस्त्यावरच सुरक्षा रक्षकाचे कार्यालय; शेतीचा मार्ग रोखल्याचा आरोप,दुर्घटना घडल्यास जबाबदारी कोणाची

आष्टी शहीद/जनमाध्यम

एकीकडे कोट्यवधींचा सोलर प्रकल्प उभारून वीजनिर्मितीचा गाजावाजा करायचा आणि दुसरीकडे सुरक्षेच्या मूलभूत उपाययोजनांकडे दुर्लक्ष करायचे, असा प्रकार इंदरमारी परिसरातील सोलर कंपनीत सुरू असल्याचा आरोप होत आहे. कंपनी परिसरात अग्निशमन यंत्रे शोधूनही दिसत नसल्याचा दावा करण्यात येत असून, एखादी आग किंवा गंभीर दुर्घटना घडल्यास जीवितहानी टाळण्यासाठी कोणती व्यवस्था आहे, असा संतप्त सवाल परिसरातील नागरिक उपस्थित करीत आहेत.

त्यातच शेतकऱ्यांच्या पांधन रस्त्यावरच सुरक्षा रक्षकाचे कार्यालय उभारल्याने शेतकऱ्यांच्या शेतीत जाण्याच्या मार्गावर अडथळे निर्माण झाल्याचा आरोप आहे.

शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी असलेल्या पांधन रस्त्यावर कंपनीने सुरक्षा रक्षकाचे



कार्यालय उभारल्याचे सांगण्यात येते. परिणामी शेतकऱ्यांसह अन्य नागरिकांनाही या मार्गाने ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार आहे.कंपनीची सुरक्षा व्यवस्था राखण्याच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या पारंपरिक वहिवाटीच्या मार्गावरच अडथळा निर्माण होत असेल,तर त्यांच्या शेतीच्या कामांचे काय? शेतात जाण्यासाठीही कंपनीच्या सुरक्षेची परवानगी घ्यावी लागणार काय,असा प्रश्न उपस्थित होत आहे.

इंदरमारी परिसर जंगलालगत असल्याने येथे दिवस-रात्र वन्यप्राण्यांचा वावर असतो.अशा संवेदनशील भागात मोठ्या प्रमाणावर सोलर प्रकल्प उभारण्यात आला आहे. कंपनीतील कर्मचाऱ्यांनी चर्चेदरम्यान या प्रकल्पातून प्रतितास एक हजार मेगावॅट वीज निर्मिती होत असल्याची माहिती दिली. मात्र,एवढ्या मोठ्या प्रकल्पात अग्निशमन यंत्रे, आग नियंत्रणाची साधने आणि आपत्कालीन बचाव व्यवस्था नेमकी किती सक्षम आहे, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

या सोलर प्रकल्पाच्या परिसरात काही शेतकऱ्यांची शेती आहे. कामडी नामक शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची व्यथा त्यांच्या मुलाने मांडली. सध्या शेतात कपाशीचे पीक उभे असून पिकांना पाणी देण्यासाठी विहिरीचा आधार घ्यावा लागतो. मात्र, विहीर कोरडी पडल्याने पिकांसमोर पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

विहिरीत खोदकाम किंवा ब्लास्टिंग करायचे असल्यास कंपनीची परवानगी घ्यावी लागत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

प्रशासनाचा बडगा कधी उगारणार

सोलर प्रकल्पाच्या उभारणीला विरोध नसला, तरी विकासाच्या नावाखाली स्थानिक शेतकऱ्यांचे रस्ते आणि हक्क बाधित होता कामा नयेत. अग्निसुरक्षा व्यवस्थेची तपासणी, आपत्कालीन यंत्रणांची उपलब्धता, पांधन रस्त्याची स्थिती आणि शेतकऱ्यांच्या ये-जा करण्याच्या अधिकाराची महसूल विभागाने संयुक्त पाहणी करावी, अशी मागणी पुढे येत आहे.अग्निशमन विभागानेही प्रकल्पातील सुरक्षा साधनांची प्रत्यक्ष तपासणी करणे गरजेचे आहे.

सोलर प्रकल्पातून वीज निर्मिती महत्त्वाची असली, तरी मानवी सुरक्षितता आणि शेतकऱ्यांचे हक्क त्याहून कमी महत्त्वाचे नाहीत. कंपनीच्या सुरक्षेच्या भिंतीआड शेतकऱ्यांचा रस्ता हरवणार असेल आणि आपत्कालीन व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह असेल, तर अशा कारभाराची जबाबदारी कोण घेणार आता महसूल प्रशासन आणि अग्निशमन विभाग या प्रकरणात प्रत्यक्ष हस्तक्षेप करून वस्तुस्थिती स्पष्ट करणार का, हा खरा प्रश्न आहे.

दिवाळीच्या अंगणात अवतरला शिवशौर्याचा जागतिक वारसा

वर्धा/जनमाध्यम

दिवाळीचा उत्साह, मातीचा सुगंध आणि शिवरायांच्या गडकिल्ल्यांचा अभिमान महाराष्ट्रातील किल्ले निर्मितीची परंपरा जपत डॉ. विजय बाबर यांच्या घरच्या अंगणात यंदा जागतिक वारसा यादीत स्थान मिळविलेल्या जिंजी किल्ल्याची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली आहे. किल्लेनिर्मितीचे हे त्यांचे १७ वे वर्ष असून, बालगोपालांनी आपल्या कल्पकतेतून इतिहासाला जिवंत केले आहे.

तामिळनाडूतील विल्लुपुरम जिल्ह्यातील जिंजी हा तीन डोंगरांवर विस्तारलेला भव्य दुर्गसमूह आहे. राजगिरी, कृष्णगिरी आणि चंद्रयानदुर्ग या तीन दुर्गांचा त्यात समावेश आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी १६७७ मध्ये हा किल्ला जिंकला होता. पुढे राजाराम महाराजांच्या काळात सुमारे आठ ते नऊ वर्षे जिंजी मराठा साम्राज्याची राजधानी राहिली. या प्रतिकृतीत सात मजली कल्याण महाल,



धान्यकोठारे, मंदिर, पवित्र तलाव, तोफा आणि त्रिस्तरीय तटबंदी यांसह किल्ल्याची वैशिष्ट्ये बारकाईने साकारण्यात आली आहेत.ग्रीष्मा बाबर, ओम मोरे, साक्षी मुंदडा आणि खुश मुंदडा यांनी किल्लानिर्मितीसाठी विशेष परिश्रम घेतले. डॉ. विजय बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली रोहिणी बाबर आणि डॉ. कुश बाबर यांनीही सहकार्य केले. केवळ मातीचा किल्ला नव्हे, तर पुढच्या पिढीच्या मनात शिवइतिहासाची बीजे रोवणारा हा उपक्रम ठरत आहे. बालगोपालांनी साकारलेला जिंजी किल्ला परिसरातील नागरिकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनला असून, त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

डेंग्यूने हिरावला चिमुकलीचा जीव

गावात विशेष आरोग्य पथक पाठवा - अतुल वांदिले



हिंगणघाट/जनमाध्यम

एका निरागस चिमुकलीचे बालपण डेंग्यूने हिरावून घेतले आणि संपूर्ण गावावर दुःखाचा डोंगर कोसळला. हिंगणघाट तालुक्यातील अवघ्या ३०० लोकसंख्येच्या कुटकी गावात डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढला असून, आतापर्यंत १५ नागरिकांना डेंग्यूची लागण झाल्याची माहिती समोर आली आहे. यात ११ वर्षीय कुमुद चंद्रशेखर शेंडे या बालिकेचा मृत्यू झाल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे. एका चिमुकलीचा जीव गेल्यानंतर तरी प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त प्रश्न उपस्थित केला जात आहे.

कुटकी गावातील आरोग्य व्यवस्थेचा प्रश्न या घटनेमुळे ऐरणीवर आला आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावाला नदीतून थेट पाणीपुरवठा केला जातो. पाणी शुद्धीकरणासाठी फिल्टर यंत्रणेची व्यवस्था नसल्याने नागरिकांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त होत आहे.गावातील गंभीर परिस्थितीची माहिती मिळताच नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्याकडे मदतीची मागणी केली.

त्यानंतर वांदिले यांनी कुटकी गावाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. डेंग्यूमुळे मृत्यू झालेल्या कुमुद शेंडे हिच्या घरी जाऊन त्यांनी शोकाकुल कुटुंबीयांचे सांत्वन केले. या दुःखद प्रसंगी कुटुंबीयांना धीर देत प्रशासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विनोद वानखेडे, तालुकाध्यक्ष मिलिंद कोपुलवार, ग्राहक सेलचे जिल्हाध्यक्ष विजय शर्मा, अनिल बुलानी, जितेंद्र कुकसे, श्रीकांत भगत आदी उपस्थित होते.

कुटकीतील परिस्थिती गंभीर असून, मृत बालिकेच्या कुटुंबीयांना शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी. गावात आरोग्य विभागाचे विशेष वैद्यकीय पथक पाठवून प्रत्येक नागरिकाची आरोग्य तपासणी करावी. डेंग्यू प्रतिबंधासाठी औषध फवारणी, स्वच्छता मोहीम आणि आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबवाव्यात. तसेच नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी अतुल वांदिले यांनी केली.

माहिती आयोगाचा आदेशही धाब्यावर, अधिकाऱ्यांची मनमानी सुरूच

उमेश अग्निहोत्री यांचा कारवाईसाठी एल्गार; मंजुषा पौनिकर यांच्यावर कारवाईची मागणी

वर्धा/जनमाध्यम

सामान्य नागरिकांच्या हातात प्रशासनाला जाब विचारण्याचे प्रभावी शस्त्र म्हणून माहिती अधिकार कायद्याची ओळख आहे. मात्र, याच कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असलेले अधिकारीच कायद्याला केराची टोपली दाखवत असतील, तर पारदर्शक प्रशासनाच्या दाव्यांचे करायचे काय? वर्ध्यातील सरकारी कामगार अधिकारी कार्यालयातील कथित प्रकाराने हाच गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाने स्पष्ट आदेश देऊनही मागितलेली माहिती नाकारण्यात आल्याचा आरोप करीत स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश रा. अग्निहोत्री यांनी जन माहिती अधिकारी मंजुषा पौनिकर यांच्याविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली आहे.

अग्निहोत्री यांनी ४ ऑक्टोबर २०२४ रोजी सरकारी कामगार अधिकारी कार्यालयाकडे तीन स्वतंत्र माहिती अधिकार अर्ज दाखल केले होते. मात्र, निर्धारित प्रक्रियेनंतरही माहिती उपलब्ध न झाल्याने त्यांनी प्रथम अपील केले. तेथेही समाधान न झाल्याने महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठात ६६४/२०२५, ६६५/२०२५ आणि ६६६/२०२५ क्रमांकाची तीन द्वितीय अपिले दाखल केली. अखेर ६ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोगाने सुनावणी घेत उपलब्ध अभिलेखित माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

आयोगाचा आदेश की केवळ कागदाचा तुकडा

माहिती आयोगाच्या आदेशानंतर तरी माहिती मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, ६ नोव्हेंबर २०२६ रोजी जन माहिती अधिकारी मंजुषा पौनिकर यांनी पत्र क्रमांक ७१७ अन्वये दोन स्वतंत्र पत्रे देत माहिती नाकारल्याचे अग्निहोत्री यांचे म्हणणे आहे. एका पत्रात शैक्षणिक ऑनलाइन पोर्टलवर कामगार नोंदणी होत असल्याने कार्यालयात माहिती उपलब्ध नसल्याचे कारण देण्यात आले, तर दुसऱ्या पत्रात मागितलेली माहिती प्रशासकीय स्वरूपाची असल्याचे सांगत ती देण्यास नकार देण्यात आला.

मात्र,आयोगाने उपलब्ध अभिलेखित माहिती देण्याचे निर्देश दिले असताना अशा कारणांनी माहिती नाकारता येते काय, असा सवाल उपस्थित होत आहे. माहिती आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याऐवजी नव्याने कारणे पुढे केली जात असतील, तर आयोगाच्या अधिकाराला आणि माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीला आव्हान दिल्यासारखेच नाही काय, असा प्रश्न अग्निहोत्री यांनी उपस्थित केला आहे.

माहिती मिळविण्यासाठी नागरिकाने अर्ज करायचा, प्रथम अपील करायचे, द्वितीय अपील करायचे आणि आयोगाचा आदेश मिळाल्यानंतरही पुन्हा माहितीच्या



मागे धावायचे, ही कोणती प्रशासकीय कार्यपद्धती सामान्य नागरिकाला माहिती मिळविण्यासाठी इतकी ससेहोलपट सहन करावी लागत असेल, तर माहिती अधिकार कायद्याच्या अस्तित्वाचा उपयोग काय, असा प्रश्न संघटनेने केला आहे.

विभागीय कारवाईची मागणी

या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधित जन माहिती अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस बजावावी, अशी मागणी अग्निहोत्री यांनी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम २०(१) अंतर्गत कायद्यातील आवश्यक अटी पूर्ण झाल्यास प्रतिदिन २५० रुपये, कमाल २५ हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्याची, तसेच कलम २०(२) अंतर्गत आवश्यक असल्यास विभागीय शिस्तभंग कारवाईची शिफारस करण्याची मागणी करण्यात आली आहे.यासंदर्भात मुख्य माहिती आयुक्त, प्रधान सचिव कामगार विभाग, कामगार आयुक्त महाराष्ट्र राज्य आणि अपर कामगार आयुक्त नागपूर यांच्याकडेही तक्रार पाठविण्याची भूमिका अग्निहोत्री यांनी घेतली आहे.

आता उच्च न्यायालयाचे दार ठोठावणार

माहिती आयोगाच्या आदेशानंतरही माहिती मिळाली नाही, तर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत योग्य न्यायालयीन उपाययोजना करण्याचा इशारा अग्निहोत्री यांनी दिला आहे.

माहिती अधिकार कायदा हा अधिकाऱ्यांच्या मर्जीवर चालत नाही. सरकारी खुर्चीवर बसलेला कोणताही अधिकारी कायद्यापेक्षा मोठा नाही. आयोगाचा आदेश असतानाही नागरिकाला माहिती मिळत नसेल, तर ही लोकशाही आणि पारदर्शक प्रशासनासाठी गंभीर बाब आहे. आम्हाला केवळ कागदी आदेश नकोत, तर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई हवी,' अशी भूमिका उमेश रा. अग्निहोत्री यांनी मांडली.आता माहिती आयोग आपल्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी काय पाऊल उचलतो आणि कामगार विभागाचे वरिष्ठ अधिकारी या कथित प्रकाराची चौकशी करतात का, याकडे वर्धा जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

आज संत सखुबाईंच्या पुण्यतिथी महोत्सवाची भक्तिमय पर्वणी

संदी रेल्वे/जनमाध्यम

संतपरंपरेचा आध्यात्मिक वारसा जपणाऱ्या आदिशक्ती श्री संत सखुबाई यांच्या ५९ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त आज, रविवार (ता.१५) पळसगाव (बाई) येथील श्रीक्षेत्र नारायणधाम येथे भक्ती आणि श्रद्धेची पर्वणी अनुभवायला मिळणार आहे. सप्ताह सोहळ्याची सांगता भव्य शोभायात्रा, गोपाळकाल्याचे कीर्तन, दहीहंडी आणि महाप्रसादाने होणार असून, परिसरातील हजारो भाविकांच्या उपस्थितीची अपेक्षा आहे.

महोत्सवानिमित्त ८ नोव्हेंबरपासून सुरू असलेल्या सप्ताह सोहळ्याने संपूर्ण देवस्थान परिसर भक्तिमय झाला आहे. अखंड ज्योत, वीणावादन, काकडा भजन, आरती, हरिपाठ आणि हरिजागराने आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.आज पहाटे ३ ते ६ वाजेपर्यंत भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत नारायणपूर (जि. वर्धा) येथील ह.भ.प. प्रमोद महाराज पाणबुडे यांचे गोपाळकाल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत शोभायात्रा, दहीहंडी आणि महाप्रसादाचा कार्यक्रम होईल.



श्री संत सखुबाई यांच्या समाधी मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम सुरू असून, या पवित्र कार्यासाठी भाविकांनी सढळ हस्ते आर्थिक मदत करावी, असे आवाहन देवस्थान समितीने केले आहे. संत सखुबाईंच्या पुण्यस्मरणासह वारकरी संप्रदायाच्या परंपरेचा जागर करणाऱ्या या महोत्सवाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन श्री संत सखुबाई देवस्थान पंचकमेटी व गावकरी मंडळी, पळसगाव (बाई) यांनी केले आहे.

पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते विविध विकास कामांचे लोकार्पण

वर्धा/जनमाध्यम

वर्धा नगरपरिषद क्षेत्रात वैशिष्टपूर्ण निधी अंतर्गत ५ कोटी ५० लाख रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या इतवारा बाजार येथील नवीन मटन मार्केट, प्रभाग क्रमांक ४, प्रभाग क्रमांक १२ मधील सिमेंट रस्ता, इसाजी ले-आऊट मधील नमो उद्यानाचे लोकार्पण पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, उपाध्यक्ष प्रदिपसिंह ठाकूर, मुख्याधिकारी विजय देशमुख, बांधकाम सभापती राखी पांडे, नगरसेविका वंदना चामटकर आदी उपस्थित होते. शहरातील जेष्ठ नागरिक, बालके व सर्वसामान्य नागरिकांसाठी एक विरंगुळा केंद्र असावे, यासाठी शासनाने नमो उद्यास योजना सुरु केली आहे. वैशिष्टपूर्ण निधीतून जिल्ह्यात १० नमो उद्याने तयार करण्यात येत आहे. एक कोटी रुपये खर्च करुन तयार करण्यात आलेल्या या उद्यानाची देखभाल देखील महत्वाची आहे. यासाठी



परिसरातील नागरिकांनी गणपती उत्सव समिती प्रमाणे एक समिती तयार करुन उद्यानाची देखभाल करावी, अशी अपेक्षा पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी नमो उद्यानाच्या लोकार्पण प्रसंगी केली. तत्पूर्वी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ व मान्यवरांच्या उपस्थितीत इतवारा येथील नवीन बांधण्यात आलेले मटन मार्केट, प्रभाग क्र.१२ मधील सिमेंट रस्ता, प्रभाग क्रमांक ४ मधील रस्ता बांधकामाचे लोकार्पण तसेच मस्जीद चौक येथील रस्ता बांधकामाचे भूमीपूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याधिकारी विजय देशमुख यांनी केले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विनोबा हे साहित्यिकांचे महासाहित्यिक होते-डॉ.अभय बंग

आचार्य विनोबा भावे जीवनकार्य साहित्य संमेलन उत्साहात

वर्धा/जनमाध्यम

'सत्याला जेव्हा शब्दांची जोड मिळते,तेव्हा साहित्य निर्माण होते. विनोबा भावे यांच्या लेखनात सत्य, विचारांची प्रगल्भता आणि जीवनानुभव यांचा सुंदर संगम दिसून येतो. त्यामुळे विनोबा हे केवळ साहित्यिक नव्हते, तर साहित्यिकांचे महासाहित्यिक होते,' असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग यांनी केले.

ते साहित्य परिषद, समर्थ युवा फाउंडेशन,मराठी भाषा विभाग, विदर्भ साहित्य संघ शाखा वर्धा, लोक शिक्षण प्रसारक मंडळ तसेच अन्य सहसंयोजक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आचार्य विनोबा भावे यांच्या जीवनकार्यावर आधारित 'शंभराव्या नांदी साहित्य संमेलनाचे' आयोजन वर्धा येथे करण्यात आले. या प्रसंगी ते संमेलनाचे उद्घाटक म्हणून बोलत होते. पुढे विनोबा भावे यांच्या साहित्यिक आणि वैचारिक योगदानाचा आढावा घेताना डॉ. बंग यांनी त्यांच्या लेखनातील सत्यनिष्ठा, चिंतनशीलता आणि मानवतावादी दृष्टिकोन अधोरेखित केला.

प्रसंगी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी लोकशिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. गजानन कोटेवार, विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष व संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रदीप दाते, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह डॉ. नितीन संगमनेरकर, विदर्भ साहित्य संघाच्या वर्धा शाखेचे शाखाध्यक्ष डॉ. राजेंद्र मुंढे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी 'भूदान चळवळ आणि महाराष्ट्र' या विषयावर ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. गणेश राऊत यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.



भूदान चळवळीचा सामाजिक, ऐतिहासिक आणि वैचारिक प्रवास त्यांनी आपल्या व्याख्यानातून उलगडून दाखविला.यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रदीप दाते यांनी आपले मनोगत व्यक्त करत संमेलनाच्या आयोजनामागील भूमिका, उद्देश आणि साहित्यिक विचारांच्या देवाणघेवाणीचे महत्त्व अधोरेखित केले.

वर्धा शाखाध्यक्ष प्रा.डॉ राजेंद्र मुंडे यांनी संमेलनाच्या आयोजनामागील वर्धा शाखेची भूमिका स्पष्ट केली.अध्यक्षीय भाषणात डॉ गजानन कोठेवार यांनी विनोबा भावे यांच्या जीवनावरील संदर्भ देत या संमेलनाची फलश्रुती विषद केली. दुपारच्या सत्रात अकोला येथील हृदया इंदाने यांनी 'मी सावित्री बोलतेय!' या एकपात्री प्रयोगातून सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा प्रभावी आविष्कार सादर केला. त्यानंतर झालेल्या कथाकथन सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कथाकार डॉ. सतीश तराळ होते. यामध्ये अ. भा. ठाकूर (आर्णी, जि. यवतमाळ) आणि प्रा. मीनल रोहनकर (वर्धा) यांनी आपल्या कथा सादर केल्या.संमेलनाच्या समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. गजानन कोटेवार होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. नितीन संगमनेरकर, डॉ. विलासराव देशमुख उपस्थित होते. प्रसंगी डॉ. विलास देशमुख यांनी महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांची आजच्या सामाजिक आणि साहित्यिक परिस्थितीतील प्रासंगिकता विशद केली.

महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या विचारांचा जागर, साहित्यिक चिंतन आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यांचा संगम घडवत संमेलनाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे विविध सत्रांमध्ये संचालन रंजना दाते, प्रा. उल्लास लोहकरे,कविता दाते, शीला वानखेडे यांनी केले. आभार प्रशांत पनवेलकर, वंदना पळसापुरे व प्रा. प्रफुल्ल दाते यांनी केले.संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी विदर्भ साहित्य संघ, शाखा वर्धाचे शाखाध्यक्ष डॉ.राजेंद्र मुंढे,शाखोपाध्यक्ष निळकंठ मेहरे, सचिव रंजना दाते, कोषाध्यक्ष प्रा.उल्लास लोहकरे, प्रा.डॉ राजेश देशपांडे सहसचिव संगीता चवरे, प्रसिद्धी प्रमुख प्रा. प्रफुल्ल दाते, समन्वयक महेश मोकलकर, आकाश दाते,प्राचार्य डॉ. महेंद्र सहारे प्रा. मोहन सोनूरकर व शिक्षकवृंद तसेच सर्व कार्यकारी सदस्यांनी परिश्रम घेतले.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३४७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

रविवार, १५ नोव्हेंबर २०२६
E-paper - www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अखेर परतवाडा शहरातील दुराणी चौकातील सुलभ शौचालय झाले सुरू

महिलांच्या समस्येचे निराकरण





अचलपूर/प्रतिनिधीः- अचलपूर नगरपरिषद क्षेत्रातील अत्यंत व्यस्त आणि गजबजलेल्या बाजारपेठ परिसरातील दुराणी चौक येथे गेल्या अनेक महिन्यांपासून बंद असलेले सुलभ शौचालय अखेर नागरिकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आले आहे. याबाबत दैनिक जनमाध्यम मध्ये वृत्त प्रकाशित झाले होते.तसेच नगरसेविका अपर्णा जितेंद्र रोडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.अचलपूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष रुपाली माथने,मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांनी सुद्धा या प्रकरणाची दखल घेतली. त्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला असून महिला, व्यापारी, महिला व पुरुष कामगार वर्ग यांनी मोठा दिलासा व्यक्त केला आहे.

दुराणी चौक हा परतवाडा शहरातील मधील अत्यंत महत्वाचा आणि सतत लोकांची वर्दळ असणारा रस्ता आहे. येथे सुलभ शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाले होते. मात्र तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणांमुळे ते अनेक महिन्यांपासून कुलूपबंद अवस्थेत होते. आगामी सण-उत्सव आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत खरेदीसाठी मोठ्या संख्येने महिला आणि नागरिक येतात. शौचालय बंद असल्यामुळे विशेषतः महिलांची प्रचंड गैरसोय होत होती.

या गंभीर समस्येची दखल घेत अचलपूर नगर परिषदेच्या नगरसेविका अपर्णा जितेंद्र रोडे यांनी २३ नोव्हेंबर रोजी मुख्याधिकारी धिरजकुमार गोहाड यांना अधिकृत पत्र दिले.आणि दैनिक जनमाध्यम मध्ये वृत्त सुद्धा प्रकाशित झाले होते .दिवाळीच्या सण उत्सवापूर्वी आणि आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर महिलांची होणारी गैरसोय थांबवावी तसेच सुलभ शौचालय महिला व पुरुषांसाठी तातडीने सुरू करावे, अशी मागणी त्यांनी निवेदनातून केली होती.अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रूपाली माथने आणि मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांनी नगरसेविका अपर्णा रोडे यांच्या या मागणीची तात्काळ दखल घेतली. संबंधित यंत्रणेला निर्देश देत त्यांनी दुराणी चौकातील सुलभ शौचालयाची प्रत्यक्ष सुरुवात करून दिली.

सुलभ शौचालय सुरू झाल्यामुळे बाजारपेठेतील महिलावर्ग, स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून या महत्त्वपूर्ण विषयावर तातडीने पावले उचलल्याबद्दल नगरसेविका अपर्णा जितेंद्र रोडे, नगरसेवक मनोज नंदवंशी आणि नियोजन सभापती दर्शना ठाकूर यांचे विशेष आभार मानले आहेत.

धारणीत भूकंपाचे सौम्य धक्के

-खरगोन केंद्रबिंदू, नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण

धारणी/प्रतिनिधीः- मध्य प्रदेशातील निमाड भागात आज शनिवार १४ नोव्हेंबर रोजी सकाळी अचानक धरतीला हादरा बसला, तेव्हा सर्वत्र खळबळ उडाली. सकाळी सुमारे ९ वाजून १५ मिनिटांनी आलेल्या भूकंपाच्या धक्क्यांनी खरगोन, खंडवा, बुरहानपूर आणि आसपासच्या भागात नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले.

मध्य प्रदेशात आलेल्या भूकंपानंतर महाराष्ट्राच्या सीमावर्ती धारणी भागातही काही लोकांना कंपन जाणवल्याची चर्चा समोर आली आहे. मात्र, धारणीत भूकंपाच्या प्रभावाबाबत प्रशासनाकडून स्वतंत्र अधिकृत पुष्टी उपलब्ध नाही. त्यामुळे यासंदर्भात सविस्तर माहितीची प्रतीक्षा आहे.

भूकंपाच्या घटने नंतर या भागातील नागरिकांमध्ये नैसर्गिक आपत्ती आणि सुरक्षे बाबत चर्चा सुरू झाली आहे. अचानक धरतीत होणारी हालचाल लोकांसाठी चिंतेचा विषय बनली आहे.

राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्र नुसार भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.५ नोंदवली गेली आहे. त्याचा केंद्रबिंदू मध्य प्रदेशातील खरगोन भागात जमिनीपासून सुमारे १० किलोमीटर खोलवर होता. भूकंप विज्ञान केंद्राच्या अधिकृत नोंदीनुसार, भूकंप आज सकाळी ९ वाजून १५ मिनिटे २८ सेकंदांनी नोंदवला गेला.भूकंपाचा केंद्रबिंदू २१.५९° उत्तर अक्षांश आणि ७५.५५२° पूर्व रेखांशावर नोंदवला गेला. खरगोन शहरापासून सुमारे २७ किमी आणि धामनोद पासून ६९ किमी अंतरावर हा केंद्रबिंदू जमिनीपासून अवघ्या १० किमी खोलीवर होता. सकाळची वेळ असल्याने अनेक लोक आपापल्या घरात रोजच्या कामात व्यस्त होते. त्याचवेळी अचानक धरतीत कंपन जाणवले. अनेक ठिकाणी घरातील वस्तू आणि खिडक्या हलल्याच्या बातम्या समोर आल्या. धक्के जाणवताच लोकांमध्ये घबराट पसरली आणि अनेक नागरिक सुरक्षित ठिकाणाकडे निघाले.खरगोनच्या शहरी आणि आसपासच्या ग्रामीण भागातही भूकंपाचा परिणाम जाणवला. काही अहवालानुसार, कंपनामुळे शाळांमध्ये खबरदारी म्हणून मुलांना मोकळ्या जागेत पोहोचवण्यात आले.खरगोनचे पोलीस अधीक्षक यांनीही आपल्या निवासस्थानी कंपन जाणवल्याची माहिती दिली. त्यांच्या मते, बंगल्याच्या खिडक्या आणि कपाटांमध्ये हालचाल जाणवली.

अनेक जिल्ह्यांतही जाणवले धक्के-

खरगोन व्यतिरिक्त खंडवा आणि आसपासच्या भागातही भूकंपाचे धक्के जाणवल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. अचानक झालेल्या कंपनामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण होते.महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील भुसावळ, मुक्ताईनगर, चोपडा आणि यावल परिसरातही सौम्य धक्के जाणवले. त्यासोबतच बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातही सकाळी भूकंपाचा सौम्य धक्का जाणवला.

संजय गांधी नगरात तरुणावर प्राणघातक हल्ला

-तीन अल्पवयीन आरोपी ताब्यात

अमरावती/प्रतिनिधीः- फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संजय गांधी नगर परिसरात जुन्या वादातून एका २३ वर्षीय तरुणावर चाकूने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यानंतर घटनास्थळावरून पसार झालेल्या तीन विधि संघर्षग्रस्त बालकांना शहर गुन्हे शाखेच्या पथकाने शोधून ताब्यात घेतले. गोपनीय माहितीच्या आधारे किशोर नगर परिसरातून ही कारवाई करण्यात आली. शुक्रवार १३ नोव्हेंबर रोजी पोलीस नियंत्रण कक्षातून गुन्हे शाखेला माहिती मिळाली की, फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संजय गांधी नगर परिसरात काही मुलांनी एका तरुणावर चाकूने वार करून त्याला जखमी केले.माहिती मिळताच गुन्हे शाखेचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून जखमी तरुण रोहित प्रभाकर गजघाटे (वय २३, रा. संजय गांधी नगर १) याची भेट घेतली. त्याच्या कडून घटनेची माहिती घेतल्यानंतर हल्ल्यात सहभागी असलेल्या तिघांची नावे निष्पन्न करण्यात आली. हल्ल्यानंतर पसार झालेल्या तिघांचा शोध घेण्यासाठी गुन्हे शाखेचे पथक रवाना झाले होते. दरम्यान, गोपनीय बातमीदाराकडून तिन्ही विधिसंघर्षग्रस्त बालके किशोर नगर परिसरात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने किशोर नगर परिसरात शोधमोहीम राबविली. यावेळी तीन संशयित फिरताना आढळून आले. त्यांची खात्री पटल्यानंतर पोलिसांनी घेराव घालून तिघांनाही जागीच ताब्यात घेतले. आरोपीना विश्वासात घेऊन चौकशी केली. यावेळी जुन्या वादातून चाकूने वार केल्याचे त्यांनी सांगितल्याची माहिती गुन्हे शाखेने दिली आहे. त्यानंतर पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी तिन्ही बालकांना फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त यशवंत सोळके, उपायुक्त श्याम घुगे,प्रांजली सोनवणे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर , दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक दशरथ आडे, उपनिरीक्षक गजानन सोनुने, राहुल महाजन, सचिन माकोडे, अंमलदार सुनील लासुरकर, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सचिन बहाळे, विकास गुडधे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, चेतन गुल्हाणे, चालक संदीप खंडारे आणि राहुल दुधे यांनी कारवाई केली.

सातरगाव येथे आद्यक्रांतिगुरू वस्ताद लहुजी साळवे जयंती साजरी

तिवसा/प्रतिनिधीः- तालुक्यातील सातरगाव येथे आद्यक्रांतिगुरू वस्ताद लहुजी साळवे यांची जयंती वॉर्ड क्रमांक १ येथे साजरी कण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष बबलू तायडे (समाज भुषण लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त), प्रमुख पाहुणे किशोर स्वर्गे, राजेंद्र वानखडे अध्यक्ष विदर्भ प्रदेश मातंग विकास संघ यांच्या प्रमुख उपस्थितीत आद्यक्रांतिगुरू वस्ताद लहुजी साळवे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.याप्रसंगी राजेंद्र वानखडे यांनी बोलताना सांगितले की,आद्यक्रांतिगुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा



स्वातंत्र्य चळवळीत मोठा वाटा आहे,त्यांनी हि प्रतिज्ञा केली होती की ,जगेल तर देशासाठी आणि मरेल तर देशासाठी, त्यांच्या या संघर्षमय जीवनातून नवचैतन्य निर्माण होते असेही त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाला सातरगाव येथील सर्व समाज बांधव तसेच सर्व कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

घरासमोरच पेटवून घेतल्याने ४४ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

अमरावती/प्रतिनिधीः- मध्यरात्रीच्या सुमारास दुचाकीने घरासमोर आलेल्या एका व्यक्तीने अचानक स्वतःला पेटवून घेतल्याने सराफ लेआऊट, कलोतीनगर परिसरात खळबळ उडाली. अंगाला आग लागल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी तातडीने धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. गंभीररीत्या भाजलेल्या व्यक्तीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना त्याची प्राणज्योत मालवली. गौरव बळवंत लोखंडे (वय ४४, रा. सराफ लेआऊट, कलोतीनगर, अमरावती) असे मृताचे नाव आहे. १३ नोव्हेंबरच्या पहाटे दोन ते तीन वाजताच्या दरम्यान ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरव दुचाकीने घरासमोर आला होता. त्यानंतर काही क्षणांतच त्याने स्वतःला पेटवून घेतले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे घरातील सदस्यांची एकच धावपळ उडाली. गौरवच्या अंगावर आगीचे लोळ उठल्याचे दिसताच त्याचा भाऊ आणि आई-वडिलांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कुटुंबीयांनी आग विझवून त्याला वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत तो गंभीररीत्या भाजला होता. त्याला तातडीने अमरावतीतील ॲव्हसॉन रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्याच्यावर उपचार सुरू होते. मात्र, त्याच दिवशी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

राहुल वानखडे यांचे निधन

काटपुर/प्रतिनिधीः- राहुल गणेशराव वानखडे (वय ४२) राहणार रत्नदीप कॉलनी - सोनल कॉलनी शेगाव रोड अमरावती यांचे गुरुवार दिनांक १२ नोव्हेंबरला हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुःखद निधन झाले. ते एस आर पी एफ गोंदिया ग्रुप येथे सेवेमध्ये होते. त्यांच्या पश्चात २ मुली १ पत्नी असा परिवार असून त्यांच्या अकस्मात मृत्यूने वानखडे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



काळागोटा येथे पारधी समाजाच्या वसाहतीत मुलासोबत शैक्षणिक दिवाळी

प्रा.चरणदास सोळंके यांच्या पुढकाराने शैक्षणिक साहित्य भेट

तिवसा/प्रतिनिधीः- तालुक्यातील काळागोटा येथील पारधी समाजाच्या गावामध्ये अनेक समस्यांबरोबरच प्रौढ साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.येथील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रा.चरणदास सोळंके यांनी स्वतःच्या आर्थिकतेतून मुलांना शैक्षणिक साहित्य भेट देऊन दिवाळी साजरी केली.



काळाघोटा येथे अनेक समस्या असून सुविधाचा अभाव पाहायला मिळत आहे.येथील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी तसेच रहिवाशांच्या समस्यांबाबत जनजागृती होऊन तोडगा निघावा आणि विद्यार्थ्यांच्या मागे राहिलेल्या अभ्यासाबाबतच्या व आवश्यक संस्काराच्या समस्या दूर व्हाव्यात या उदात्त व दूरदृष्टी विचाराने सेवानिवृत्त प्रा. चरणदास सोळंके यांनी आपल्या संस्थेच्या माध्यमातून कालागोटा या ठिकाणी माजी पोलीस कर्मचारी सुरेश भोसले यांच्या घरी शैक्षणिक संस्कार वर्ग सुरू केलेला आहे.प्राध्यापक सोळंके विद्यार्थ्यांकरिता लेखन साहित्य ,अध्यापनाचे साहित्य, पुरवितात. या दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर प्रा .सोळंके यांनी विद्यार्थ्यांकरिता अभ्यासाचे व शिकवणाऱ्यासाठी अध्यापनाचे साहित्य उपलब्ध करून दिले आहे. त्याचप्रमाणे प्रा.सोळंके यांनी पालकांसह विद्यार्थ्यांसोबत दिवाळीच्या फराळाचा आस्वाद घेतला. आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक दिवाळी साजरी केली.वरील शैक्षणिक संस्कार वर्ग चालविण्याकरिता कांचन भोसले याचे नातेवाईक व वेळेवरील काही सामाजिक कार्यकर्ते सहकार्य करीत आहेत.

लोकशाही मूल्यांची जपणूक हीच नेहरू यांना खरी आदरांजली

काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचे प्रतिपादन

काँग्रेस भवनात नेहरू जयंती

अमरावती/प्रतिनिधीः- देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान देणारे आणि स्वातंत्र्यानंतर आधुनिक भारताच्या उभारणीचा भक्कम पाया घालणारे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे विचार आजही देशासाठी मार्गदर्शक आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोन, धर्मनिरपेक्षता, लोकशाही मूल्ये आणि सामाजिक एकात्मतेच्या माध्यमातून त्यांनी देशाच्या विकासाला नवी दिशा दिली. त्यांनी रुजविलेली लोकशाहीची मूल्ये जपणे आणि पुढील पिढीपर्यंत त्यांचे विचार पोहोचविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू देशमुख यांनी केले.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक काँग्रेस भवन येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खासदार बळवंतराव वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पंडित नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



जागतिक राजकारणात भारताचे स्वतंत्र स्थान निर्माण करताना त्यांनी अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केला. विविधतेने नटलेल्या भारतात लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि बंधुभावाची भावना मजबूत करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. आजच्या पिढीने त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा अभ्यास करून देशाच्या लोकशाही परंपरा अधिक बळकट करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही देशमुख यांनी केले.

या कार्यक्रमाला हरिभाऊ मोहोड, प्रकाशराव काळबांडे, रामेश्वर अभ्यंकर, भैय्यासाहेब मेटकर, डॉ. रवींद्र वाघमारे, समाधान दहातोंडे, विनायकराव ठाकरे, धीरज देशमुख यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मदतीचा हात, मायेचा घास अन् माणुसकीचा जिव्हाळा!

-शेतकऱ्यांसोबत स्नेहभोजनातून आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी जपले आपुलकीचे नाते! -स्वतः शेतकऱ्यांना वाढले जेवण

अमरावती/प्रतिनिधीः- राजकारणापलीकडे जाऊन समाजसेवेचा वसा जपणारे आणि अडचणीच्या काळात सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणारे आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी पुन्हा एकदा आपल्या कृतीतून सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय दिला. दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांसोबत आयोजित दिवाळी मिलन व स्नेहभोजन सोहळ्यात त्यांनी केवळ शेतकऱ्यांना मदत किटचे वाटपच केले नाही, तर स्वतः त्यांच्या पंक्तीत बसून स्नेहभोजन केले आणि आपुलकीने शेतकऱ्यांना आपल्या हाताने जेवण वाढले. त्यांच्या या कृतीने उपस्थित शेतकरी भारावून गेले असून, शहरासह संपूर्ण जिल्ह्यात त्यांच्या समाजोपयोगी उपक्रमांची आणि मनमिळाऊ स्वभावाची चर्चा होत आहे. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आयोजित दिवाळी मिलन समारंभात आमदार प्रवीण पोटे पाटील आणि खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या हस्ते शेतकरी कुटुंबांना भरीव मदत किटचे वितरण करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेण्यासोबतच त्यांच्यासोबत स्नेहभोजन करून त्यांनी आपुलकीचे नाते अधिक दृढ केले.







समाजकार्य करताना प्रसिद्धी किंवा दिखाव्यापेक्षा प्रत्यक्ष मदतीला अधिक महत्त्व दिले पाहिजे, ही भूमिका आमदार पोटे यांनी आपल्या भाषणातून मांडली. राजकारणात येण्यापूर्वीपासूनच समाजसेवेची आवड जोपासत विविध संकटांच्या काळात गरजूंच्या मदतीसाठी आपण सातत्याने प्रयत्न केले असल्याचे त्यांनी सांगितले. 'आम्ही आधी काम करतो, ते यशस्वीपणे पूर्ण करतो; मात्र त्याचा कधीही गाजावाजा करत नाही. कारण आमचा विश्वास बोलण्यापेक्षा कृतीवर आहे. आम्ही केलेले कामच आमची ओळख निर्माण करते आणि योग्य वेळी तेच काम सर्वांसमोर येते' या त्यांच्या खास शैलीतील वक्तव्याने उपस्थितांचे लक्ष वेधले. केवळ आणि केवळ संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, हाच आपल्या कार्याचा उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या समाजसेवेचा प्रवास अनेक वर्षांपासून सुरू आहे. गुजरातमधील भुज येथे झालेल्या विनाशकारी भूकंपाच्या वेळी सलग ४१ दिवस मदतकार्य आणि भोजनाची व्यवस्था करून त्यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपली. नागपूरजवळील मोहाळ येथे आलेल्या महापुराच्या वेळी घराबाहेर पडलेल्या अनेक कुटुंबांना पुन्हा संसार उभा करता यावा, यासाठी तीन ट्रकमधून टीनचे पत्रे पाठवून मदतीचा हात दिला. बिहारमध्ये अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीतही त्यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली.

शेतकरी कुटुंबांच्या दुःखाची जाणीव ठेवून त्यांनी २००५ मध्ये २१०० आणि २००६ मध्ये ३१०० अशा आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील मुला-मुलींसाठी भव्य सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन केले होते. केवळ विवाह सोहळे आयोजित करून न थांबता नवदाम्पत्यांना संसारोपयोगी साहित्य आणि आर्थिक अनुदान देऊन त्यांचा संसारही थाटून दिला. संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांना नव्या आयुष्याची सुरुवात करण्यासाठी दिलेला हा आधार त्यांच्या सामाजिक कार्यातील महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

याप्रसंगी खासदार डॉ अनिल बोंडे,ग्रामीण भाजप अध्यक्ष आमदार प्रताप अडसड, मनपा गटनेते चेतन गावंडे, शहर महिला अध्यक्षा सुधा तिवारी, मेळघाट भाजप अध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, भाजप सरचिटणीस चेतन पवार, शिवराय कुलकर्णी, जयंत डेहनकर, अंजनगाव सुर्जि नगरपरिषद अध्यक्ष अविनाश गायगोले, तसेच गजानन कोल्हे, नितीन गुडदे, दिनेश सूर्यवंशी, तुषार भारतीय, किरण पातूरकर, डॉ. कविटकर, डॉ श्यामसुंदर निकम, सुनील चौथमल, दिलीप निंभोरकर, कपील अंडे, बबनराव आवारे, प्रशांत देशपांडे आणि बादल कुलकर्णी , श्रेयस पोटे, विकी शर्मा, सुरेखा लुंगारे, अभिजीत वानखडे , यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ७२
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

वन्यप्राण्यांच्या हैदोसामुळे शेतकरी त्रस्त; पिकांच्या रक्षणासाठी रात्रीही शेतात मुक्काम



नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर

तालुक्यातील शेतशिवारात रोही, रानडुक्कर, हरीण आदी वन्यप्राण्यांचा उपद्रव वाढल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. रात्रीच्या वेळी वन्यप्राण्यांचे कळप शेतात घुसून उभ्या पिकांची नासधूस करीत असल्याने शेतकऱ्यांना आपल्या पिकांचे रक्षण करण्यासाठी रात्रभर शेतात जागता पहारा द्यावा लागत आहे. दिवसभर शेतात काबाडकष्ट केल्यानंतर रात्रीही शेतातच मुक्काम करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये रोही, रानडुक्कर आणि हरणांचे कळप रात्रीच्या वेळी शेतात घुसून तूर, कपाशी, हरभरा, गहू यासह अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत आहेत. हा प्रकार अनेक वर्षांपासून सुरू असून, वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शेतकऱ्यांकडून वारंवार मागणी केली जात आहे. मात्र, अद्यापही ठोस उपाययोजना झालेली नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

शेतीच्या हंगामासाठी शेतकरी हजारो रुपये उसनवारी करून किंवा कर्ज काढून बियाणे, खते आणि मशागतीवर खर्च करतात. मात्र, ऐन पीक उभे असताना वन्यप्राण्यांचे कळप शेतात घुसून पिके फस्त करीत असल्याने शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरत आहे. वन्यप्राण्यांना रोखण्यासाठी विविध उपाययोजना करूनही अपेक्षित परिणाम होत नसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.

पिकांचे रक्षण करण्यासाठी शेतकरी रात्रीच्या वेळी शेतात मुक्काम करून जागरण करीत आहेत. मात्र, रात्रीच्या अंधारात विषारी सरपटणारे प्राणी तसेच रानडुक्कर आणि रोही यांसारख्या वन्यप्राण्यांपासून त्यांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी शेतकरी स्वतःचा जीव धोक्यात घालून पिकांचे रक्षण करीत असल्याचे विदारक चित्र ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे.वन्यप्राण्यांकडून झालेल्या नुकसानीची तक्रार वनविभागाकडे केल्यानंतरही शेतकऱ्यांना अनेकदा कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागतात. त्यानंतर मिळणारी नुकसानभरपाई अत्यल्प असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. त्यामुळे नुकसानभरपाईच्या प्रक्रियेत सुलभता आणून योग्य आर्थिक मदत देण्याची मागणी होत आहे.वन्यप्राण्यांचा वाढता उपद्रव रोखण्यासाठी वनविभाग आणि शासनाने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. तसेच शेतांना तारकुंपण करण्यासाठी अनुदान उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शेतकऱ्यांकडून जोर धरत आहे.



दुष्काळाच्या झळांनी वायगाव हळदीवर दुहेरी संकट

उत्पादकतेत ५० टक्क्यांहून अधिक घट होण्याची भीती

वर्धा-सहा टक्क्यांपेक्षा अधिक कुरकुमीनचे प्रमाण, स्वतंत्र भौगोलिक ओळख आणि औषधी गुणधर्मांची वैशिष्ट्ये असलेल्या वायगाव हळदीच्या शेतीवर यंदा दुष्काळाचे सावट गडद झाले आहे. पावसाने दिलेली ओढ, विहिरी आणि बोअरवेलच्या खालावलेल्या पाणीपातळीमुळे पिकाची पाण्याची गरज भागविणे कठीण झाले आहे. परिणामी यंदा हळदीच्या उत्पादकतेत ५० टक्क्यांहून अधिक घट होण्याची भीती उत्पादक शेतकरी रवींद्र वसंतराव वैद्य यांनी व्यक्त केली. आधीच शाश्वत बाजारपेठेचा अभाव, व्यापाऱ्यांकडून होणारी दराची पिळवणूक, पीकविमा संरक्षण नसणे आणि संशोधनाकडे झालेले दुर्लक्ष अशा समस्यांनी ग्रासलेल्या या पिकाला आता दुष्काळाने आणखी संकटात टाकले आहे.

समुद्रपूर तालुक्यातील सुमारे २२२ गावांमध्ये ५५० एकर क्षेत्रावर वायगाव हळदीची लागवड होते. समुद्रपूरपासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या वायगाव येथे या हळदीची पहिल्यांदा लागवड झाल्याचे सांगितले जाते. येथील भौगोलिक वातावरणात या पिकाची चांगली वाढ होत असल्याने पुढे तालुक्यातील इत गावांमध्येही लागवड विस्तारली. भौगोलिक मानांकन मिळाल्यामुळे या हळदीला स्वतंत्र ओळख प्राप्त झाली आहे. मात्र, या ओळखीचे रूपांतर शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीत होऊ शकलेले नाही. वायगाव हळद हे पाण्याची अधिक गरज असलेले पीक आहे. एकरी १०० ते १२० क्विंटल कच्च्या हळदीचे उत्पादन मिळते. त्यापासून वाळलेली हळद सुमारे २० क्विंटल मिळते. पोळ्यानंतर पिकाच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यात तीन ते चार पाण्याच्या पाळ्या देणे आवश्यक असते. यंदा मात्र पावसाने अपेक्षित साथ



दिली नाही. त्यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. पाण्याच्या टंचाईमुळे पिकाची वाढ खुंटत असतानाच यंदा करपा रोगाचा प्रादुर्भावही वाढला आहे. पिकाला आवश्यक ओलावा आणि पोषक वातावरण मिळत नसल्याने पिकाच्या जोमावर परिणाम झाला आहे. एकीकडे सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता नाही, तर दुसरीकडे रोगाच्या प्रादुर्भावामुळे उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता आहे. अपेक्षित उत्पादन मिळणार नसल्याने केलेला लागवड खर्च भरून निघणार की नाही, अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

वैद्य यांच्या मते, वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मामुळे वायगाव हळदीला मोठी बाजारपेठ मिळण्याची क्षमता आहे. मात्र भौगोलिक मानांकन मिळूनही संशोधनाच्या पातळीवर या पिकाची उपेक्षा झाली आहे. या पिकाच्या सुधारित लागवड पद्धती, पाण्याचे काटेकोर नियोजन, रोग व्यवस्थापन आणि उत्पादनवाढीसाठी कृषी विद्यापीठाने स्वतंत्र संशोधन हाती घेण्याची गरज आहे. समुद्रपूर परिसरात प्रादेशिक संशोधन केंद्र उभारल्यास उत्पादकांना स्थानिक परिस्थितीनुसार मार्गदर्शन मिळू शकेल, असे ते सांगतात.

बाजारपेठेचा प्रश्न कायम

वायगाव हळदीची लागवड मोठ्या क्षेत्रावर होत असली, तरी स्थानिक बाजारपेठेत या हळदीची नियमित खरेदी होत नाही. चिमूर परिसरातील काही व्यापारी गावांमध्ये येऊन मनमानी दराने खरेदी करतात. काही व्यापाऱ्यांकडून धनादेशाद्वारे व्यवहार केले जातात. मात्र, असे धनादेश वटत नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूकही होते.

विमा संरक्षणापासून उत्पादक वंचित

हळद पिकाचा पीकविमा योजनेत समावेश झालेला नसल्याने शेतकऱ्यांनाच जोखीम सहन करावी लागत आहे. मसाला पिकांसाठी काही भागांत अनुदानाची तरतूद असताना वायगाव हळद उत्पादकांना त्याचाही लाभ मिळत नाही, असेही शेतकऱ्यांनी सांगितले.

आधार केंद्र म्हणजे समाजसेवेचे पवित्र मंदिर-चारुदत्त चौधरी

आस्था फाउंडेशन व ग्राहक पंचायततर्फे भाऊबीज साजरी



बडनेरा/वार्ताहर

रस्त्यावर निराश्रित म्हणून आढळलेले बंधू भगिनी तसेच मनोरुग्ण यांना आधार केंद्रात आणून त्यांची मायेने सेवासुश्रुषा करणे, त्यांच्या खाण्यापिण्याची, औषधोपचाराची काळजी घेणे आणि शक्य असेल तिथे त्यांना त्यांच्या घरी सोडून येणे हे नक्कीच महान सेवाकार्य आहे. जनतेने वेळोवेळी दिलेल्या योगदानातून हे कार्य अव्याहतपणे सुरु ठेवणारे राजू बसवनाथे व ज्योती राठोड यांचे हे कार्य समाजासाठी प्रेरणादीप ठरले आहे असे उद्गार अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे विदर्भ प्रांत सचिव चारुदत्त चौधरी यांनी काढले. ते बडनेरा येथील आधार केंद्रात भाऊबीजेनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर संचालक राजू बसवनाथे,ज्योती राठोड, मुख्य आयोजक आस्था फाउंडेशन चे अध्यक्ष उमेशजी आगरकर, ग्राहक पंचायतचे जिल्हा सचिव डॉ. चंदनसिंहजी राठोड,योगतज्ञ डॉ. मेघाजी ठाकरे व दुबे सर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजक म्हणून आपले विचार व्यक्त करतांना उमेशजी आगरकर म्हणाले की येथील वृध्दांचे डोळ्याचे ऑपरेशन, गुडघ्याचे ऑपरेशन, त्यांचा अंत्यविधी वगैरे अनेक प्रकारची कामे लोकवर्गणीतून होत असतात.समाजाने शक्य त्या प्रकारे आपले योगदान येथे देत राहावे असे भावनिक आवाहनसुद्धा त्यांनी केले.डॉ. चंदनसिंह राजपूत यांनी उपस्थितांना ग्राहक पंचायतीबद्दल माहिती सांगून सर्वांना भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्यात तर डॉ. मेघा ठाकरे यांनी मागील काही प्रसंगाच्या हृद्य आठवणी सांगून आपले सतत सहकार्य या संस्थेला राहील असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन राजूभाऊ बसवनाथे यांनी केले तर प्रास्ताविक आणि आभार ज्योती राठोड यांनी केले.



मेळघाटातील कुंड परिसरात पक्षी निरीक्षण मोहीम

विविध प्रजातींच्या पक्ष्यांची नोंद; वन कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

चिखलदरा-गुगामल वन्यजीव विभागांतर्गत येणाऱ्या तारुबांदा परिक्षेत्रातील कुंड येथे पक्षी निरीक्षण कार्यक्रम पार पडला. अतुल ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात तारुबांदा परिक्षेत्रातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाला सहायक वनसंरक्षक प्रदीप भारथ, आरएफओ जितेंद्र फाटे, सलामे, शेंदरे, दारसिंबे, धांदे, मावस्कर, मोरे, राणा तसेच वैष्णवी धांदे, निशा मावस्कर, भिलावेकर, जामूनकर, लक्ष्मी धांडे, रोहिणी धांडे, मनीषा भुसुम आदी वनरक्षक उपस्थित होते.

यावेळी निसर्ग व वन्यजीवप्रेमींनी जंगलात प्रत्यक्ष फिरून विविध पक्ष्यांच्या थव्यांचा आणि त्यांच्या हालचालीचा अभ्यास केला. वन्यजीव व पक्षी संवर्धनाबाबत जनजागृतीच्या दृष्टीने उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

पक्षी निरीक्षण मोहिमेदरम्यान रुद्र शेडकॅम, कॉमन किंगफिशर, रेड वॅटल्ड लॅपविंग, इंडियन कॉमॅरिन्ट, क्रेस्टेड ट्रीस्वीफ्ट, ओरिएंटल हानी बझार्ड, व्हाईट वागटेल, शॉर्ट-टोईड स्नेक ईगल, वेस्टर्न यलो वागटेल, लिटल ग्रीब, ग्रेट कॉमोरेन्ट, आशियन ग्रीन बी-ईटर, प्लम-हेडेड पॅराकिट, अलेक्झांड्रिन पॅराकिट, रोज रिंग्ड पॅराकिट, व्हाईट थ्रोटेड किंगफिशर, ग्रेटर कुकल आणि इंडियन पॉन्ड हेरॉनसह विविध प्रजातींच्या पक्ष्यांची नोंद करण्यात आली. तारुबांदा परिक्षेत्रातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी पक्षी निरीक्षणामध्ये असा भरघोस प्रतिसाद नोंदविला.

शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याशी सकारात्मक चर्चा

काही प्रश्नांवर तातडीने कार्यवाहीचे निर्देश

अमरावती/का.प्र.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा, विद्यार्थ्यांचे शिक्षण तसेच शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्या व प्रश्नांबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या प्रतिनिधींनी १३ नोव्हेंबर रोजी वर्धा येथे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी शिक्षकांच्या विविध समस्यांकडे राज्यमंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले.

शिक्षक समिती परिवारातील शंकर मरसकोल्हे आणि अनिल खंगार यांनी राज्यमंत्री महोदयांचे स्वागत केले. या भेटीदरम्यान संचमान्यता,टिईटि, शिक्षकांवर लादण्यात येणारी अशैक्षणिक



कामे व त्यामुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर होणारा विपरीत परिणाम, शिक्षण सेवक पद, पदवीधर वेतनश्रेणी, वस्तीशाळा शिक्षकांचे प्रश्न, शिक्षकांचे मुख्यालय, अर्जित रजा, नफा मनपा शिक्षकांसाठी स्वतंत्र वेतन पथक, स्पर्श प्रणाली तसेच शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम आदी महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. या सर्व प्रश्नांच्या अनुषंगाने राज्यस्तरावर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करून प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्यात येतील, असे आश्वासन राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी दिले.

दरम्यान, वर्धा जिल्ह्यातील प्राथमिक शाळांचे सादील अनुदान तसेच डीसीपीएस ते एनपीएस संदर्भात संचालनालय स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांबाबतही चर्चा करण्यात आली. या विषयांचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्यमंत्री महोदयांनी तातडीने राज्याचे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला आणि संबंधित प्रश्नांवर त्वरित निर्णय घेण्याचे निर्देश दिले.या भेटीप्रसंगी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे, जिल्हाध्यक्ष अजय बोबडे, राज्य कार्यकारिणी सदस्य सुधीर सगणे, विभागीय प्रमुख दादाराव चाफले, वर्धा तालुका शाखाध्यक्ष राजेश महाबुधे, पेन्शन आघाडी प्रमुख श्रीकांत केंडे, समुद्रपूर तालुका शाखेचे सचिव रुपेश लुंगे, महेश कंगाली, शंकर मरसकोल्हे, विवेक बुरघाटे, प्रफुल्ल भोगे, अनिल खंगार आणि जिल्हा सोशल मीडिया प्रमुख पवन बानोकर आदी उपस्थित होते.

संक्षिप्त



महानगरपालिकेत पंडीत जवाहरलाल नेहरु जयंती साजरी

अमरावती-पंडीत जवाहरलाल नेहरु यांची जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेमध्ये झाला. पंडीत जवाहरलाल नेहरु यांची जयंती निमित्य उपमहापौर सचिन भेंडे यांचे शुभहस्ते पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे आयोजित करण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर,सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, नगरसेवक मनिष बजाज, ॲड. प्रशांत देशपांडे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, प्रमोद मोहोड, विनोद गोडबोले, गणेश काकडे,भुषण खडेकार, सतिश ताथोड, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

भरधाव वाहन चालविणाऱ्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

अमरावती-भातकुली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या अज्ञात वाहनचालकाविरुद्ध भातकुली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १३ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४.५० ते ५ वाजताच्या दरम्यान भातकुली परिसरात हा प्रकार घडला. अज्ञात वाहनचालक आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे सार्वजनिक रस्त्यावर चालविताना आढळून आला. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता होती. या प्रकरणी अजय प्रकाशराव ढोके (वय २२ वर्षे, रा. काटेपुरा, भातकुली, जि. अमरावती) यांच्या तक्रारीवरून भातकुली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक संजय माने करीत आहेत.

जनजातीय गौरव सप्ताहानिमित्त आज धारणीत जनहित अभियान

एकाच छताखाली मिळणार शासकीय योजनांचा लाभ!

मेळघाट/वार्ताहर

आदिवासी समाजाचा गौरव, हक्क आणि सर्वांगीण विकास यांना केंद्रस्थानी ठेवून धारणी प्रशासनाच्या वतीने जनजातीय गौरव दिवस व जनजातीय गौरव सप्ताहानिमित्त व्यापक जनहित अभियान राबविण्यात येत आहे. येत्या १५ नोव्हेंबर रोजी धारणी येथील उपविभागीय अधिकारी (एसडीएम) कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीत विशेष महाअभियान आयोजित करण्यात येणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून आदिवासी नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासोबतच त्यांच्या समस्या व तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न राहणार आहे.

सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी आयएएस सिद्धार्थ शुक्ला यांच्या वतीने जारी करण्यात आलेल्या संदेशातून परिसरातील सर्व आदिवासी बांधवांना या विशेष अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या अभियानात विविध शासकीय विभागांचे स्वतंत्र स्टॉल लावण्यात येणार आहेत. जे नागरिक अद्याप शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित आहेत किंवा पात्र असूनही त्यांना योजनांचा लाभ मिळालेला नाही, अशा नागरिकांना संबंधित विभागाच्या स्टॉलवर अर्ज सादर करता येणार आहेत. तसेच शासनाच्या कोणत्याही विभागाविषयी किंवा यंत्रणेविषयी तक्रार असल्यास ती प्रशासनासमोर मांडता येणार असून संबंधित समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी नागरिकांना कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत आणि विविध विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात, हा या अभियानामागील मुख्य उद्देश आहे.

सिकलसेल निर्मूलनासाठी गावोगावी वैद्यकीय पथके

जनजातीय गौरव सप्ताहाला सामाजिक विकासासोबतच आरोग्यविषयक महत्त्वपूर्ण अभियानाची जोड देण्यात आली आहे. यामध्ये सिकलसेल निर्मूलन अभियानाला विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे.आदिवासी समाजामध्ये सिकलसेलचे प्रमाण तुलनेने अधिक आढळत असल्याने या गंभीर आनुवंशिक रक्तविकाराबाबत जनजागृती करणे, वेळेत तपासणी करणे आणि योग्य वैद्यकीय मार्गदर्शन उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे आयएएस सिद्धार्थ शुक्ला यांनी आपल्या संदेशात नमूद केले आहे.

ज्या नागरिकांनी अद्याप सिकलसेल तपासणी केलेली नाही, अशा नागरिकांची तपासणी करण्यासाठी परिसरातील विविध भागांमध्ये वैद्यकीय पथके पाठविण्यात येणार आहेत. नागरिकांनी स्वतःची तसेच आपल्या मुलांचीही सिकलसेल तपासणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

भगवान बिरसा मुंडा आणि टंट्या भील, रिंगाबाबा यांच्या संघर्षातून नव्या पिढीला प्रेरणा

जनजातीय गौरव सप्ताहादरम्यान आदिवासी समाजाच्या इतिहासातील महान क्रांतिकारक आणि जननायकांच्या कार्याचे स्मरण करण्यात येणार आहे. भगवान बिरसा मुंडा आणि क्रांतिवीर टंट्या भील यांसारख्या महान योद्ध्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध आणि समाजातील अन्यायाविरुद्ध दिलेला लढा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या सप्ताहाच्या माध्यमातून केला जाणार आहे. या महान व्यक्तिमत्त्वांच्या संघर्षातून प्रेरणा घेऊन आदिवासी समाजात शिक्षण, आरोग्य, सामाजिक जागरूकता आणि विकासाच्या दृष्टीने सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे.

जनजातीय गौरव सप्ताह हा केवळ उत्सव नसून आदिवासी समाजाचे अधिकार, सन्मान, आरोग्य आणि विकास यांना नवी दिशा देण्याची संधी असल्याचे प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. संपूर्ण सप्ताहात आदिवासी बांधवांसाठी विविध विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

आयएएस सिद्धार्थ शुक्ला यांनी धारणी परिसरातील सर्व नागरिकांना आणि आदिवासी बांधवांना या उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन अभियान यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

मोर्शी नगरपरिषदेच्या टेरेसवर रंगली ओली पार्टी!

-सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल



मोर्शी/प्रतिनिधी:-
मोर्शी नगरपरिषदेच्या इमारतीच्या टेरेसवर शुक्रवारी रात्री आयोजित करण्यात आलेल्या भोजन कार्यक्रमाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने शहरात सध्या या ओल्या पार्टीची खमंग चर्चा रंगू लागली आहे.नगरपरिषदेच्या टेरेसवर रात्रीच्या वेळी झालेल्या या भोजन कार्यक्रमाची माहिती शहरात पसरताच अनेकांच्या भुवया उंचावल्या असून,नेमका हा कार्यक्रम कोणासाठी आयोजित करण्यात आला होता आणि यामध्ये कोणकोण सहभागी झाले होते ☞(पान २ वर)

मुख्याधिकारी यांना नोटीस-

सद्यास्थितीत राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती असून,सर्वसामान्य नागरिकांना पाणीटंचाई व विविध नैसर्गिक आपत्तीजन्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत शासकीय अधिकारी म्हणून जनतेच्या अडचणींबाबत संवेदनशीलता बाळगणे व शासकीय कार्यालयाची प्रतिष्ठा व शिस्त राखणे अपेक्षित आहे. आपण मुख्याधिकारी, नगरपरिषद,मोर्शी या पदावर कार्यरत असतांना नगरपरिषद कार्यालयामध्ये दुष्काळसदृश्य परिस्थितीमध्ये संवेदनशील प्रशासकीय कार्यसंस्कृतीने नागरिकांच्या अडचणी ऐकून घेवून कार्यतत्परतेणे अडचणींचा निपटारा करणे आवश्यक होते. परंतु विविध न्यूज चॅनलवर प्रसारित झालेल्या बातमीच्या अनुषंगाने दि.१३ रोजी कार्यालयात झालेला प्रकार हा प्रथमदर्शनी शासकीय पदास अपेक्षित असलेल्या आचरणाशी विसंगत असल्याचे दिसून येत असून त्यामुळे शासकीय कार्यालयाची प्रतिमा मलीन झालेली आहे.याबाबत आपले म्हणणे दि.१६ नोव्हेंबर रोजी सादर करण्यात यावे अशी नोटीस जिल्हाधिकारी यांनी मुख्याधिकारी यांना बजावली आहे.

कर्जाच्या जाचाला कंटाळून शेतकरी पुत्राची आत्महत्या

-सातेगाव येथील घटना

अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधी:-
अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सातेगाव येथील शेतकरी पुत्र अमोल मुरलीधर काळे (वय अंदाजे ४०) यांनी आर्थिक विवंचनेला कंटाळून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. २ नोव्हेंबर रोजी विष प्राशन केल्यानंतर त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान अखेर १३ नोव्हेंबर रोजी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण सातेगावावर शोककळा पसरली आहे.अमोल काळे हे हुशार आणि मनमिळाऊ स्वभावाचे म्हणून गावात परिचित होते. शेती हाच त्यांच्या उदरनिर्वाहाचा मुख्य आधार होता.अमोल यांच्या पश्चात पत्नी आरती अमोल काळे, दोन चिमुकले मुले स्वरूप अमोल काळे आणि समर्थ अमोल काळे, तसेच वृद्ध आई-वडील मुरलीधर जानराव काळे आणि छबूताई मुरलीधर काळे असा मोठा आप्त परिवार आहे. अमोल यांच्या निधनाने काळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पतीच्या जाण्याने पत्नी आरती यांच्यासमोर दोन लहान मुलांच्या भविष्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे, तर म्हातारपणात मुलाला गमावल्याने आई-वडिलांवरही मोठे आघात झाले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, काळे कुटुंबाकडे एकूण ४ एकर शेती आहे. ही शेती वडील मुरलीधर काळे यांच्या नावावर आहे. याच शेतीवर अमोल यांनी वडिलांच्या नावाने बँकेचे कर्ज घेतले होते. ☞(पान २ वर)

कर्जामुळे उचलले टोकाचे पाऊल

बँकेचे कर्ज, फायनान्स कंपनीचे हप्ते आणि नवीन कर्ज मिळत नसल्याने निर्माण झालेली कोंडी यामुळे अमोल हताश झाले होते.कर्जमाफीची घोषणा होऊनही प्रत्यक्षात लाभ न मिळाल्याने आणि कर्जमाफी होऊन सुद्धा नवीन कर्ज मिळत नसल्याने अमोल यांच्यावर मानसिक तणाव वाढत गेला. या सर्व जाचाला कंटाळून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती समोर येत आहे.शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ वेळेवर आणि अडथळ्यांशिवाय मिळावा, तसेच कर्जमाफीनंतर नवीन पीक कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्यात, अशी मागणी यानिमित्ताने गावकऱ्यांमधून होत आहे.अमोल यांच्या निधनाची बातमी समजताच सातेगावात हळहळ व्यक्त केली जात आहे. गावातील सर्व स्तरातून शोक व्यक्त होत असून काळे कुटुंबाच्या सांत्वनासाठी गावकरी धावून येत आहेत. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केल्याची माहिती आहे. नेमके कर्ज किती होते, कर्जमाफीत अडथळा काय आला, याबाबत तपासानंतर अधिक स्पष्टता येणार आहे.

कापूसतळणीच्या स्मशानभूमीची दुरावस्था; ग्रामपंचायतचे दुर्लक्ष!

शेडवरील टिनपत्रांची चाळणी,शवगृहाचे छतही क्षतिग्रस्त,जनसुविधा निधी खर्च झाला कुठे?



खल्लार/प्रतिनिधी:-
गावातील नागरिकांच्या शेवटच्या प्रवासाचे ठिकाण असलेल्या स्मशानभूमीचीच दुरावस्था झाल्याने कापूसतळणी येथे ग्रामपंचायतच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.
स्मशानभूमीच्या शेडवरील टिनपत्रांची अक्षरशः चाळणी झाली असून, १० वर्षांपूर्वी नव्याने बांधण्यात आलेल्या शवगृहाचे छतही क्षतिग्रस्त झाले आहे. मात्र,या समस्यांकडे ग्रामपंचायतचे ☞(पान २ वर)

सर्पदंशाने महिलेचा मृत्यू

खल्लार/प्रतिनिधी:-
दर्यापूर तालुक्यातील येवदा येथे सर्पदंशाच्या दुर्दैवी घटनेत २८ वर्षीय विवाहीत महिलेचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना काल (दि. १३) घडली. दिपाली रविंद्र आवरकर (वय २८) असे मृत महीलेचे नाव असून, घटनेच्या दिवशी दिपाली आवरकर ही सकाळच्या सुमारास पाणी गरम करण्यासाठी इंधन आणण्यासाठी गेली असता इंधनातील सापाने दंश केला. सर्पदंश झाल्याचे कुटुंबीयांच्या लक्षात येताच तातडीने त्यांना उपचारासाठी येवदा येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र, प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी दर्यापूर येथे पाठविण्यात आले. दर्यापूर येथे आल्यानंतरही रुग्णाची प्रकृती गंभीरच असल्याने पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय,अमरावती येथे हलविण्यात आले. जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु असताना ☞(पान २ वर)



खड्ड्यांत हरवला आष्टी-टाकरखेडा संभू रस्ता

रस्त्याची दुरवस्था कायम; नवीन बांधकामाला मुहूर्त कधी?



टाकरखेडा संभू/प्रतिनिधी:- आष्टी ते टाकरखेडा संभू या सुमारे पाच किलोमीटर मार्गाची दुरवस्था कायम असून, रस्त्यावरील खड्डे आणि दुतर्फा वाढलेल्या झाडांच्या फांद्यांमुळे वाहनचालकांचा प्रवास धोकादायक झाला आहे. अनेक वर्षांपासून या रस्त्याची केवळ तातपुरती डागडुजी केली जाते. आणि पुन्हा दरवर्षी रस्ता जैसे थे होतो. त्यामुळे रस्त्याच्या नविन बांधकामासाठी प्रशासनाला मुहूर्त कधी मिळणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.
आष्टी आणि टाकरखेडा संभू या गावांसह परिसरातील नागरिकांसाठी हा महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. दररोज शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार आणि व्यापाऱ्यांची ☞(पान २ वर)

नऊ वर्षांपासून फरार आरोपी अखेर पोलिसांच्या हाती

मोर्शीतून एक ताब्यात; दुसऱ्याला मध्यप्रदेशातून अटक

-१७ गुन्ह्यांतील आरोपीही अटकेत

अमरावती/प्रतिनिधी:- घरफोडीच्या गुन्ह्यांनंतर पोलिसांच्या नजरेतून बचावण्यासाठी ठिकाणे बदलत राहणाऱ्या दोन पाहिजे आरोपींच्या शोधाला अखेर यश आले आहे. अमरावती ग्रामीण पोलिसांनी दोन वेगवेगळ्या कारवाया करीत एका आरोपीला मोर्शी तालुक्यातील घाटलाडकी येथून, तर दुसऱ्याला मध्य प्रदेशातील पांढुर्णा येथून अटक केली. यातील एक आरोपी २०१५ पासून फरार होता, तर दुसरा अमरावती ग्रामीण जिल्ह्यातील सहा पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या १७ गुन्ह्यांत पाहिजे असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पाहिजे आणि फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशानुसार विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला १३ नोव्हेंबर रोजी मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना महत्त्वाची माहिती मिळाली. मोर्शी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या घरफोडीच्या ☞(पान २ वर)

समृद्धी महामार्गावर ट्रक सोडून चालक पसार, २१ पाइप गायब

ट्रक मालकाच्या तक्रारीवरून फसवणुकीचा गुन्हा

अमरावती/प्रतिनिधी:-
मालवाहू ट्रक घेऊन मुंबईच्या दिशेने निघालेला चालक अचानक गायब झाला आणि महामार्गावर उभ्या असलेल्या ट्रकमधून लोखंडी पाइपही कमी असल्याचे समोर आले. नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिंगणापूर येथील समृद्धी महामार्गावरील एचपी पेट्रोल पंपाजवळ हा प्रकार उघडकीस आला. ट्रकमधून २१ लोखंडी पाइप गायब असून त्यांची किंमत सुमारे दोन लाख रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी ट्रक मालकाच्या तक्रारीवरून चालकाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
गोंदिया जिल्ह्यातील फुलचूर येथील ट्रान्सपोर्ट व्यावसायिक मोहम्मद इमरान मोहम्मद यासीन (वय २९) यांच्या मालकीचा ट्रक रितेश बाबूलाल साहू (वय १९, रा. पराल, चितरंगी, सिंगरौली, मध्य प्रदेश) हा चालवत होता. छत्तीसगड येथून लोखंडी पाइप भरून ट्रक मुंबईकडे रवाना करण्यात आला होता. माल निर्धारित ठिकाणी पोहोचविण्याची जबाबदारी चालकावर होती. मात्र, ५ ते १२ नोव्हेंबरदरम्यान चालकाने शिंगणापूर परिसरातील समृद्धी महामार्गावरील एचपी पेट्रोल पंपाजवळ ट्रक उभा केला आणि तेथून निघून ☞(पान २ वर)

न्यायालयाच्या दारातच आरोपींना घेरले

जमावाचा गोंधळ; १६ जणांविरुद्ध गुन्हा

अमरावती/प्रतिनिधी:- हत्या प्रकरणातील चार आरोपींची पोलीस कोठडी संपल्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यासाठी आणले जात असताना जमावाने त्यांना घेरल्याचा प्रकार समोर आला. यावेळी आरोपींना अश्लील शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, हा सर्व प्रकार पोलीस बंदोबस्तात घडला. याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.
१३ नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास जिल्हा व सत्र न्यायालयाच्या प्रवेशद्वार बाहेर ही घटना घडली. गाडगेनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या हत्या प्रकरणात राजू शरद काळे, विशाल शामबहादूर यादव, अश्वीन गुल्ल्या पाहाडन आणि भूषण राजेश टाले या चौघांना अटक करण्यात आली होती. पोलीस कोठडीची मुदत संपल्याने त्यांना न्यायालयात हजर करण्याची प्रक्रिया सुरू होती.
त्यासाठी गार्ड इन्चार्ज, पोलीस शिपाई आणि पोलीस ☞(पान २ वर)

विदर्भ राज्य आंदोलनची जिल्हा बैठक १६ नोव्हेंबरला

अमरावती/प्रतिनिधी:-
विदर्भ राज्य आंदोलनची जिल्हा बैठक दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ ठीक बारा वाजता बाबूजी ताजने सभागृह काँग्रेस नगर रोड लघुवेतन कॉलनी मागे होणार आहे. या बैठकीला मार्गदर्शन विदर्भ आंदोलन समितीचे अध्यक्ष माजी आमदार वामनराव चटप, पश्चिम विदर्भ प्रमुख प्रा पी आर राजपूत, युवा आघाडीचे अध्यक्ष मुकेश मासुरकर ,कोअर कमिटीचे प्रकाश लढ्ढा करणार आहे. जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या महत्वपूर्ण बैठकीत आवर्जून उपस्थित राहवे असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर, रियाज खान ,सुषमा मुळे ,पद्मा राजपूत, सरला सपकाळ, अशोक हांडे ,माधवराव गावंडे ,दिलीप भोयर, राजाभाऊ पुसदेकर, सुनील साबळे, दिनेश ढवस, ☞(पान २ वर)

ई-पिक पाहणी : लोकेशनच्या तांत्रिक समस्येमुळे शेतकरी व कृषीमित्रांची गैरसोय

-शासनाचा तोडगा, ग्राम महसूल अधिकारी स्तरावर नोंदणीची सुविधा!

अंजनगाव बारी/प्रतिनिधी:- शेतकऱ्यांच्या पिकांची डिजिटल नोंदणी करण्यासाठी सुरू असलेल्या ई-पिक पाहणी प्रक्रियेत अंजनगाव बारी परिसरात लोकेशनच्या तांत्रिक समस्येमुळे शेतकरी व कृषीमित्रांची मोठी गैरसोय होत आहे. प्रत्यक्ष शेतात जाऊन पीक पाहणी करताना संबंधित शेताचे अचूक लोकेशन दाखविण्याऐवजी आजूबाजूच्या दोन ते तीन शेतांच्या पलीकडे लोकेशन दाखविले जात असल्याने पीक नोंदणी करताना अडथळे निर्माण होत आहेत. यामुळे निर्धारित वेळेत ई-पिक पाहणी पूर्ण होणार की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.
या समस्येची गंभीरता लक्षात घेता आता शासनानेही ई-पिक नोंदणीतील तांत्रिक व भौगोलिक अडचणींची दखल घेत पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने ६ नोव्हेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, केंद्र शासनाच्या 'डिजिटल क्रॉप सर्व्हे' मोबाईल ॲपमध्ये तांत्रिक व भौगोलिक अडचणींमुळे ऑनलाइन पीक नोंदणी करणे शक्य होत नसलेल्या प्रकरणांमध्ये ग्राम महसूल अधिकारी स्तरावर 'ई-फेरफार' प्रणालीद्वारे पीक नोंदणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
शासन निर्णयातही तांत्रिक अडचणींची स्पष्ट नोंद!
शासन निर्णयात प्रत्यक्ष शेतामध्ये संबंधित गटाच्या २० मीटरच्या आत उभे असतानाही मोबाईल ☞(पान २ वर)



'ई-पिक पाहणी करताना प्रत्यक्ष शेताचे लोकेशन न दाखवता दोन-तीन शेतांच्या पलीकडे लोकेशन दाखविले जात आहे. दररोज १०० शेतकऱ्यांचे टार्गेट असताना या तांत्रिक बिघाडामुळे मोठी गैरसोय होत आहे. शासनाने ई-फेरफारचा पर्याय दिला असला तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी करून लोकेशनचा तांत्रिक दोषही तातडीने दूर करावा.'
-मिथुन अंबडकार, कृषीमित्र, अंजनगाव बारी .

तांत्रिक दोष दूर करून पर्यायी व्यवस्था द्या

ई-पिक पाहणी ही केवळ ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया नसून शेतकऱ्यांच्या पीक नोंदीशी संबंधित महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे मोबाईल ॲपमधील लोकेशनची अचूकता सुधारण्यासोबतच ई-फेरफारच्या पर्यायाबाबत शेतकरी व कृषीमित्रांना स्पष्ट मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. शासन निर्णयाचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महसूल विभागाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

समाजाच्या प्रश्नांचे वास्तव समजून घ्या - दिलीपबाबू इंगोले

६ व्या राज्यस्तरीय शब्दवेल साहित्य संमेलनाचे उद्घाटन

अमरावती/प्रतिनिधी:-
आज आपला देश अन्नधान्याचे समृद्ध झाला असला तरी शेतकरी मात्र जिथल्या तिथेच राहिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या या वास्तवावर लिहिण्याची गरज आहे.समाजात अनेक प्रश्न असून या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन त्याचे वास्तव समजून घेण्याची जबाबदारी साहित्यिकांची आहे, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी केले.६ व्या राज्यस्तरीय शब्दवेल साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या महर्षी रमण सभागृहात(ज्ञानमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख नगरीत) सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ, पनवेल, यशवंतराव चव्हाण सेंटर, ☞(पान २ वर)





शब्दवेल पुरस्काराचे वितरण-

सहाव्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात शब्दवेल तर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. हास्यकवी दिवाकर देशमुख, अमरावती यांना शब्दवेल हास्यकवी गौरव पुरस्कार, अंकुशमाला चोरपगार यांना यशवंत साहित्य गौरव पुरस्कार,कृष्णाली घाटे यांना स्व.केशवराव पापडकर स्मृती बाल प्रतिभावंत पुरस्कार, प्रभास गवई यांना स्व.हरिदास तुळशीरामजी स्मृती बाल प्रतिभावंत पुरस्कार, नितीन वरणकार यांना शब्दवेल कार्यगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

आपण मती गेल्या सारखे का वागतो? संमेलनाध्यक्ष इंद्रजीत भालेराव यांचा सवाल

अमरावती भूमीचे माझ्यावर खूप संस्कार झाले असून लेखक म्हणून मला घडविणारी ही लेखक भूमी आहे, कारण पहिले लिखाण मी याच भूमीत केले, अशी माहिती ६ व्या शब्दवेल साहित्य संमेलनाचे अध्यक्ष इंद्रजीत भालेराव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिली. रुक्मिणी स्वयंवर या अजरामर कथेची ही भूमी आहे. ज्ञानेश्वरीच्या १२ वर्षे आधी महादंबेचे धवळे हे मराठीतील पहिले काव्य याच भूमीत लिहिले गेले.८०० वर्षापूर्वी मराठी माणूस कसा बोलत होता हे ज्ञानेश्वरीत नाही ते फक्त लीळाचरित्र आणि महादंबेचे धवळे मध्ये आहे, असेही भालेराव म्हणाले. विद्या असूनही मती गेल्या सारखे आपण का वागतो?, असा सवालही त्यांनी केला. अमरावतीत होऊन गेलेल्या ज्येष्ठ साहित्यिकांचा गौरवही त्यांनी आपल्या भाषणातून केला.